शा.क्र. ९५८३५
२०।२।७५
वा.वा.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दा. क्र. ९५८३५ दि. २०।२।७५
वि. वा. वा.

संगीत

# भोळा शंकर

IRBK 0115835
IRBK-0115835

यशवंत गोपाळ जोशी

'प्रसाद' रौप्यमहोत्सवी प्रकाशन

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

'चिलया'च्या पौराणिक कथानकावर बरीच नाटके झालेली आहेत व त्यांतील एकदोन नाटके नुकतीच रंगभूमीवर आलेली आहेत. असे असूनसुद्धा त्याच कथानकावर मी हे 'भोळा शंकर' नाटक लिहिले याचे कारण 'चिलया'च्या करुणरसपूर्ण व भावना-प्रधान कथानकाची माझ्या मनावर पडलेली विलक्षण मोहिनी हे एक, आणि—अनेक हरिदास नाहीत का एकच आख्यान लावीत?

'चिलया'च्या आख्यानात 'श्रियाळ-चांगुणे'ची भोळ्या शंकराने जितकी कसोटी पाहिली तितकीच प्रस्तुत नाटक रंग-भूमीवर येणाच्या बाबतीत माझ्या अनुभवाला आली! सदर नाटकात 'भोळा शंकर' भोजनाला बसला आहे; आता त्याची इच्छातृप्ति होणार तोच—

'निपुत्रिकाच्या घरी मी पाणीसुद्धा पीत नाही!' अशी

प्रकाशक :
मनोहर य. जोशी, B.A., B. Com.
प्रसाद प्रकाशन
१८९२, सदाशिव, पुणे ३०
★
रौप्यमहोत्सवी प्रकाशन
१९७२
★
मुद्रक :
र. भ. निगुडकर
प्रकाश मुद्रणालय
३९५/४, सदाशिव, पुणे ३०

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

'चिलया'च्या पौराणिक कथानकावर बरीच नाटके झालेली आहेत व त्यांतील एकदोन नाटके नुकतीच रंगभूमीवर आलेली आहेत. असे असूनसुद्धा त्याच कथानकावर मी हे 'भोळा शंकर' नाटक लिहिले याचे कारण 'चिलया'च्या करुणरसपूर्ण व भावना-प्रधान कथानकाची माझ्या मनावर पडलेली विलक्षण मोहिनी हे एक, आणि--अनेक हरिदास नाहीत का एकच आख्यान लावीत?

'चिलया'च्या आख्यानात 'श्रियाळ-चांगुणे'ची भोळ्या शंकराने जितकी कसोटी पाहिली तितकीच प्रस्तुत नाटक रंग-भूमीवर येणाच्या बाबतीत माझ्या अनुभवाला आली! सदर नाटकात 'भोळा शंकर' भोजनाला बसला आहे; आता त्याची इच्छातृप्ति होणार तोच—

'निपुत्रिकाच्या घरी मी पाणीसुद्धा पीत नाही!' अशी

आरोळी ठोकून ते दैवत पानावरून उपाशीच उठले, त्याचप्रमाणे प्रस्तुत नाटकाची एकदोन कंपनीत स्थिती झाली; पण--

नाटकाच्या आनंदपर्यवसायी शेवटाप्रमाणे अनपेक्षितपणाने रंगदेवता श्री. रघुवीर सावकार अवतीर्ण झाले; आणि नाटकाचा गर्भवास संपून श्री. रघुवीर सावकार यांच्या 'साध्या भोळ्या रंगभूमीवर' नाशिकक्षेत्री 'भोळा शंकर' दर्शनास मोकळा झाला!

माझ्या पहिल्या नाटकाचे प्रकाशक श्री. गणेश महादेव वीरकर यांनीच 'भोळ्या शंकराचेही' प्रकाशन हौसेने पत्करले. श्री. रघुवीर सावकार यांनी व त्यांच्या कंपनीतील नटवर्गाने आपल्या भूमिका तल्लीनतेने केल्या व करीत आहेत याबद्दल त्यांचे आभार मानणे जरूर आहे!

पुणे
ता. १५-६-३३

यशवंत गोपाळ जोशी

# सं. भोळाशंकर

## अंक पाहिला

( चाल : नव देखिली आज )

जगी या सूत्रधार प्रभु नाटकी खेळ करि ।
अज्ञानी सकल जीव विसरले त्यांसही ।। ध्रु० ।।
भक्ति वीणा मधुर, प्रभूनाम गायना ।
जीवित आनंदमय करी प्रभुनाम हे ! ।।१।।

### प्रवेश पहिला

( भगवान् नारद ईशस्तवन करीत आहेत. )

नारद : हरिनामाची गोडी काही अलौकिक आहे ! हरिनामाच्या संकीर्तनात तहानभूक आणि हजारो व्याधी हरण होतात ! नारायण ! नारायणनामाचा जप सुरू होताच हृदय-वीणा आपोआप वाजू लागते आणि या निर्जीव वीणेवरचा हात तसाच थबकून रहातो ! ( हातातील वीणा छेडीत) या निर्जीव तारेलासुद्धा नारायण–नाम पहा कसं अगदी तोंडपाठ झालं आहे! हे पहा, नारायण–नारायण–नारायण ! ( ऐकून ) सारीपाट खेळत असताना होणारा फाशांचा आवाज कुठून वरं ऐकू येत आहे ? अरे, हा तर पार्वतीमातोश्रींचा आवाज ! म्हणजे, मी

कैलासापर्यंत आलो की काय ? नामसंकीर्तनामध्ये ही एक जादू आहे ! नामसंकीर्तनाच्या नादात लय लागून हातापायांकडून कल्पनेच्या बाहेर चलाखीनं कामं होतात !

( इकडे तिकडे फिरतात. दुसरा सीन उघडतो, श्रीशंकर आसनावर बसले आहेत. समोर सारीपाट पडला आहे. मातोश्री पार्वती नंदीला टेकून उभ्या आहेत. )

श्रीशंकर : देवी, का डाव टाकूनशा उठलात ?

पार्वती : आपल्याला नाही ऐकू येत ? ऐका, ऐका, तो मंजुळ आणि मनावर मोहिनी टाकणारा नारायण शब्द ! कुणातरी प्रेमळ भक्ताच्या तोंडून भरतीच्या वेगानं निघणाऱ्या ‘ नारायण ’ नामानं आजूबाजूचा प्रदेश पहा कसा निनादित झाला आहे तो ! कुठून वरं आवाज घुमतो आहे हा ? हे पहा, नारायण–नारायण नारायण— ( नारद प्रवेश करितात. )

नारद : मातोश्री, माझ्या सुखाचा आपल्याला हेवा का वाटायला लागला ?

पार्वती : कोण, महर्षी, ! बसा असे आसनावर. ( नारद अभिवादन करतात व बसतात. ) महर्षी, काय म्हणालात आपण ?

नारद : आपल्याला खुद्द परमेश्वराचा सहवास असताना, नारायणनामाचा जप आपल्या तोंडी का असावा याचं मला आश्चर्य वाटत आहे ! मी असा वेळी अवेळी तिन्ही त्रिकाळ फिरणारा म्हणून हरिनामाची सोबत मला ठीक आहे ! पण खुद्द परमेश्वराचा सहवास आपल्याला असताना–

श्रीशंकर : नारायणनामाचा जप तोंडी का असावा ? नारदा, खुद्द परमेश्वरालाहि कांही तरी कर्तव्यकर्म आहेतच ना ! महर्षी,

तुमच्या या अशा अवास्तव स्तुतीनं अज्ञजनांची फसवणूक होते, आणि त्यांना परमेश्वर म्हणजे एक सुखासीन, आपल्याकडून सेवा करवून घेणारी–आणि स्वतः काहीएक न करता दुसऱ्याच्या बऱ्यावाईट कृत्याबद्दल त्याला जबाबदार धरणारी अशी एक विलक्षण शक्ति आहे असं वाटतं. मृत्युलोकावर तर माझ्या नावाची फारच बदनामी झाली आहे म्हणतात !

पार्वती : हो ! देवा, मृत्युलोकावर आपली खरंच बदनामी झाली आहे ! मृत्युलोकावरची माणसं आपल्याला 'भोळाशंकर' या नावानंच ओळखतात ! आपल्या कालक्रमणेविषयी तर त्यांची अशी विलक्षण समजूत झाली आहे, की आपण एकसारखे भांग पीत असून अहोरात्र सारीपाट खेळण्याशिवाय आपण दुसरं काहीच करीत नाही ! आणि ते लोक आपला प्रसाद म्हणूनच भांग सेवन करतात !

श्रीशंकर : नारदा, हे खरं काय ?

नारद : थोडीशी अतिशयोक्ति आहे यात, पण या म्हणण्यात पुष्कळसं खरंहि आहे ! देवा, अत्यंत भोळं दैवत म्हणून लोक आपली उपासना करतात ! शंकर प्रसन्न झाला तर काय देईल आणि काय नाही–अशी लोकांची भोळी समजूत असल्यामुळे शंकरभक्तच फार झाले आहेत ! आज सहज भूलोकावर गेलो असताना आपला एक निस्सीम भक्त पहाण्यात येऊन मनाला अत्यंत समाधान वाटलं, आणि म्हणूनच आज मुद्दाम कैलासाकडे वळलो !

श्रीशंकर : अस्सं; पण त्याची भक्ति तरी निष्काम आहे का? का 'शंकर प्रसन्न झाला तर काय देईल आणि काय नाही' या अवास्तव कल्पनेवरच आहे !

नारद : नाही; देवा, तसं नाही ! त्याची भक्ति अगदी निष्काम आहे. आणि आपल्या भक्तीकरता तो सर्वस्वाचा होम करायला तयार आहे ! भूलोकावर क्रान्तिनगरांत श्रियाळराजा राज्य करीत असून, तुला प्रसन्न करून घेण्याकरिता म्हणून त्याने सर्व प्राणिमात्राला इच्छाभोजन सुरू केलं आहे ! मला वाटतं या गोष्टीला आज कित्येक वर्षं होऊन गेली असावीत ! अत्यंत पुण्यशील—तपस्वी—शान्त—दान्त—अशी त्याची प्रेमळ मूर्ति पाहून मला भक्तीच्या ओलाव्यानं गहिंवरून आलं; आणि म्हणूनच मी हा असा इकडे आलो !

श्रीशंकर : अस्सं ! नारदा, खुद्द आपण जेव्हा त्याच्या भक्तीची इतकी महती गाता त्या अर्थी त्याच्या भक्तीला आणि सत्त्वाला कसोटी लावलीच पाहिजे !

नारद : देवा, माझी खात्री आहे, तो आपल्या सत्त्वापासून केव्हाहि ढळणार नाही !

श्रीशंकर : आनंद आहे ! नारदा, देवीशी सारीपाट खेळण्यांत आमच्या मनाला जो आनंद वाटतो तसाच आनंद भक्तावर कृत्रिम संकट आणून त्यांच्या भक्तीशी सारीपाट खेळण्यातहि आम्हाला वाटत असतो ! नारदा, आज बरेच दिवसांत भक्तीच्या अत्युच्च कोटीचं तांडवनृत्य नाचायला मिळालं नाही—अनायासं आपण संधि आणून दिलीत—

पार्वती : देवा, मलासुद्धा आता आपल्याला भांगिष्ट आणि भोळसट असं म्हणावसं वाटू लागलं आहे ! बिचारा श्रियाळराजा, आपला एकनिष्ट भक्त आणि सत्त्व पहाण्याकरिता म्हणून आपण त्याचाच छळ—

श्रीशंकर : यात कसला आला आहे छळ ! देवी, हा शेवटचा कस आहे; आणि हा कस भाग्यवन्तांनाच लावायचा असतो ! कस सोन्याला लावतात, लोखंडाला नव्हे ! ठीक आहे; मी आताच अतिथीवेषानं त्याच्या दाराशी इच्छाभोजनाकरिता जातो. नारदा, देवी, आपणहि ती गंमत पहाण्याकरिता चलाच !

पार्वती : भक्तांची कसोटी पाहण्याकरिता का होईना पण त्यांचा छळ करवतो तरी कसा आपल्याला ! नाही, मी आपल्याला तसं करू देणार नाही ! आणि आपण जर जाणारच असलात तर आपण अतिथीवेषानं जा, तिथं मीहि दासीच्या रुपानं श्रियाळराजाच्या इथं आपल्या अगोदरच जाते व मला त्यांना काही मदत करता आली तर पहाते !

श्रीशंकर : म्हणजे श्रियाळराजाच्या या सत्त्वपरीक्षेत आपण मला मदत न करता आमची विरुद्ध बाजू पत्करणार तर? मग मला हाहि एक नवा आनंदच प्राप्त होणार म्हणायचा ! देवी, जा आपणहि जा आणि मीहि निघतो–

पार्वती : नारदमुने–

नारद : पार्वतीदेवी, मला मात्र माझ्या नशिबाची गंमत वाटते ! सहृदयपणानं श्रियाळचरित्र सांगायला मी इथं आलो, पण त्यामुळं अज्ञजनांच्या दृष्टीनं श्रियाळराजाच्या या छळाला मीच कारणीभूत झालो म्हणायचा ! अशा गोष्टीनीच, कारण नसतांना, कळलाव्या नारद म्हणून माझी प्रसिद्धी झाली आहे ! वास्तविक हरिनामाशिवाय मला दुसरं काहीच प्रिय नाही ! —

(यमन मिश्र)

नारायण नाममंत्र, करि जना भवापार ! ॥ ध्रु० ॥
या मना, एकचि अखंडित, सौख्यकारी, दुःखहारी
अन्य नाही, विमल नाम ! ॥ १ ॥

---

## प्रवेश दुसरा

(स्थळ : रस्ता; पात्रे:–पुष्पधन्वा व वीरसेन प्रवेश करतात )

पुष्पधन्वा : (आळस देऊन) कंटाळा आला बुवा आपल्याला या आयुष्याचा ! मौंजीबंधन झाल्यापासून गुरुगृही अभ्यासाच्या नावाखाली बारा वर्षं वनवास काढला; आणि अभ्यास पुरा करून परत घरी आल्यानंतर आज दोन वर्षं हा असा घरचा वनवास काढीत आहे ! मी ज़री वरवर नकाराचा पाढा वाचीत असलो तरी वडिलधाऱ्या माणसांना कळायला नको का की हा आता लग्नाकरिता उतावळा झाला आहे म्हणून ! कामिनीच्या सहवासाशिवाय दिवस काढणं, मित्रा वीरसेना–आपल्याला अगदी अशक्य झालं आहे रे !

वीरसेन : खरंच, एकंदर तुझी परिस्थिति मोठी चिंतनीय झालेली दिसते आहे खरीच ! बरं, तू मला असं सांग—

पुष्पधन्वा : (वीरसेनाच्या खांद्यावर हात टाकून) अगदी जिवलग मित्र झालास तरी कसं सांगू रे अगदी निर्लज्जपणानं ! पण मला असं वाटतं––

वीरसेन : काय वाटतं ?

पुष्पधन्वा : असं वाटतं की, मी ‘ पुष्पधन्वा ’ पुरुष आहे त्यापेक्षा पुष्पवती ‘ स्त्री ’ झालो असतो तर—माझ्या लग्नाचा विषय काही खास इतका लांवणीवर पडला नसता ! (उसासे टाकतो.)

वीरसेन : खरं आहे ! असं वाटणं अगदी साहजिक आहे ! ज्या बाजूनं आपण लढत असतो त्या बाजूला यश येत नाही असं वाटल्यानंतर, मिळमिळीत मनाच्या माणसाला साहजिकच बाजू वदलून लढण्याचा मोह अनिवार होतो ! खरोखर, जर तू ‘ पुष्पवती ’ असतास तर आजपर्यंत सहजासहजी दोनचार मुलं-लेकरं तुझ्याभोवती धिंगाणा घालती ! परंतु परमेश्वरानं चुकून तुला पुरुष केल्यामुळं आजपर्यंतचं तुझं आयुष्य अगदी निर्फळ गेलं !

पुष्पधन्वा : हे वघ, अगदी अरसिक आहेस तू ! मुलांकरिता का लग्नाला हपापलो आहे मी ! खरंच, तुला काव्य अजिबात कळत नाही ! अरे राया, मुलांची काय घाण ती ! एकाचा शेंबूड पुसा, एकाची लाळ धुवा, कुणाचं काही—कुणाचं काही ! अशी नुसती साफसुफी करण्यात जन्म जायचा ! परमेश्वरानं जर चुकून मला वर दिला तर मी सांगेन—‘ देवराया, मला निपुत्रिक कर.’ कारण मुलं झाल्यानंतर त्यांना हंसवण्या-खेळवण्यात आपला सारा जन्म जायचा, आणि मग आपल्याला खेळायला-वागडायला वेळ कुठून सापडायचा ?

वीरसेन : अरे वा, तुझ्या अंगात काव्य तर अगदी पूर्णपणं संचारलेलं दिसतं आहे ! लचकतो आहेस काय, अगदी लाडा-लाडानं तोंडातल्या तोंडात काय बोलतो आहेस ! अरे, झालं तरी काय तुला ? आणि आवाजात तर असा बदल झाला आहे की डोळे मिटून ऐकलं तर ‘ स्त्री ’ बोलते आहे का पुरुष बोलतो आहे हेहि उमगायचं नाही !

पुष्पधन्वा : एकवार ऐकून घेतलं--पुन्हा असं बोलशील तर मी बोलायचा नाही हं तुझ्याजवळ ! 'स्त्री' आणि 'पुरुष' असा भेद पहाणं पाप आहे बरं ! एकाच परमेश्वराची ही दोन लेकरं असा भेद का पहायचा त्यांच्यात ? आणि तुम्हा पुरुषांची ही अशी चढेल हेटाळणी ऐकूनच मला असं वाटू लागलं आहे--की देवा, मी जर 'स्त्री' झालो असतो तर या पुरुषांची--

वीरसेन : स्त्री नसल्याबद्दल एवढा पश्चात्ताप करण्याचं काहीच कारण नाही ! फक्त हातात बांगड्या भर--

पुष्पधन्वा : स्त्रीजातीचा हा उपमर्द आहे बरं ! असं चांगलं नाही ! आपण दोघंहि एकाच परमेश्वराची लेकरं--स्त्रीपुरुषांनी इतकं मिळून मिसळून वागायला पाहिजे, की पहाणाराला एकदम स्त्री कोणती आणि पुरुष कोणता हे नाही ओळखता कामा ! ऽ ! आणि त्यापासून फायदे किती तरी आहेत !

वीरसेन : ते काय ?

पुष्पधन्वा : स्त्रियांच्याकडे रस्त्यातून जातांना रानवट पुरुष एकसारखे टक लावून पहातात. पण सर्वच सारखे दिसायला लागल्यानंतर कोण कुणाकडे टक लावून पहाणार ? आलं का लक्षात ?

वीरसेन : हा एक मोठा फायदा आहे खराच !

पुष्पधन्वा : अरे, असे किती तरी फायदे आहेत ! मीसुद्धा हल्ली त्या बाजूनं थोडासा प्रयत्न करतो आहे ! स्त्रियांना स्त्री म्हणणं हा पुरुषांचा जुलूम आहे नुसता ! एकजात समता—स्वातंत्र्य याची घोषणा पाहिजे ! आणि स्त्रियांच्या एकंदर काय काय हालअपेष्टा आहेत हे त्यांच्यात मिसळून समजावून घेण्या-

करिता माझ्या मनात एक धाडसी कल्पना आली आहे ! स्वतः स्त्री-वेष घ्यायचा आणि बायकात मिसळायचं !

वीरसेन : लवकर उलगडा झाला हे एकपरी बरं झालं ! नाही तर म्हटलं--तूं आणि धाडसी कल्पना ! मला वाटलं, तुझी कल्पना जास्तीत जास्त जीव देण्यापर्यंतच्या धाडसाची असेल ! पण बायकी वेषान्तर ही अत्यंत काव्यपूर्ण हृदयाची धडाडीची कल्पना आहे.

पुष्पधन्वा : थट्टा करू नकोस; स्त्रीवेष घेऊन--बायकात शिरून त्यांच्या वागणुकीचं, स्वभावाचं मार्मिक समालोचन करून मी एकदम युगान्तर करून टाकणार आहे. प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे ? तेव्हा मला तुझं थोडसं सहाय्य पाहिजे !

वीरसेन : ते काय बुवा ?

पुष्पधन्वा : मला स्त्रीवेष पूर्णपणं साधतो का नाही हे पहाण्याकरिता आपण एक धाडस करून पाहू !

वीरसेन : कोणत्या संकटात ढकलणार आहेस मला ?

पुष्पधन्वा : आपल्या या क्रान्तिनगरात श्रियाळराजानं अनायासं इच्छाभोजन सुरू केलं आहे, आणि त्यातल्या त्यात त्याला दापत्य-भोजन घालण्याची फार हौस आहे ! तेव्हा--

वीरसेन : तेव्हा काय ?

पुष्पधन्वा : तेव्हा मी घेतो स्त्रीवेष, आणि श्रियाळराजाच्या इथं तू आणि मी दांपत्य म्हणून जेवून येऊं ! म्हणजे माझ्या वेषान्तराबद्दल माझी पूर्ण खात्री होईल ! मग काय, ठरला ना बेत ?

.. २

वीरसेन : हे बघ, तुझ्या या धाडसी कल्पनांच्या बाबतीत मी आहे जरा मागासलेला; तेव्हा मला काही अशी गळ घालू नकोस–

पुष्पधन्वा : माझी नाहीच का कीव येत तुला ?

वीरसेन : अरे पण यावाचून अडलं आहे का काही ?

पुष्पधन्वा : पण माझ्याकरिता—

वीरसेन : चल, आचरट आहेस झालं.

पुष्पधन्वा : पण आता आहे त्याला रे काय करायचं ? नाही तर मी तुझ्या पायाशी जीभ हासडून प्राण देईन बघ !

वीरसेन : बरं बुवा, मित्र म्हणून आजपर्यंत तुझ्याबरोबर वागलो आहे, तेव्हा तुझ्याबरोबर काय माझे धिंडवडे व्हायचे असतील ते टाळून कसे टळणार ?

(दोघे जातात. कलावती व गुणवती प्रवेश करतात.)

कलावती : कोण ग, कोण ग गेले ते दोघे !

गुणवती : माझं नसतं बाई आल्यागेल्याकडे इतक्या बारकाईनं लक्ष !

कलावती : निव्वळ स्त्री आहेस झालं ! अग रस्त्यानं जाताना येताना, केव्हाहि काय दृष्टि कशी चौकस आणि भेदक असली पाहिजे ! अशा या तुझ्यासारख्या बावळ्चा मुली आहेत म्हणूनच या पुरुषांची मिजास आहे ! पुरुष पाहिला म्हणजे आपणच लाजतो, म्हणून हे मेले पुरुष छाती वर काढून चालतात ! बायका जरा धीट होऊं देत, पुरुषांच्या उत्तराला उत्तर-डोळ्याला डोळा—तोंडाला तोंड--

गुणवती : बाई ग ! हे फार पुढचं तू अगोदर बोलते आहेत ! अनोळखी पुरुषाच्या उत्तराला उत्तर--डोळ्याला डोळा–तोंडाला तोंड--बोलतांना तरी काही जिभेला हाड तुझ्या !

(चाल:--सुखाचा शोध लावाया)

मनाला स्वैर सोडावे। कसेही बोल बोलावे ।।
वदावे काय जिव्हेने। दिले हे तोंड देवाने ।।
स्त्रियांना शोभते का हे ?। मनाला विचारून बघ हे ! ।।
जशा जो दृष्टिने बघतो। तसा त्या मार्ग आढळतो ।। १ ।।

कलावती : अग आम्ही बायका जेव्हां लाज—भीड—मर्यादा गुंडाळून ठेवूं तेव्हां कुठं हे पुरुष थोडेसे ताळ्यावर येतील ! आम्हा बायकांना या मेल्या पुरुषांनी अगदी बायका बनवून ठेवलं आहे ! मला वाटतं, या मेल्या पुरुषांच्या तोंडीला तोंड वागून आपणच त्यांना लाजविलं पाहिजे ! आपण बायकांनी थोडं धीट बनून आणि या मेल्या पुरुषांना थोडं लाजायला लावून दोघांनीहि इतक्या सलोख्यानं वागायचं कीं स्त्री-पुरुष हा जातिभेदच मुळी अजिबात नष्ट झाला पाहिजे ! तूं नको सांगूं, पाहिलं असलंस तरी नको सांगूं; पण मला वाटतं कीं मगाशीं जे दोघे इथून गेले त्यांत पुष्पधन्वा होतेच ! खरंच, मी जर लग्न केलं तर त्यांच्या-शीच करीन ! किती लाडिक लाडिक त्यांचं वागणं ! त्यांना पाहून असं वाटतं की--जणुं एखादी स्त्रीच पुरुषाचं सोंग घेऊन बोलते आहे !

गुणवती : पुरे ग बाई या तुझ्या विक्षिप्त कल्पना ! या तुझ्या विक्षिप्त वागण्यामुळं तुझ्या लग्नाला तर अजून पत्ता नाहीच, पण मी जर तुझ्याबरोबर अशी सदोदित वागूं लागले तर माझ्याहि–

कलावती : अगबाई, अडलीस का लग्न या शब्दाजवळ ? तुम्ही अडाणी बायका नवऱ्याचं नाव घ्यायला इतके दिवस लाजत

होतां तें आतां आणखी कुठं कुठं लाजायला लागणार आहांत तेसुद्धां मला सांगतां येईनासं झालं आहे !

गुणवती : आतां तुझं लग्न झाल्यावर पाहीन ना सासरी कशी काय वागणार आहेस ती !

कलावती : सासर--सासर--सासर— ! मी बसले आहे सासरीं जायला ! त्यांना असली गरज तर तेच येतील आमच्या घरीं रहायला ! नाही तर साफ सांगेन त्यांना, तुमचं घर आणि माझं घर यांच्या मधोमध दुसरं एक निराळं घर घ्या आणि तिथं राहू आपण वाटल्यास दोघं ! लग्न झाल्यावर मी माहेरचं नांव बदलायची नाहीं ! नवऱ्याला पाहून लाजायची नाही थोड-क्यांत सांगायचं म्हणजे पुरुष जे करीत नाहींत तें मी काहीसुद्धा करणार नाही ! तेव्हा साफ सांगणार त्यांना, की लग्न केलं आहे माझ्याशी, तेव्हा असं वागायचं असलं तर वागा, नाहीं तर दक्षिणेकडे तोंड करून तुम्ही आणि उत्तरेकडे तोंड करून मी अशीं विरुद्ध दिशेला तोडं करून दोघंही पृथ्वीप्रदक्षिणेला निघू या—मग नशिबांत जेव्हां भेट व्हायची असेल तेव्हा होईल ! आणि वाटेतच कुठं एखाद्या नदीला, समुद्राला, झाडाला अडकून जर एकाचा वाटेतच मुक्काम झाला तर प्रश्नच मिटला !

गुणवती : हे आता बोलते आहेस, पण प्रत्यक्ष प्रसंग पडल्यानंतर —

कलावती : गडे गुणवती, पुढचं पुढं पहाता येईल ! पण सखे, मी आज तुला एक विनंती करणार आहे !

गुणवती : ती काय बाई ! तुझी विनंती अशीच काही तरी चमत्कारिक असणार—

कलावती : पण बाई, मला भीति वाटते आहे तुझी !

गुणवती : आश्चर्यच आहे म्हणायचं ! पुरुषांना धाब्यावर वसवूं पहाणारी तू ! आणि तू मला भिणार ?

कलावती : पुरे पुरे हं आपली अक्कल ! हो, मी आहे ही अशी आहे, अशी रहाणार आणि अशी वागणार—जग माझं काय करतं आहे तेच पहाते आता !

गुणवती : अग, जग काय करणार तुझं ? पिसाळलेली कुत्री जग नाही का वाटेनिराळी सोडून देत--तसंच तुझंही—

कलावती : अशी ही आमच्या आमच्यांतच फूट आहे म्हणूनच नमावं लागतं हो या पुरुषांच्या पुढं ! नाही तर--

गुणवती : बरं, हा असा वितंडवाद आणखी किती वेळ घालणार आहेस ? नाही तर मला बाई जाऊं दे एकटीलाच घरी !

कलावती : चल, मीही आलेच तुझ्याबरोबर ! पण उद्यां जेवायला येशील का ग माझ्याबरोबर ?

गुणवती : कुठं, तुझ्या इथंच ना ? मग न यायला काय झालं !

कलावती : अग माझ्या इथं असतं तर—तू नाही म्हटलं असतंस तरी ओढून नेली असती तुला ! उद्यां जेवायला जायचं आहे एका निराळ्याच ठिकाणी !

गुणवती : म्हणजे कुठं ?

कलावती : आपल्या श्रियाळराजानं इच्छाभोजन सुरू केलं आहे ना, त्या इच्छाभोजनांत !

गुणवती : पण मला अजून इच्छाभोजनात, सहस्रभोजनात जाऊन जेवायची वेळ नाही आली !

कलावती : आणि मला तरी आली आहे वाटतं ?

गुणवती : हो तुलाहि आली नाही हे खरं, पण मग हे असे भिकेचे डोहाळे का आठवले तुला !

कलावती : त्यात माझा एक स्वार्थ आहे !

गुणवती . तो काय ?

कलावती : माझ्या मनात पुरुषवेष घेऊन-पुरुषसमाजात मिसळून त्यांच्या स्वभावांतल्या खाचाखोचा नीट समजावून घेऊन काही एक नवीन उपक्रम करून पहावयाचा आहे ! तेव्हा पुरुषवेष मला कितपत साधतो हे पाहण्याकरिता मी घेते पुरुष-वेष–आणि श्रियाळराजाच्या इच्छाभोजन–समारंभात आपण दांपत्य म्हणून जेवून येऊ !

गुणवती : कलावती, आता मात्र तुझं डोकं पुरतं फिरलं ग बाई ! तू आणि मी जायचं–दांपत्य म्हणून लग्नाआधी–आणि तुझ्यासारख्या पुरुषाबरोबर ! आणि–

कलावती : अगदीच भित्री आहेस तू ! चल तर माझ्या घरीच मी तुला सगळं समजावून सांगते !

गुणवती : काय समजावून सांगणार घरी जाऊन––माझ्या डोळ्यांपुढं आताच लख्ख प्रकाश पडला आहे तू काय समजावून सांगणार त्याचा ! चल–

( दोघीहि जातात. )

## प्रवेश ३ रा

( स्थळ : राजवाड्यातील तुलसीवृंदावन, वृंदावनाचे खाली छोटीशी शिवाची साळुंखा. राणी चांगुणा तुळसीला प्रदक्षिणा घालीत आहे, शेजारी दासी उभ्या आहेत असा प्रवेश उघडतो. एक दासी येते, चांगुणेने आणलेले पूजासाहित्य आत नेऊन ठेवते. पडद्यामध्ये 'सांब सदाशिव सांब' या नाममंत्राची नुसती सतार-पेटीवरची साथ ऐकू येते. थोड्या वेळाने एक दासी शिवस्तवनाला गाण्याला आरंभ करते. तिचे स्तवन संपते इतक्यात देवी पार्वती दासीवेषाने चांगुणेच्या एका दासीबरोबर येतात. चांगुणा उठून उभी रहाते. )

चांगुणा : ( दासीला ) आत जाऊन देवींना बसण्याकरिता एक वेत्रासन घेऊन ये वरं !

दासी : वेत्रासनाची जरूरी नाही. या आपल्याकडे दासीची नोकरी मागण्याकरिताच आल्या आहेत !

पार्वती : खरंच, मला आपल्याकडे काही सेवाचाकरी करण्याची संधी मिळेल का ?

चांगुणा : ( देवी पार्वतीकडे निरखून पहात ) आपण आतापर्यंत कुठं सेवाचाकरी केलेली दिसत नाही, तर आपण आपल्या हाताखालीच दासदासी वागविलेल्या दिसत आहेत. आपण माझ्याकडे दासी म्हणून राहण्याची इच्छा करावी—आश्चर्य वाटतं मला !

पार्वती : आश्चर्य वाटण्याचं काहीच कारण नाही ! आपण आता ओळखलंतच; खरोखर माझ्या हाताखालीहि बऱ्याच दास-दासी आहेत, पण–

चांगुणा . मग ही सेवावृत्तीची हाव का ? मला लाजविण्याकरिता ?

पार्वती : आपणांला लाजविण्याचं काय कारण ! उलट माझं कारण सांगायला मलाच लाज वाटत आहे ! मला वाटतं, आपण दोघीच असलो तर जास्त मनमोकळेपणानं बोलता येईल आपल्याला.

( चांगुणा खूण करते, सर्व दासी निघून जातात. )

चांगुणा : ( पार्वतीदेवीचा हात धरून ) या, बसा ना अशा ! ( आसनाकडे जात ) हे हो काय ? ओळख नवी असली तरी अंत:करणाला अंत:करणाची साक्ष पटल्यानंतर पहिल्या भेटीलाच मोकळ्या मनानं वागायला काय हरकत आहे ?

पार्वती : आपण माझी एक मागणी मान्य कराल का ?

चांगुणा : अगोदर आसनावर तर बसा ! ( दोघीजणी वेत्रासनावर बसतात, एकमेकीकडे निरखून पहातात; व एकमेकीच्या गळ्यात हात टाकून दोघीहि उठतात. ) खरंच, आपण कोण, कुठल्या, माझी अशी थट्टा करायचा आपण का विचार ठरविलात–सांगा ना मन मोकळं करून !

पार्वती : सती चांगुणे, तुझ्याप्रमाणं मलाहि सर्व ऐश्वर्य आणि सत्ता आहे, पण पुत्रसुख नाही ! तशी तीन मुलं आहेत; पण एक नादिष्टपणानं कुठं तरी जाऊन तोंड लपवून बसला आहे; आणि दुसरा इतरांची संकटं टाळण्यांत सदैव गुंतलेला असतो म्हणून त्याला घरचीहि आठवण होत नाही ! आणि मला तर लहान मुलांचा भयंकर लळा आहे ! वरं, हाती सत्ता आहे–पण कुणाची तारातूट करून आपण आपल्या जिवाची हौस भागवायची ! आपल्या कुलदीपकाची—बाळ चिलयाची कीर्ति कानांनी

ऐकली; मनात ठरवलं, आपण जरी चार दिवस उसना दासीपणा पत्करला तरी आपलं जन्मजात ऐश्वर्य कोण हिरावून घेणार आहे! चार दिवस मनाच्या समाधानाकरिता दासी म्हणून आपल्याकडे रहावं; अन् बाळ चिलयाशी हसून खेळून मनाची हौस भागवून घ्यावी. पुरवाल का आपण माझ्या मनाची ही हौस? नाही म्हणून माझ्या मनाचा हिरमोड मात्र करू नका!

चांगुणा : काय कारण हिरमोड करायचं? आपल्या मनाचं कोडकौतुक करण्यात जर माझ्या बाळाचंहि कोडकौतुक होणार आहे–तर का नाकारीन मी आपली मागणी! बाळ किनई, आज अजून उठला नाही वाटतं–आज बाळ अजून दर्शनाला आला नाही. त्याला हाक मारायला सांगते हं कुणाला तरी. हो, पण मी आपल्याला आपलं नावसुद्धा विचारायचं विसरले. पण विचारायचं काय आहे त्याच्यांत! मी आपणाला देवी पार्वती म्हणूनच हाक मारते.

पार्वती : (दचकून) काय! देवी पार्वती?

चांगुणा : दचकायला काय झालं एवढं देवी म्हटल्यानं? माणसांनी आपलं चांगलं बोलत असावं! आम्ही उभयता किनई, अलीकडे कुणाहि अनोळखी माणसाला हाक मारायची झाली तर होता होईल तो शंकर पार्वती या नावानीच हाक मारतो. सहजासहजी परमेश्वराचं नाव तोंडी येऊन मनाला जास्त हुरूप वाटतो.

(यमन; त्रिवट)

ईशध्यानी मन माझे रमले। सकल नवरस अनुभव आले ॥ध्रु०॥
मम मनिचे नच हेतु उरले। एक ध्यास शिवपदि मन रमले!
॥ १ ।

पार्वती : पण या मोठ्या नावानं हाक द्यायला–हाक देणाऱ्या माणसाला जास्तच ओशाळल्यासारखं वाटत असेल, नाही ? निदान मला तरी, तुम्ही पार्वतीदेवी या नावानं हाक मारताच ओशाळल्यासारखं—खजील झाल्यासारखं वाटलं अगदी ! खरंच, देवी चांगुणे, मी आपणाला एक प्रश्न विचारू का ?

चांगुणा : बघा, आपणसुद्धां मला देवी म्हटलंत ! खरंच, माणसाला फार चांगलं म्हटल्यानं ओशाळल्यासारखं का वरं होतं ! चांगलं म्हणवून घ्यायला माणसाला का वरं लाज वाटावी ?

पार्वती : आपणच आपल्या मनाला विचारून बघा आता. बरं, ते असू द्या, पण मी तुम्हाला विचारणार होते ते असं की आपण ही जी इच्छाभोजनं सुरू केली आहेत–नाना प्रकारची दानं देत आहात–आणि सर्व प्रकारांनी जो त्याग करीत आहांत, परमेश्वरापासून याच्याबद्दल काय मिळवायचं आहे आपल्याला ?

चांगुणा : याच्याबद्दल समाधानाशिवाय आम्हांला दुसरं काहीएक मिळवायचं नाही ! असं पहा, आंब्याला प्रथम मोहोर येतो. नंतर त्याला फळ धरतं, पुढं ते फळ पिकतं—पण फळं पूर्णपणे पिकल्यानंतर फळांनी नाशाशिवाय दुसरी कशाची अपेक्षा करायची असते ! त्याप्रमाणं आपल्या आयुष्याचा आंबा सर्व प्रकारच्या सुखदु:खाच्या अनुभवानं आता पूर्णपणं पिकला आहे—त्याचा नाश सुखकर रीतीनं, आपल्या हातनं आणि आनंदानं व्हावा येवढ्याचकरिता ही दानं वगैरे आहेत ! काळाच्या जात्यात सर्वच भरडले जाणार, तेव्हा काळपुरुषाशी लपवालपवी किंवा आरडाओरडा करण्यापेक्षा आनंदानं—आपणहून आहुतीसारखं पडणं बरं, असं वाटून त्याचा परिणाम म्हणूनच ही दानं वगैरे

आहेत ! आयुष्याच्या सुरवातीला जमवाजमव करावयाची असते आणि शेवटी आयुष्याच्या भातुकलीचा चट्टामट्टा करायचा असतो ! त्यालाहि आनंदानं तयार असणं–मला वाटतं पूर्ण समाधान आणि भक्तिसुद्धा यातच असते !

पार्वती : हे फार थोड्यांना कळतं, किंवा पुष्कळांना कळतं म्हणा पाहिजे तर पण त्याप्रमाणं वागणूक मात्र क्वचित् एखाद्याचीच होते ! हो, पण हाक मारायला सांगा ना आपल्या चिरंजीवांना ! मला त्याला पहायची फारच उत्कंठा लागली आहे.

( दोन दासी ललकारत येतात-- 'युवराजांची स्वारी दर्शनाला येत आहे.'

चांगुणा : हा पहा बाळ आलाच वाटतं !

( फुलांच्या माळांनी डोळे झाकून घेतलेला चिलया प्रवेश करतो. )

चिलया : आई, आज उठायला उशीर झाला, नाही ? तेव्हा प्रथम तुझंच दर्शन व्हावं म्हणून डोळे बांधून आलो आहे, बघ ! आई, मी तुला नमस्कार करतो आणि तूंच आपल्या हातानं माझे डोळे उघड मग हं ! (चांगुणेच्या पाया पडायला जातो, पण चांगुणेच्या म्हणून पार्वतीदेवीच्या पाया पडतो. पार्वतीदेवी त्याला मांडीवर घेतात व त्याचे डोळे सोडतात. चिलया आश्चर्याने पार्वतीदेवीच्या तोंडाकडे पाहू लागतो, व पटकन पार्वतीदेवीच्या मांडीवरून उठून दोघींच्या मध्ये बसतो, व स्मित हास्य करून) आई, या ग कोण ?

चांगुणा : पायां पडलास ना त्यांच्या आई म्हणून, त्याहि तुझ्या आईच आहेत बरं !

चिलया : खरंच ! खरंच का हो तुम्ही माझ्या आई आहात ?

का आई होणार आहात ? पाहू ! (पार्वतीदेवीकडे रेखून पाहून) आणि आई, पाहू ! (चांगुणेच्या तोंडाकडे रेखून पहात) अरे वा, काहीच फरक नाही ! हीहि आई आणि हीहि आई ! आता मात्र माझी गंमत होणार ! काही वेळ या आईजवळ--काही वेळ या आईजवळ, आणि मग पुन्हा माझ्या या आईजवळ ! आई, आजचा दिवस खूप गंमतीचा आहे ! आई, तू कालच म्हणालीस ना, की मी अलीकडे थोडा गंभीर आणि शहाणा होत चाललो आहे म्हणून ! पण अं-हं ! चुकला तुझा अजमास ! आज मी आता पुन्हा वेडा--म्हणजे लहान झालो ! आई, आज मला असं वाटतंय की खूपखूप हंसावं, खेळावं बागडावं; खूपखूप गंमत करावी, तुला खूप त्रास द्यावा, आणि याना--या माझ्या नवी-नच आई आहेत; त्याना आजच त्रास दिला तर या रागावतील का ग माझ्यावर ? रागवाल का हो तुम्ही माझ्यावर मी तुम्हाला त्रास दिला तर ?

पार्वती : नाही बरं बाळ रागावणार. तू जरी मला अगदी खूप खूप त्रास दिलास तरीसुद्धा रागावणार नाही मी तुझ्यावर !

चिलया : अग आई, या खरंच आईसारख्या आहेत ! त्रास दिला तरी रागावणार नाही म्हणतात. आता यांना काय बरं त्रास देऊ ? पण छट्, त्या रागावणार नसल्या तरी त्रास काय म्हणून द्यायचा त्यांना ! पण आज मात्र मला खूप गमतीजमती कराव्याशा वाटतात.

( कर्नाटकी; त्रिवट )

आई, तुझ्या अंकावरी । मज मौज वाटे । प्रेमे गावे ।। ध्रु० ।।
खेळामध्ये गमति करोनी । बहु बागडावे जवळी तुझ्या ।। १ ।।

पार्वती : बाळ, पुरे पुरे आता तुझा हा गाण्याचा छंद !

चांगुणा : काय देवी, पुरली का हौस मनाची ! का कंटाळलात पहिल्याच भेटीला ?

पार्वती : देवी, काय बोलता हे--फुलाच्या वासाला कधी कुणी कंटाळेल ?

चिलया : बरं आई, मी जातो हं आता खेळायला ! अहो नवी आई, येतो हं.

चांगुणा : या वरं, बाहेरचं खेळणं वगैरे आटोपून लवकरच या पुन्हा आम्हाला त्रास द्यायला ! ( चिलया जातो. )

चांगुणा : लहान मुलात काय बरं जादू असते ?

पार्वती : निर्विकार वृत्ति--( चिलया पुन्हा परत येतो. )

चिलया : छट्, आज खेळणं वगैरे काही नाही आता ! आज आम्ही या नवीन आईजवळ रहाणार ! आज आम्हाला आंघोळ वगैरे या नवीन आईनीच घातली पाहिजे ! ( पार्वतीच्या कमरेला मिठी मारून ) आणि ए माझ्या खऱ्या आई, तूहि जायचं नाहीस हं मला टाकून कुठं !

चांगुणा : आता बाळच तुम्हाला सोडीत नाही तेव्हा तुमची इच्छा परस्पर पुरली म्हणायची.

चिलया : चला ना, इथं का उभ्या आता ? पण कुणाचा हात धरून येऊ वरं मी आता–या आईचा का या आईचा ? पण एवढा विचार कशाला हवा–मला हातहि दोनच आहेत की !

( दोघींचा हात धरून चिलया आत निघून जातो. )

---

## प्रवेश चवथा

( स्थळ-रस्ता. वीरसेन आणि पुष्पधन्वा स्त्रीवेषात प्रवेश करतात. )

वीरसेन : एखाद्या वेळेला शेजाऱ्याचं पापसुद्धा आपल्याला नडतं म्हणून म्हणतात ते हे असं ! आता तू पुष्पधन्वा-बायको नसलेली बायको–माझ्याबरोबर आहेस म्हणून सरळ राजरस्ता सोडून, गावाबाहेरून रानातून, काटचाकुटचातून साडेतीन कोसाची प्रदक्षिणा करून टीचभर मुक्काम गाठायची पाळी आली मला ! आणि त्यातल्या त्यात मला आश्चर्य वाटतं तुझ्या वडिलांचं ! हा वेषांतराचा बेत तुझ्या वडिलांनाहि पसंत पडलेला ऐकून मी तर थक्कच झालो ! उलट तुझे वडीलच मला म्हणतात, की 'तिथं जी दानं आणि दक्षिणा मिळतील त्यातला तीन चतुर्थांश हिस्सा माझ्या मुलाचा-कारण यात माझ्या मुलाचीच कर्तबगारी जास्त आहे !' वावा रे, सर्व करामत तुझीच आहे ! जी दानं, दक्षिणा वगैरे मिळतील ती सर्व तूच घे बरं बाळ एकटचानं !

पुष्पधन्वा : 'इश्श ! अगबाई ऽऽ हे काय बाई बोलणं ?' मित्रा वीरसेना, खरं सांगतो तुला—स्त्रीजीवनांत खरं रहस्य आहे ! हे लाडिक लाडिक बायकी शब्द, शरीरांत अजिबात हाडं नसल्याप्रमाणं लचकत मुरडत चालणं, डोलणं—काय गंमत वाटतीय् म्हणून सांगू या स्त्रीवेषांत ! काही काही रूढी या बहुतेक जन्मजातच असतात, बरं का. नुसता स्त्रीस्वरूपाचा पदर डोक्यावरून घेतांच डोळ्यातल्या बुबुळांना अगदी घेरी आल्या-सारखं झालं आहे बघ—सारखी या टोकाची त्या टोकाला, त्या टोकाची या टोकाला अशी घरंगळत फिरताहेत नुसती !

वीरसेन : हे बघ, तुला काय काय भावना, काय काय होतं आहे ते आताच असं थोडं थोडं सांगून संपवून टाकू नकोस, सगळं एका ठिकाणी साठव आणि मग आपलं अनुभवामृत शेजाऱ्या-पाजाऱ्यांना त्यांच्या उपयोगाकरिता म्हणून फुकट वाट ! चल, चल लवकर, शक्य तितक्या लवकर या संकटातून मला मोकळं होऊ दे !

पुष्पधन्वा : 'काय ग बाई ही आपली विनाकारण घाई ?' मित्रा वीरसेना, बायकी वाक्प्रचार तरी बघ कसे आहेत ते ! पिचकारीतून रंगाच्या चुळा टाकाव्यात त्याप्रमाणं शब्दांची धार असते नुसती ! नाही तर तुम्हा पुरुषांच्या बोलण्यात सर्वच काही रानटी प्रकार ! ऐकलंस का लक्ष नाही माझ्या बोलण्याकडे तुझं ! माझ्या तात्पुरत्या प्राणसख्या, खरा अत्यंत रसिक मनुष्य म्हणजे-त्याचं बायकांच्या हालचालीकडे, प्रत्येक हावभावाकडे, निसुटल्या दृष्टिक्षेपाकडेसुद्धा कसं डोळ्यात तेल घालून लक्ष पाहिजे ! ( नुसतीच मान हालवतो. ) आणखी एक लाडिक सांगू का तुला ! अत्यंत रसिक बायकांचं बोलणं कसं असतं ? तर पहारेकऱ्याची नजर चुकवून किंवा पहारेकऱ्याशी दंगाधोपा करून कैद्यानं मुदत भरण्याच्या आत पळून जावं त्या प्रमाणं रसिक स्त्रियांचे शब्द ओठाच्या पहाऱ्यातून निसटून बाहेर पडतात. काही शब्द बाहेर पडताना घाईमुळं लचकतात, मुरकतात; उदाहरणार्थ, 'ऐकलं का, माझं किनई आपल्या बोलण्याकडे अजिबात लक्ष नव्हतं हो. तेव्हा म्हटलं, पुन्हा एकदा सांगावं आपण काय म्हटलंत ते !'

वीरसेन : जातीचा पुरुष असून स्त्रीरूपात क्षणार्धात मुरलेल्या

मोरावळ्या ! भाटासारखी वाटेतच काय वडवड सुरू केली आहेस ? येतो आहेस लवकर का जाऊ मी एकटाच ?

पुष्पधन्वा : पहातेच मी, मी आल्याशिवाय आपण एकटे कसे जाता ते ! आपण नसलांत तरी मी रसिक आणि ज्ञानवान आहे. ज्ञानवान स्त्री-दाक्षिण्ययुक्त रसिक माणसाचं लक्षण असं आहे, की तो स्त्रीसान्निध्याशिवाय आणि ती पुरुषसान्निध्याशिवाय कधीहि दिसायची नाहीत ! आपणहि तसंच वागायचं ! शहाणे असून मूर्खात का शिरायचं विनाकारण ! मी किनई इथंच थांबणार आहे क्षणभर, तोपर्यंत आपल्याला जवळपास कुठं फेरफटका करून यायचं असलं तर यावं, गडे ! काय बाई ही निसर्गाची अवर्णनीय शोभा—

वीरसेन : बरं आहे, आलोच तर मग मी !

( जातो. गुणवती व पुरुषवेषात कलावती प्रवेश करतात. )

कलावती : सखे, पहिल्यांदा जितका हुरूप वाटतो तितका काही तो अखेरपर्यंत टिकत नाही ! हा पुरुवेष मी घेतला आहे खरा अंगावर, पण मनानं कसा अगदी ठाव सोडला आहे ! हा वेष काही माझा स्त्रीपणा झाकू शकेल असं मला वाटत नाही ! खांद्यावर जरी ही शस्त्रं आणि डोक्यावर शिरोभूषणं घातली आहेत तरी थोडा वेळ गेला की पटकन नसलेला पदर सांवरण्याचीच लहर येते—वळून पहाताना केसाची आवराआवरच करावीशी वाटते ! एक ना दोन—नाना तऱ्हेनं फजिती होईल की काय अशी सारखी भीति वाटते आहे मला !

गुणवती : आणि मला भीति वाटते आहे तुझी ! तुझ्या या अशा स्वरूपात मी तुझ्याबरोबर हिंडते आहे——माझ्या चारित्र्यावर याचा काही तरी शितोडा येईल की काय असं वाटतं आहे

मला! कुठली तुझ्यासारख्या आचरटीच्या नादानं वागले अस झालं आहे मला! तू अगदीच गयावया केलंस—शपथा घालू लागलीस म्हणून माझा अगदीच नाइलाज झाला. पण गडे कलावती, हा कल्पनेचाच का होईना—उच्छृंखलपणा चांगला नव्हे ग बाई!

कलावती : आणि खरं सांगू का गुणवती, या दोन घटकेच्या वेषान्तरानं माझीहि तशी खात्री होत चालली आहे! पण हा मेला अभिमान आहे ना, आपली चूक योग्य वेळेला कळलेली असूनसुद्धा मनुष्य हटवादीपणा करतो तीच स्थिति माझी झाली आहे! एकदा पाऊल पडलं ते पडलं. आता मागं घ्यायचं? अं-हं—निदान आजचा प्रसंग तरी पार पाडायचाच!

गुणवती : पण खरं म्हणशील तर किनई—मला इथूनच परत फिरावसं वाटू लागलं आहे.

कलावती : असा दुबळेपणा मात्र मी तुला करू देणार नाही!

गुणवती : अग त्यांत कसला आला आहे दुबळेपणा! हे पहा, राजवाडा जसजसा जवळ येत चालला आहे तसं तसं माझ्या अंगाला कसं अगदी कापरं भरलं आहे. चल बाई, मी नाहीच आता तुझं ऐकत. चल, काढ तो पुरुषवेष. दे टाकून इथंच; आणि आपलं मोकळ्या मनानं परतू या घरी! मला किनई बाई भीति वाटते तुझी!

कलावती : अग चल भित्रे, आतापर्यंत मलाहि होती थोडीशी भीति वाटत; पण माझ्या अंगात आता पुन्हा शूरत्वानं प्रवेश केला आहे! अग, अशी अगदी निर्लज्जपणानं काय पहाते आहेस माझ्याकडे? मी बायको असले तरी पुरुषवेषात आहे हे विसरू नकोस! खरंच, गुणवती, माझ्याकडे पाहून काय ग वाटतं तुला?

...४

गुणवती : चल, वात्रट कुठली ! तुझ्याकडे पाहून ग काय वाटायचं आहे ? पुरे झालं आता हे तुझं सोंग. चल, टाक काढून तो पुरुषवेष. (कलावतीच्या अंगावरचा पुरुषवेष काढू लागते. ती काढू देत नाही. गुणवती तो नाद सोडते व बाजूला उभी रहाते.)

कलावती : हा, खबरदार पुन्हा माझ्या अंगाला हात लावलास तर ! (झाडाशी खेळत पुष्पधन्वा उभा असतो, त्याचे लक्ष या दोघींकडे जाते. तो हळूहळू पुढे येतो, गुणवती घावरते.)

गुणवती : गडे कला--

कलावती : हा ! खबरदार एक शब्द बोलशील तर--

गुणवती : मी वाटेतूनच निघून जाईन हं !

कलावती : आम्ही तुला जाऊं देणार नाही ! अं-हं-बोलण्याचा मात्र प्रयत्न करायचा नाही. एक वेळ मुकाटचानं निघून गेलीस तरी चालेल; पण तोंडातून शब्द नाही निघता कामा.

गुणवती : मग पडत्या फळाची आज्ञा घेऊन मीहि जातेच तर मग ! (गुणवती जाते. कलावती थोडी तिच्याबरोवर जाते, पण पुन्हा परतते. समोरून पुष्पधन्वा तिच्याकडे पहातो. एकमेकांची नजरानजर होते. स्त्रीवेषधारी पुष्पधन्वा लाजतो; पुरुषवेषधारी कलावती हंसते.)

कलावती : आपण कोण आहात ? आणि या रानावनातून अशा एकटचा का फिरताहात--भीति नाही वाटत आपल्याला ? बऱ्याच धीट दिसता एकंदर तुम्ही ! जसजशा बायका धीट बनत जातील--

पुष्पधन्वा : बायका धीट न व्हायला काय झालं ? आणि

इश्श--भीति कसली वाटायची रानावनातून एकटं फिरण्यात! सुसंस्कृत स्त्रिया हल्ली इतक्या घाबरट राहिल्या नाहीत! माझंच कशाला, आपली बायको नाही का रागारागानं आता एकटीच घरी निघून गेली!

कलावती : हो, तेहि खरंच! पण तिच्या या घाबरट धीट-पणामुळं आज माझं मात्र फार नुकसान होणार आहे!

(चाल:--मेघपटला)

विलासी जो जीव प्रेमी तशिच युवती त्याजला ।।
लाजणारी बावळी स्त्री, करिल फजिती चंचला! ।। ध्रु० ।।
टाकुनी ती जाइ आज। होय फार चांगले!
फिरुनि आले शोधण्याचे कार्य मजला आजला ।। १ ।।

पुष्पधन्वा: ते काय बाई! सांगण्यासारखं असलं तर सांगायला काही हरकत नाही.

कलावती : सांगायला काय हरकत आहे? आणि आपण जर इतकं आपलेपणानं विचारीत आहात तर आपणाला जरूर सांगायला पाहिजे.

पुष्पधन्वा : आपला स्वभाव किनई बाई फारच मनमोकळा आणि प्रेमळ दिसतो! सांगावं आपणाला काय सांगायचं आहे ते!

कलावती : अहो, आता ही जी स्त्री गेली ती माझी बायको नव्हे!

पुष्पधन्वा : अस्सं! मग आपलं लग्न ठरलं आहे वाटतं तिच्याशी--?

कलावती : छे:, तसंहि काही नाही!

पुष्पधन्वा : मग बाई खरंच नवल आहे हो ! लग्नाआधी परपुरुषाशी इतक्या मनमोकळेपणानं वागणं--मनाची संस्कृति ती हीच ! नाही तर मेलं सदान् कदा- यांत पाप आहे त्यात पुण्य आहे असं करीत बसायचं, आणि त्यामुळं हातून मात्र काहीच कार्य होत नाही ! बरं, मी असं विचारते आपल्याला, इकडे या रानात अगदी एकीकडे जमून कोणतं ध्येय गाठण्याचा विचार होता आपला ?

कलावती : अहो, कसलं ध्येय आणि कसलं काय ! एकमेकांच्या साह्यानं सांसारिक अडचणी दूर करायचा विचार ठरला होता आमचा ! आपल्या श्रियाळराजानं इच्छाभोजन सुरू केलं आहे ना त्यात दांपत्य म्हणून जेवून येऊन मिळतील ती दानं आणि दक्षिणा पदरात पाडून घ्यायचा ठरला होता आमचा विचार ! पण ही घावरट पोर मध्येच पळून गेली--

पुष्पधन्धा : मग ! मला बाई लाज वाटते आपल्याला विचा-रायला--माझा होईल का आपल्याला काही उपयोग ?

कलावती : म्हणजे ? आपलंहि लग्न अजून झालेलं नाही वाटतं !

पुष्पधन्वा : छेः हो, मी आपली सहज घरात करमेना म्हणून-माझ्या एका मैत्रिणीकडे मला जेवायला जायचं आहे, तेव्हा मी एकदम संध्याकाळीच घरी परत येईन, अशी थाप मारून इकडे तिकडे या रानात भटकते आहे ! अनायासा जर माझा उपयोग आपल्याला होत असेल--

कलावती : मला आतापर्यंत आपल्याविषयी बोलताना थोडं संकोचल्यासारखं वाटत होतं. पण आपला हा मनमोकळा आणि

धाडसी स्वभाव पाहून आपल्याविषयी माझ्या मनात अत्यंत उच्च दर्जाचं प्रेम निर्माण झालं आहे.

पुष्पधन्वा : खरच का ? नाही पण खरंच का हे ! आजचा बाई योगायोगच भाग्याचा हो ! अहाहा, प्रेम ! खरंच, प्रेम ही चीज काय अलौकिक आहे ! इश्श, असं लांवलांव काय सरायचं ते ! मनात अजिबात वरमायला नको हो. खरंच गडे, माझा हात धरून चलावं आपण दांपत्यभोजनाकरिता--हे हो काय असे लांब लांब सरतां--आपल्या मनातून मी इतक्यातच उतरले का ?

कलावती : नाही; प्रिये, तसं काहीएक नाही ! पण मनाला आपलं थोडं--पण त्यात काय आहे, चलाच तर मग लवकर; नाही तर उशीर होऊन पहिली पंगत बसून जाईल.

(कलावती पुष्पधन्वाचा हात धरून निघून जाते.)

---

## प्रवेश पाचवा

(स्थळ : राजवाड्यातील शिवमंदीर; सोन्याची साळुंखा. राजा श्रियाळ, सती चांगुणा, अमात्य व इतर दासदासी उभ्या आहेत. श्रियाळराजा शिवस्तवन म्हणत आहे. ' जटाकटाहसंभ्रमं ' हे स्तोत्र म्हटल्यानंतर साळुंखेतून ' श्रीशंकर ' अतिथिरूपाने प्रकट होतात व तिथून सर्व लोकांच्या मागच्या बाजूने जाऊन अगदी एकीकडे उभे रहातात. शिवस्तवन संपल्यानंतर–)

सर्वजण :

(चाल:—सूर्यमंडल नभी)

विश्वतारक प्रभो, शिवहरा शंकरा ! ।।
गिरिजावरा, उमामहेश्वर हलधरा ! ।। ध्रु० ।।
दैत्यसंहारणा, धाव मनमोहना ।।
प्रलयान्तका शिवा, विनति गंगाधरा ! ।। १ ।।

अमात्य : महाराज, सर्व अतिथि जेवायला बसले. त्यांच्या इच्छेप्रमाणं त्यांना इच्छाभोजन घातलं गेलं आहे. पुन्हा राजद्वाराबाहेर पुकारा केला. दाराशी आता कोणीही नाही ! दोनप्रहर उलटून दीड घटका झाली आहे. महाराजांनी आता जेवायला चलावं—— !

श्रियाळ : आज आमच्या मनाला विनाकारण जास्त उत्साह वाटतो आहे, आणि मनात आनंदीआनंद माजला आहे !

( चाल : इंटला ते हा )

घडु दे शिवा ही सेवा : आशा एकचि जीवा ।
मन शान्तिचा सुखयोग हा ।। ध्रु० ।।
हे पद शाश्वत सदैव लाभो । मंगल सारे जगात होवो ।
शिवहर शिवहर । सुखवी मला जपमंत्र हा ।। १ ।।

जेवणाखाणाचीहि शुद्ध मनाला राहिलेली नाही. आम्ही अजून काही वेळ उपाशी पोटीच देवासमोर बसणार आहोत. जा, आपण आत जा आणि आपल्या भोजनाची व्यवस्था करा !

( एक दासी प्रवेश करते. )

दासी : ( चांगुणेस ) राजवाड्यात नवीनच राहिलेल्या दासीनव्हे पार्वतीदेवी आपण आल्याशिवाय जेवायला बसत नाहीत;

आपण समक्षच त्यांना काही तरी सांगाव. का त्यांनाच हाक मारू इकडे ?

चांगुणा : नको, त्यांना नको त्रास देऊस—मीच येते त्यांना सांगायला. पण या पहा, देवी इकडेच आल्या वाटतं ! ( पार्वती देवी प्रवेश करतात. ) देवी, आमच्या पाठीमागं आम्ही हौसेनं पत्करलेली व्रतं-वैकल्यं नेहमीचीच आहेत; पण आमच्याकरिता आपण का विनाकारण त्रास करून घेता ?

पार्वती : सती चांगुणे, त्रास कसला त्यात ? व्रतं–वैकल्यं हीच मानसिक समाधानाची साधन आहेत ! तुमच्या सहवासामुळं मलाहि व्रतं–वैकल्यं घडतात याबद्दल तुम्हाला वाईट का वाटतं ?

चांगुणा : तसं नव्हे, पण आपण मघाशी सहज बोलताना म्हणालात ना, की श्रीशंकरावर आपली तितकीशी भक्ति नाही म्हणून ! आणि म्हणूनच आज आपण शिवस्तवनालासुद्धा हजर राहिला नाहीत–

पार्वती : आपला थोडासा गैरसमज झालेला आहे. श्रीशंकरावर माझी भक्ति नाही असं नाही, पण तुमची आहे तशी नाही, येवढंच. श्रीशंकरावर माझी भक्ति विरोधी थाटाची आहे.

चांगुणा : काय बरं याचं कारण ?

पार्वती : याचं पहिलं कारण असं की, श्रीशंकर हे अगदी भोळं दैवत आहे. वेळ पडली तर एखाद्या भक्ताच्या अगदी क्षणिक पश्चात्तापाच्या साध्याभोळ्या हाकेला ओ देईल; आणि जर का मनाची लहर फिरली, तर तुमच्यसारख्या शंकरभक्तीकरिता सर्वस्वाचा होम करणाऱ्या प्रेमळ सात्त्विक हृदयाची प्रचीति पाहण्याकरिता नाना तऱ्हेची कृत्रिम संकटे आणून, तुमच

सत्वहरण करण्याच्या नादी लागेल ! तसं पहिलं तर मनाच्या विचित्र लहरींशी सात्त्विकपणानं खेळणारं एक मनमोकळं दैवत आहे ! सुखविलास, सुखोपभोग यांच्या नादी न लागता स्मशानातच वस्ती आणि जातिवन्त नागाचे अलंकार ! देव-दैत्यांनी समुद्रमंथन करून निघालेली बहुमूल्य रत्ने आणि संपदा आल्यागेल्यांनी हातोहात लांबविली; पण समुद्रातून हालाहल विष निघतांच सर्वत्रांचा दाह होऊ लागला—आणि या भोळ्या दैवतानं हात पसरून तेच हालाहल मागून घेऊन पचवलं ! असलं विचित्र दैवत, म्हणून माझी त्या दैवतावर पूर्ण विरोधी भक्ति आहे !

चांगुणा : विरोधी भक्ति असायलासुद्धा प्रेम असावच लागतं ना ? आणि मला तर अस वाटतं, की प्रेमाचा अतिरेक म्हणजेच विरोध ! मग काय, नाही ना तुम्ही आपला हट्ट सोडीत ?

पार्वती : हट्ट कसला त्यात ? आणि मी आणखी प्रहर-दोन प्रहर उपाशी राहिले म्हणून तरी कुठं बिघडलं ? सती चांगुणे, आपण आपल्या मनाला का उगाच लावून घेता ?

चांगुणा : अहो, मन हे आपल्या स्वाधीनचं का आहे ! नाही म्हटलं तरी आपल्या या कल्पनांची आन्दोलनं मनामध्ये चालायचीच ! ( श्रियाळ राजास ) हे पहा, ह्या किनई हट्ट घेऊन बसल्या आहेत; मी जेवायला बसल्याशिवाय या जेवायला बसत नाहीत—आणि आपण जेवायला उठल्याशिवाय–

श्रियाळ : चला तर मग, मी तरी विनाकारण का उशीर करूं ? ( शिवस्तवन म्हणत उठतो. अतिथिरूप शंकर पुढे येतात. )

अतिथि : राजा, तू जेवायला चाललास ? पण तुझ्या दाराशी एक अतिथि अजून उपाशी उभा आहे.

श्रियाळ : ( आश्चर्याने पहात व नमस्कार करीत ) महाराज क्षमा असावी; आपण आल्याची वर्दी आम्हाला लागली नाही. चलावं, भोजनाची व्यवस्था खाली झालेली आहे.

अतिथि : पण राजा, माझी जेवण्याची व्यवस्था करायच्या अगोदर माझी जगण्याची काही व्यवस्था करशील का ?

श्रियाळ : म्हणजे ! महाराज, आपण कोणत्या संकटांत आहात ?

अतिथि : मी पोटशुळाच्या व्यथेनं पीडित आहे ! आज बारा वर्षं झाली, मी नेहमी रानावनांत हिंडणारा—नाना तऱ्हेची कंद-मुळं, वनस्पति औषधी म्हणून खाल्ल्या, पण गुण नाही ! शेवटी परवा एका योग्याने एक रामबाण औषध सांगितलं आहे, पण राजा, ते माझ्यासारख्याला कुठून मिळणार ?

श्रियाळ : महाराजांनी औषधी सांगावी, हर प्रयत्नानं मी ती आपणाला आणून देईन.

अतिथि : अहाहा ! राजा, किती रे कोमल अंतःकरणाचा तू ! मला तुझ्याजवळून औषधी मागायला संकोचल्यासारखं वाटतं आहे रे !

श्रियाळ : महाराज, संकोच वाटण्याचं काहीच कारण नाही ! आपलंच घर आहे असं समजा.

अतिथि : माझा आता नाइलाजच झाला आहे म्हणून सांगतो-राजा, माणसाचं मांस खायला सांगितलं आहे रे या व्याधीवर ! राजा, मी तुला संकटात घातलं नसतं, पण मला आप्त, सगे-सोयरे-की जे माझ्याकरिता मांस देऊ शकतील असे कुणीच

नाहीत रे ! शेवटचा उपाय म्हणून तुझ्याकडे आलो—पण तू संकटांत पडलेला दिसतोस. राजा, मनाला वाईट वाटून घेऊ नकोस. मी जातो आल्या वाटेनं ! ( जाऊ लागतो. )

श्रियाळ : नाही, अतिथिमहाराज,निराश होऊन परत फिरण्याचं तुम्हाला काहीच कारण नाही. बसा, असे या आसनावर बसा आपण ! मी आपल्या अंगाचं मांस काढून आपल्या व्याधिनाशा-करिता देतो. ( तरवार उपसून ) बोला, कुठलं मांस पाहिजे आहे आपल्याला ?

अतिथि : राजा, नको—हा नादच सोड तू ! तुझं मास खाऊन मी जगण्यापेक्षा–हजारो अतिथींचा पोशिंदा असा तूच जगलेला काय वाईट ! निष्कारण मी तुझ्या मनाला त्रास दिला ! राजा, वाईट वाटून घेऊ नकोस; जातो मी–

श्रियाळ : नाही, मी आपणाला विन्मुख जाऊ देणार नाही ! आपण म्हणता त्या कारणाकरिता नव्हे तरी दुसऱ्या कारणा-करिता मला जगलंच पाहिजे ! देवी चांगुणा माझ्यामागं जिवंत राहणं शक्य नाही. म्हणून माझी आणि देवीची अशा दोन हत्या होण्यापेक्षा देवी–

चांगुणा : बोलताना अडखळायचं काहीच कारण नाही ! अशा तऱ्हेनं देह जर कारणी लागणार असेल तर अतिथिमहाराज, त्याला माझीहि तयारी आहे.

पार्वती : ( देवी चांगुणेला बाजूला सारीत ) नाही; मती चांगुणे, तू असा आत्मत्याग करू नकोस. राजा प्रजेचा पिता आहे, तशी राणी ही प्रजेची माता–माउली. दीन अनाथांची माउली आहे ! व्हा; तुम्ही बाजूला व्हा, हे अतिथिमहाराज माझ्या ओळखीचे आहेत. अत्यंत विरक्त आणि साधुवृत्तीच्या या

पुण्यपुरुषाच्या जीवनसंरक्षणाकरिता मी आपल्या देहाचं मास काढून द्यायला तयार आहे·

अतिथि : पण राजा ! सती चांगुणा, तू किंवा ह्या, ह्यापैकी कुणाचंच मास चालणार नाही रे ! कारण त्या योग्यानं माणसाचं कोवळ लुसलुशीत मास खायला सांगितलं आहे या व्याधीवर !

अमात्य : ( श्रियाळ राजास ) महाराज, हरकत नाही; आणि आपण विचारात पडण्याचंहि काही कारण नाही ! जास्तीत जास्त दहावीस हजार मोहरा ओतल्या तर माणसाचं कोवळ लुसलुशीत मास आपल्याला कुठंहि पैदा करता येईल !

श्रियाळ : आमात्य, किती अधम प्रकारची कल्पना बोलून दाखविलीत ! आणि माझ्या हाताखालची माणसं इतकी अधम कल्पना मनात आणू शकतात—मला लाजेने खाली मान घालणं भाग आहे ! मी राजा आहे, भगवान शंकराने माझी प्रजा पित्याच्या ममतेनं सांभाळण्याकरिता माझ्या ताब्यात दिली आहे; मी त्या प्रजेचा कसाई बनू का ?

अमात्य : महाराज, माफी असावी. आपल्या राज्याच्या सीमेबाहेरून असा एखादा मनुष्य विकत आणू का ?

श्रियाळ : राज्याची सीमा—राज्याची सीमा ! अमात्य, माझ्या राज्याची सीमा जरी तुम्हाला आखून दाखविता येत असली तरी माझं मन इतकं क्षुद्र नाही ! अखिल विश्वात वास्तव्य करणारी मानवजात माझी प्रजा आहे—अखिल विश्वावर माझं प्रेमाचं साम्राज्य आहे ! देवी, या संकटातून सुटण्याकरिता आपल्याला सुचतो का एखादा मार्ग ?

चांगुणा : बाळ चिलया—

श्रियाळ : (चांगुणेस आलिंगन देऊन) शाबास, शाबास! माझ्या हृदया, शाबास! त्रिवार शाबास!! सात्त्विक त्यागाची परमावधि झाली! मी पुरुषासारखा पुरुष असून, माझ्या मनात कल्पना येऊन मी जे बोलू शकलो नाही ते देवी, तू—माता माउली—बाळ चिलयाची जन्मदाती बोलू शकलीस! तू चांगुणा नाहीस—माझी स्त्री नाहीस—निरपेक्ष त्यागाची मूर्तिमंत प्रतिमा आहेस. त्यागाच्या देवते, ज्या तोंडानं या कार्याकरिता आपण चिलयाचं नाव उच्चारूं शकला—त्याच तोंडानं त्याला हाक मारा!

चांगुणा : महाराज, हे सामर्थ्य मला भगवान शंकराच्या कृपेनं प्राप्त झालं आहे! बाळ चिलयाच्या प्रसूतीच्या वेळी मला भोगाव्या लागलेल्या प्रसूतिवेदना ज्यांच्या कृपाप्रसादानं मी भोगू शकले, त्यांच्याच कृपाप्रसादानं बाळ चिलयाच्या अंत्यवेदनासुद्धा—

पार्वती : सती चांगुणे, काय हा भलताच अविचार! थांबा. थोडया थांबा. माझ्या माहितीचे एक यति आहेत, त्यांच्याजवळ पोटशुळाच्या व्यथेवर दुसरं एखादं रामबाण औषध असणारच, नाही असं नाही! अतिथिमहाराज—

अतिथि : मग तुमचं म्हणणं काय, की इतर दुसऱ्या सहज-साध्य औषधी असतांना, केवळ राजाला संकटात घालण्याकरिता आम्ही इथं आलो! राजा, माझ्या पोटशुळाच्या व्यथेवर मला औषध मिळेल तेव्हा दे, नाही तर देऊ नकोस; पण माझ्या मनाला भ्रम उत्पन्न करणारी ही पीडा—

चांगुणा : देवी पार्वती, तुम्ही का उगीच मध्ये पडता? रोग्याला विनाकारण त्रास का देता?

पार्वती : सती चांगुणे, मी इथं आले कशाकरिता? ज्या

सुखाच्या आशेनं मी इथं आले त्याच सुखाचा नाश——! मग माझ्या इथं येण्याचा उपयोग तरी काय !

चांगुणा : मी तुमच्या पाया पडते, आपण आत जाऊन बसा ना जरा——

पार्वती : बरं देवी, मी आपली गप्प राहून सर्व सोहळा पहाते !

श्रियाळ : देवी, विनाकारण उशीर होतो आहे; आणि मनाचा काय नियम सांगावा ! जे मन या क्षणाला त्यागाला तयार आहे तेच मन पुढच्या क्षणी—!

चांगुणा : नाही; महाराज, माझ्याकडून अजिबात विलंब नाही ! हा पहा मी बाळाला हाक मारते. (थांबून) अरे देवा ! चातकी पाण्याच्या आशेन तोंड उघडते, पण पूर्वकर्माचा पडदा तिच्या तोंडात आडवा येऊन तिला पाणी पिता येत नाही त्याप्रमाणं होणार काय !

(चाल:——मोरा सैया रे )

नच आठवे येत न ध्यानी। का बाळा नाव न वदनी ।। ध्रु०।।

क्षण राहिला हा सहवास आता। मतिलाच माझ्या भ्रम काय झाला ? ।। १ ।।

बाळाचं नाव माझ्या तोंडी का येत नाही ? सांब सदाशिव सांब——सांब सदाशिव सांब ! झालं, मन शान्त झालं. चिलया, राजसा, माझ्या चिमण्या—— (चिलया येतो.)

चिलया : आई, मला हाक मारलीस ?

चांगुणा : (श्रियाळराजास) महाराज, जोपर्यंत ही मूर्ति दृष्टीआड होती तोपर्यंत माझा धीर ! अखेरपर्यंत माझा धीर मला धीर देणार नाही ! पुढचा प्रसंग आपणच निभावून न्या !

श्रियाळ : बाळा——

चिलया : काय, तात ? (श्रियाळराजाला मिठी मारतो.)

श्रियाळ : आलास, आनंद झाला. बाळ, तुझ्या येण्यावर एका अतिथीचं जेवण खोळंबून राहिलं आहे रे !

चिलया : ते का म्हणन ? हा मी आलो, सांगा काय काम आहे ते !

पार्वती : बाळा, ये असा इकडे; मी सांगते तुला ! मघाशी तू माझ्या आई म्हणून पाया पडलास, पण ते भाग्य माझ्या नशिबी कुठं आहे ! बाळ, ते अतिथि आले आहेत ना, त्यांना पोटशुळाची व्यथा आहे; त्या व्यथेवर लहान मुलाचं मांस औषधाकरता खावं लागतं. त्यांचा पोटशूळ बरा झाल्याशिवाय त्यांना जेवता येणार नाही; तेव्हा--

चिलया : (चांगुणेला मिठी मारून) थांव, थांव आई ! तुझे डोळे का ग पाण्यानं भरून आले ? मी लवकर आलो नाही म्हणून होय ? अग, मला किनई झोपच लागली होती आता; आणि त्या झोपेत असं एक मजेचं स्वप्न पडलं मला--एक अतिथि किनई आपल्या दाराशी आला आहे--पण काय ग आई, आताचे अतिथि कुठं आहेत ?

चांगुणा : ते बघ, बाळ, आसनावर बसले आहेत.

चिलया : (अतिथीकडे आश्चर्याने पहात) कोण ! कोण, कोण तुम्ही ? तुम्ही-आणि इथं कसे ? माझ्या स्वप्नातले अतिथि तुम्हीच--आणि तेच इथं कसे ! सांगा ना, की मी अजून जागाच झालो नाही ! आई, मला एक चिमटा घे ग--म्हणजे मी जागा आहे की झोपलेला आहे ते तरी कळेल मला !

चांगुणा : बाळ, तू पूर्णपणे जागा आहेस; पण आता मात्र तुला महानिद्रा घ्यावी लागणार आहे--मरायचं आहे तुला !

चिलया : आई, मरायचं म्हणजे ग काय करायचं ?

चांगुणा : देवलोकी जायचं ! बाळ, प्रत्येक माणसाला मरायचं हे असतंच; पण तुला लवकर मरावं लागणार म्हणून—

चिलया : खरंच आई, तुझी आई कुठं आहे ग ?

चांगुणा : माझी आई देवाघरी गेली, बाळ !

चिलया : मग आई, लवकर मरण्यात गंमत आहे ! नाही तर मग मी मोठा होणार--मग तू मरून देवाघरी जाणार—मला वाईट वाटणार ! त्यापेक्षा माझी आई आणि तात जिवंत असताना मी मरणार--देवलोकी जाणार ! आई, पण मला देवलोकातून तू दिसशील का ग ?

चांगुणा : दिसेन बरं बाळ !

चिलया : पण आई, मरतांना काही त्रास होतो का ग ?

चांगुणा : थोडासा होतो, पण देवाचं नाव घेत राहिलं तर तोसुद्धा होत नाही, बाळ !

चिलया : हात्तिच्या, मग मी तर देवाचं नाव नेहमी घेतो ! मग मला बिलकूल त्रास होणार नाही. पण आई, मरायचं ग कसं ?

चांगुणा : बाळ, ते काही मला सांगता येणार नाही; तू त्यांनाच विचार.

चिलया : हो, तेहि खरंच. श्रीगणेशा प्रथम मला बाबांनीच शिकवला, सकाळी उठून म्हणायची स्तोत्रं मला बाबांनीच शिकवली--म्हणजे असं की, कोणतीही नवीन गोष्ट मला प्रथम बाबाच शिकवणार ! बाबा, बाबा--सांगा ना मला कसं मरायचं ते !

श्रियाळ : (चिलयाच्या पाठीवरून हात फिरवीत) थांब बरं बाळ, सांगतो तुला !

चिलया : बाबा, मला मरायला हवं म्हणून तुम्ही आणि आईच सांगता, आणि मग रडता हो का तुम्ही ? तुम्हाला वाईट वाटत होय ! सांगा ना, मग मी नको का मरू ?

श्रियाळ : बाळ, तू एकदा आपल्या आईला कडकडून भेट, म्हणजे मग मी तुला काय करायचं ते सांगतो !

चिलया : आई, तुम्ही दोघांनी आज हे मांडलं आहे तरी काय ! सांग, तू का रडतेस ?—मी देवाघरी जाणार म्हणून ?

चांगुणा : नाही; बाळ, तू देवाघरी जाणार म्हणून मी रडत नाही ! मला वाईट एवढंच वाटतं, की माझा हा बाळ देवाघरी गेल्यानंतर मला या बाळाचे पुन्हा मुके घेता येणार नाहीत !

चिलया : हात्तिच्या, मग त्यात काय आहे ! आताच घेऊन टाक तुला किती मुके घ्यायचे आहेत ते ! हं, एक, दोन—हे ग काय आई, तू अजून रडतेस ? मी रडायला लागलो तर तू माझी समजूत करायचीस ते आज मीच तुझी समजूत करू वाटतं ! पुसू का मी तुझे डोळे ?

(चाल:––डोळे हे जुलमि गडे)

आई, का रडसि अशी ? । थांबवि तू आधि रडे ।।
पुसु का मी तव डोळे ? सांग मला सांग गडे ।। ध्रु० ।।
मी रडता समजविसी । हांसुनि मज हांसविसी ।।
परि तुज रडता बघुनी । येइ मला पाहि रडे ।। १ ।।

चांगुणा : नाही बरं बाळ मी रडत. हे पहा, पुसले मी आपले डोळे !

चिलया : थांब हं, तोपर्यंत बाबांना माझे काही मुके पाहिजेत का ते विचारतो!

चांगुणा : माझं गुणाचं बाळ ते--(चिलयाचे चुंबन घेते.)

पार्वती : बाळ चिलया ! लहान मूर्ति, पण अंतःकरणाचा उदार ! पण त्यांत नवल ते काय ! चांगल्या झाडावरचं हे फूल आहे, ते कितीही कोवळं असलं तरी मधुरच वास देणार !

चिलया : हं आई, आतां पुरे; किती झाले मुके —एक, दोन, तीन–चार--

चांगुणा : बाळ, तरीही ते मला अपुरेच वाटतात ! ( चिलयाला हृदयाशी धरते. श्रियाळराजाही गहिंवरून उभा रहातो. पार्वती व अतिथिरूप शंकर पुढे येतात.)

पार्वती : ( श्रीशंकरास ) आपलं हे भक्ताचं सत्त्व पहाणंच चाललं असेल ना ?

अतिथि : देवी, समजलो; तुम्हांला काय म्हणायचं आहे ते समजलो ! मला प्रलयाची देवता समजतात—–मला प्रलयरुद्र म्हणतात. आणि प्रलय म्हणजे सर्व विश्वाचं पाणी होणं ! बिचारा श्रियाळराजा, सती चांगुणा यांचे डोळे पाण्यानं भरून आले यात काहीच नवल नाही. पण मी प्रत्यक्ष प्रलयाची देवता असून सुद्धा हा प्रसंग पाहून माझे डोळे पाण्यानं भरून आले आहेत !

चिलया : थांब, थांब आई—–अतिथींचे डोळेसुद्धा पाण्यानं भरून आलेले दिसतात. अतिथिमहाराज, तुमच्या हो का डोळ्यांना पाणी आलं ?

---

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

( स्थळ : अरण्य; वीरसेन प्रवेश करतो. )

वीरसेन . त्या स्त्रीवेषात गुरफटलेल्या पुष्पधन्व्याचा तर अजिबात कुठंच पत्ता लागत नाही ! तो एखाद्या संकटात सापडला की सुखरूपपणे परत घरी पोहोचला ह्याचा जरी अद्याप मला काहीच उलगडा झालेला नसला, तरी त्याच्या कल्पनेतल्या त्या विचित्र दांपत्यभोजनातून मी मात्र सुटलो खरा ! बिचारा पुष्पधन्वा, अलीकडे सुधारणेच्या विचारानं अगदी वेडावून गेला आहे ! आणि त्याच्या दृष्टीनं सुधारणेला बायकांच्याशिवाय दुसरा विषयच नाही ! जे आहे त्यात काही तरी वदल करणं म्हणजे सुधारणा ! मनुष्य मनुष्यासारखा वागतो—नाही उपयोगाचं ! स्त्री-पुरुष लग्नाची बंधनं पत्करून संसार करतात. अरेरे काय हा निष्ठुर धर्म ! लग्न न करताच संसार करता आला पाहिजे ! बाकी पुष्पधन्व्यालाच हसायला नको. प्रत्येक मनुष्य कोणत्या तरी बावतीत थोडासा मूर्ख असतोच ! आता माझं स्वतःचंच उदाहरण पहा ना, माझ्याऐवजी माझे वडीलच माझ्या लग्नावद्दल घाई करीत आहेत ! त्यांच्या एका मित्राची मुलगी—काय बरं तिचं नाव—हं, गुणवती ! तिच्याशी म्हणे त्यांनी माझं लग्न ठरवलं आहे ! केव्हा !–आमच्या वडिलांना जेव्हा मीहि झालो नव्हतो आणि ती बिचारी गुणवतीहि जन्माला आली नव्हती तेव्हा ! आमच्या वडिलांचा आणि तिच्या वडिलांचा काय म्हणे करार ठरला होता—दोघांपैकी एकानं आपली मुलगी दुसऱ्याच्या मुलाला द्यायची ! आणि म्हणून तिचा आणि

माझा गळा गुंतवला जायचा आहे ! बरं, हरकत नाही; हेंहि मी कबूल केलं असतं. पण हे बिचारे स्नेहीस्नेही जे आमच्या लग्नाची प्रतिज्ञा करून निरनिराळ्या गावी रहायला गेले, ते आजतागायत एकमेकांनी एकमेकांचा चेहराहि पाहिलेला नाही ! ते आपल्या पत्रातून मुलीची वर्णनं करतात आणि आमचे तात या चिरंजिवाचे ' गुण ' त्यात कळवितात ! म्हणजे आतापर्यंत आम्हा वधुवरांना एकमेकांची माहिती एवढीच, की मी मुलगा आहे आणि ती मुलगी आहे ! आणखी काय जास्त माहिती पाहिजे ? मुलगी मुलानं तर नाहीच पण मुलाच्या बापानंहि पाहिलेली नाही—आणि मुलगा मुलीनं तर नाहीच पण मुलीच्या बापानंहि पाहिलेला नाही ! आता असं ऐकतो की, ते स्नेही सहकुटुंब इथंच रहायला येणार आहेत किंवा आलेले आहेत ! पहायचं आमच्या नशिबी आता काय रत्न आहे ते ! ( ऐकून ) अरे, पण कुजबूज कसली ऐकायला येते आहे ? ( कानोसा घेऊन ) एखाद्या वन्य श्वापदाची का कुणा तरी माणसाची आहे ही चाहूल ? काही दगाफटका तर नाही ! पण दगाफटका असला तरी मला काय त्याची पर्वा ! कमावलेल्या शरीरसंपत्तीशिवाय माझ्या अंगावर असं काय जडजवाहीर आहे म्हणून मला भीति वाटणार ? तरी पण सावध असावं हेच बरं ! ( जातो. )

( गुणवती हार गुंफीत गुंफीत प्रवेश करते. )

गुणवती : एका संकटातून सुटले तो अचानक या दुसऱ्या संकटात येऊन पडले ! कोणी सोबत भेटेल म्हणून पहात होते पण कोणीहि या बाजूला अजिबात फिरकतहि नाही ! या अशा एकांत ठिकाणी कसली बरं भीति वाटते ? पण नुसती भीतीहि वाटत नाही—तर एकीकडे कसल्या तरी निनावी आनंदाची

हुरहूर वाटते आहे. मग त्याच वेळेला मनात कसली बरं भीति वाटते आहे ? चला बाई, आता धीर धरावा आणि घरचा रस्ता गाठावा ! माझ्या मनात चाललेल्या विचारांचा माझा मलाच अर्थ कळेनासा झाला आहे. मनाला कसली बरं हुरहूर वाटते आहे ?

( वीरसेन प्रवेश करतो. )

वीरसेन : ( स्वगत ) चाहूल तर लागते आहे, आणि दिसत तर कुणीच नाही ! ( पाहून ) अरे बाप रे ! असं सुंदर नशीब एखाद्यालाच लाधतं ! संकटाची म्हणून अपेक्षा करीत उभा असताना सुंदर स्त्री नजरेस पडावी–तेचि पुरुष भाग्याचे ! अरे, पण एवढ्या भयाण अरण्यात—संध्याकाळची वेळ होत आलेली, आणि अशी ही एकटी स्त्री इथं मोकळ्या मनानं कशी हिंडते आहे? हा काय चमत्कार असावा बरं ! आपण हिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला तर त्यात हिची अमर्यादा होईल का ? अरे, पण माझे डोळे मला फसवीत तर नाहीत ! तो पहा, कोणी तरी हिंस्त्र पशूच लपत छपत चालला आहे वाटतं ! ( जातो. )

गुणवती : अहाहा, संध्याकाळचा गार वारा सुटू लागला, फुलझाडांवरची सुंदर टवटवी पुन्हा गंभीर स्वरूपानं मालवली जाऊ लागली, आणि आजच माझं मन असं उच्छृंखल कसं झालं आहे ! अजून घरी परत फिरावसं वाटत नाही. ते कलावतीचं पुरुषवेषातलं ध्यान गेलं कुठं तरी एकटंच निघून आणि मी एकटी–अगदी एकटी या रानात, रानातल्या राणीसारखी उभी आहे ! अहाहा, काय गंमत वाटते आहे या एकान्तात–आज घरी जाऊ नये असंच वाटत आहे मला ! इथंच आपल्या आपल्याशीच हसावं—खिदळावं—नाचावं बागडावं—असं एखाद्या लहान मुलासारखं वाटत आहे मला ! आणि घरी आई आणि बाबा

वाट पहात असतील ते ? अग बाई, घरची आठवणच मी अजिबात विसरले होते. हे एकान्ताचं सुख असंच टाकून मला पुन्हा घरी परतलं पाहिजे. ( सिंहाचे ओरडणे ऐकायला येते. ) अग बाई, निर्जन एकान्तात या आक्राळविक्राळ प्राण्याचं अस्तित्व असत हे मी अजिबातच विसरले होते. ( पुन्हा आरोळी ऐकायला येते. ) अग बाई, लपायला आडोसाहि कुठं नाही—आणि मी आडोशाला म्हणून लपावं आणि तोच एखाद्या हिंस्त्र पशूची गुहा असावी--असं झालं तर ? देवा, देवा, तू मला लवकर जागं केलंस ! हजारो वर्षांपूर्वी उत्पन्न झालेल्या या जगावर मी अजाण पोरीनं मत देणं धाडसाचं नव्हे का ? थोड्या वेळापूर्वी रानें मी चांगली म्हटलं; पण छे ग बाई--माणसांनी गजबजलेली शहरेच फार चांगली. ( पुन्हा आरोळी ) बहुतेक ही वनराजाचीच आरोळी दिसते आहे. बा वनराजा, मला जाऊ दे मुकाट्यानं, मी नाही बरं तुझ्या राज्यात रहात ! पण आता तुझ्या राज्या-तून माणसांच्या राज्यात जायला सोबतीशिवाय मला भीति वाटते आहे ! ( पुन्हा आरोळी ऐकायला येते. गुणवती गोंधळून उभी रहाते; रक्ताने भरलेली तलवार घेऊन वीरसेन प्रवेश करतो. )

वीरसेन : खरोखर, परमेश्वरानं जगाचं नाटक इतक्या दिवस जे ऐन रंगात चालविलं आहे ते केवळ एकमेकांच्या गैरसमजुती-वरच चालविलं आहे ! बिचारा वनराज मला पाहून घाबरला, मी त्याला पाहून घाबरलो ! वनराजाला वाटलं मी त्याचा जीव घेणार, मला वाटलं तो माझा जीव घेणार; आणि या परस्पर-विरुद्ध कल्पनेनंच आम्ही एकमेकांच्या अंगावर धावून गेलो. परमेश्वर कृपेनं मी त्यात विजयी झालो, एवढंच. अरेच्या !

मागची तरुणी अद्याप इथंच उभी आहे. माझ्या थकलेल्या मनाचं शान्तवन करण्याकरिता ही एखादी वनदेवता तर स्त्रीचं रूप घेऊन उभी नाही ना ! छे ! हिच्याशी दोन शब्द बोलून ओळख निर्माण केलीच पाहिजे. ( उघड ) माफ करा, आपणाला एक प्रश्न विचारणार आहे !

गुणवती : ( गोंधळून ) कोण ! कोण आपण ! वनराजाची आरोळी ऐकून मी गोंधळले होते. आपण शहरात राहणारे का इथंच रहाता आपण ? मला गावात परत जायच आहे, आणि सोबतीची अत्यंत जरूरी आहे ! पण हे काय ? आपल्या पायातून रक्त कसलं वहातं आहे ?

वीरसेन : रानावनात प्रवास करताना अशा जखमा व्हायच्याच ! चला· अंधार पडू लागला, आपण शहराकडे जाऊ.

गुणवती : छे बाई, अगोदर जखम बाधा. हं, फडकं आहे का तुमच्याजवळ एखादं ?

वीरसेन : छे, फडकं कठून असणार माझ्याजवळ !

गुणवती : थांबा हं, ( नेसत्या लुगड्याचा पदर फाडून ) थांबा, अगोदर जखम बांधते आणि मग बोला काय ते! (गुणवती वीरसेनाची जखम बांधू लागते. )

वीरसेन : ( स्वगत ) स्त्रीचं अंत:करण एकंदरीत मायाळूच ! स्त्रिया मातेचं प्रेम करोत, वहिणीचं प्रेम करोत, पत्नीचं—पण त्या प्रेमाची आपल्याला अद्याप काहीच कल्पना नाही ! पण हिच्या हस्तस्पर्शानं मला काही तरी अननुभूत संवेदना होत आहेत ! ( उघड ) नका नका, तुम्ही तसदी घेऊं विनाकारण ! पुरुषाचं मन उतावळंच असतं का ? चला, चला व्हा बाजूला

तुम्ही एका ठिकाणची जखम बांधी आहात, पण त्याच वेळी माझ्या मनाला दुसऱ्याच ठिकाणी जखम होत आहे!

गुणवती : पाहू, पाहू आणखी कुठं लागलं आहे ते ?

वीरसेन : आता काय सांगू तुम्हाला ! पहिली जखम झालेली उघडउघड दिसतेच आहे; पण तुमच्या हस्तस्पर्शामुळं माझ्या अंतःकरणांत जखम होत आहे ! व्हा, बाजूला व्हा; रानावनात सहजासहजी होणाऱ्या जखमा मी सहन करू शकतो, पण आपल्या हस्तस्पर्शामुळं होणारी जखम—नाही, तो धीटपणा माझ्या अंगी नाही !

गुणवती : अग बाई, काय बोलता आहात तुम्ही ? पुरुषाची जातच ही अशी म्हणतात ते काही खोटं नाही ! अशा एकान्त स्थळी, आजूबाजूच्या या नयनमनोहर वातावरणांत, सायंकाळच्या या मधुर शान्तीच्या वेळी परमेश्वराच्या भक्ताचे विचार मनात आणायचे सोडून—

वीरसेन : पण प्रेम म्हणजे परमेश्वरच, नव्हे का ?

गुणवती : नाही, प्रेम हा रोग आहे. आपल्या या आताच्या बरळण्याला का प्रेम म्हणायचं ? अशा या पहिल्या भेटीतच वाटणाऱ्या प्रेमाला रोग म्हणतात ! खऱ्या प्रेमाचा जन्म त्यागात असतो—

वीरसेन : सांग, सांग ! देवी, तसहि सांग ! तुझ्या प्रेमाकरिता मी कसला त्याग करू ?

( चाल : बान नैनोका )

सांग कांहीही आज्ञा करी प्रेमे मला ।
प्रेम दावू कसे तरी ? सखे गे तुला ! ॥ ध्रु० ॥
वीषाते खाऊनिया ? प्राणा का देऊनिया ? ।

कैसे मी दिव्य तुला ? दावू गे करुनिया ? ।
सांग ह्मणी काय मनिषा ? सखे प्रेमे मला ॥१॥

गुणवती : मला बाई लाज वाटते तुमच्यासारख्या माणसाशी बोलायची ! मी काय बळी घेऊन शान्त होणारी एखादी क्रूर रानवट देवता आहे म्हणून मला विचारता, कीं माझ्याकरिता कसला त्याग करूं म्हणून ? त्याग हा विशिष्ट वेळी करायचा असतो. प्रेम म्हणजे काय विक्रीला मांडलेला पदार्थ आहे, कीं आपलं वाटेल त्यानं वाटेल त्या वेळी म्हणावं—की हा पहा त्याग आणि कुठं आहे तुझं प्रेम ?

वीरसेन : प्रेम आंधळं म्हणतात तेच खरं. माझी सर्व विचार-शक्ति या प्रेमानं नष्ट करून टाकली.

गुणवती : पाहिलंत, प्रेम हा रोग आहे का परमेश्वर आहे याचं लक्षण ! प्रेम हे जर परमेश्वरस्वरूप असतं तर प्रेमामुळं विचारशक्ति न जाता उलट तुमचा उत्साह द्विगुणित झाला असता. पण तुमचं प्रेम हे रोगासारखं असल्यामुळं तुमची सर्व विचार-शक्ति नष्ट झाली. बरं आहे, परतायचं ना आता शहरांत ?

वीरसेन : पण देवी, आपण मला प्रेमाचं--लग्नाचं वचन दिल्याशिवाय माझं पाऊलच मुळी घरी जायला निघत नाही; त्याला मी तरी काय करू ?

गुणवती : पण तसं वचन मला या जन्मी तरी तुम्हांला देता येणार नाही. माझं लग्न अद्याप झालेलं नसलं तरी ठरलेलं आहे; आणि लग्नाकरिताच मी इथं आलेली आहे. आता तुमची माझी ओळख झालेलीच आहे, तर माझ्या लग्नाचं आमंत्रण मात्र आपल्याला देण्याची व्यवस्था मी करीन.

वीरसेन : हाय रे दुर्दैवा ! अहो, मग प्रश्नोत्तराची इतकी लांबण कशाला हवी होती ! तसं माझं हृदय नाजुक नाही—एकाच उत्तरात माझ्यावर आताच आलेली प्रेमाची धुंदी एका झटक्यात नाहीशी झाली असती ! पण आपलं लग्न ठरलं हे नक्की का ?

गुणवती : हं ऽऽ !

वीरसेन : हंऽऽ ! आता मोडणं शक्य नाही ना ?

गुणवती : अं हंऽ ! मला किनई बाई, फार वाईट वाटतं हो !

वीरसेन : बरं आहे, मग काय करायचं आता त्याला ! निदान आपल्या लग्नाच्या अगोदर किंवा जास्तीत जास्त आपल्या लग्नाच्या वेळी तरी, मला कुठं तरी माझं लग्न जमविलंच पाहिजे !

गुणवती : म्हणजे, माझ्या लग्नाला यायचा आपला विचार नाही वाटतं ?

वीरसेन : सध्या तरी मला काहीच सुचत नाही. चला, आता आपण अगोदर शहरात परतू या. (जातात.)

---

## प्रवेश २ रा

(स्थळ : राजवाड्यातील बगीचा; चिलया विटीदांडू खेळत प्रवेश करतो.)

चिलया : आज सोमवार, आज कायसं म्हणे मला मरायचं आहे ! अजूनपर्यंत मी कुणी मरतांना पाहिलेलं नाही ! आणि म्हणूनच मला मरण्यात गंमत वाटते आहे ! विटीदांडू खेळायला आज कोणी जोडीदारच भेटला नाही. चला, आपलं आपणच खेळावं ! (विटी उडवतो.) प्रश्न एकच आहे, मला मरायचं

आहे का काय करायचं आहे त्याबद्दल आमची आई आणि तात एवढे खिन्न का? बरं, मरायचं कशाकरिता? एका अतिथी-करिता! आम्ही राजे आहोत! आमच्याकडे कुणी काहीहि मागायला आलं तरी आम्ही ते त्यांना दिलं पाहिजे! आमचे तात आजपर्यंत देत आले आणि मीहि हे व्रत पुढं चालवणार! हो, आपल्यापाशी जे आहे ते दुसऱ्याला द्यायला काय हरकत आहे? पहा, माझ्या अंगावर एकसुद्धा अलंकार नाही; अहो, टिकतच नाही मुळी अंगावर! एखादा सवंगडी म्हणतो, हे मला पाहिजे;—जा बाबा घेऊन. बरं, आता माझ्या अंगावर काही नाही तो आता कुणी मागतहि नाही! कालपासून सर्व परिवार, दासदासी एकसारखी माझ्यामागं आहेत! शेवटी मी त्यांना इतका कंटाळलो की त्या सगळ्यांची नजर चुकवून हा इकडे आलो. अरे हो, आसपास नाही ना कुणी! हो, काय नियम सांगावा—-यायचंहि इकडे कुणी! (एकीकडे पहात उभा रहातो; एक दासी येते.)

दासी : युवराज--

चिलया : अरे बाप रे, आलं वाटतं कुणी तरी! चला, आपण येथून पळ काढावा! (दासीकडे पहातो व हंसतो.) आता पुन्हा शिवाशिवीच्या खेळाला सुरवात हं! (धांवत जातो.)

दासी : युवराज, युवराज—असाल तसे मागं फिरा, आपणांला आपल्या मातोश्रींची शपथ आहे! (चिलया गंभीरपणाने एक एक पाऊल टाकीत पुढे येतो.)

चिलया : काय म्हणणं आहे आपलं? (गालांतल्या गालांत हंसतो.) पुन्हां एकवार बजावून सांगतो--आमच्या मातोश्रींची

शपथ आम्हांला पुन्हां कोणीही घालतां कामा नये ! आज, उद्यां परवा–केव्हांही नाही !

दासी : पण युवराज, आपण उद्यां पहाणार आहांत का? आपल्याला उद्यां उजाडणार आहे का ? नाही– नाही बरं पुन्हा मी आपल्याला शपथ घालणार ! युवराज—

चिलया : काय म्हणतां ? उद्या उजाडणार नाही ! आश्चर्य आहे ! आश्चर्य आहे ! आजपर्यंत असं कधीही झालेले नाही ! मला माहीत आहे, की तो सूर्य कुणाशी तरी लपंडाव खेळत असतो; आणि मग त्याला फसविण्याकरितां आम्हीही झोपी जातो. पण त्या सूर्याला तरी फार वेळ कुठं करमतं आमच्या-वांचून ? लगेच उठवायला येतो आम्हांला पुन्हां !

दासी : युवराज, युवराज ! आपण अजून फार अल्लड आहात, आपल्याला काही कळत नाही ! आज सोमवार ! संध्याकाळी आपणावर मोठा घोर प्रसंग गुदरणार आहे ! कोण मेला तो अतिदुष्ट चांडाळ अतिथि आला आहे—

चिलया : हा, खबरदार ! अतिथीला अतिदुष्ट आणि चांडाळ म्हणणारी तू कोण ? आम्हांला काही कळत नाही म्हणतेस, आणि स्वतः तूच वेड्यासारखी अतिथीला नावं ठेवतेस ? आमचे तात आल्या–गेल्या अतिथीचा किती सत्कार करतात, आणि तू—

दासी : युवराज, रागावू नका— रागावू नका––तुम्ही कितीहि म्हटलंत तरी मला त्या अतिथीला शिव्याच द्याव्याशा वाटतात! एकदा सांगितलं ना तुम्हाला, की तुम्ही अद्याप अजाण आहात तुम्हाला काही कळत नाही ! आज रात्री–हाय ! उद्या काही आमचे युवराज आम्हांला पुन्हा दिसणार नाहीत !

चिलया : ते का म्हणून ?

दासी : काय म्हणून काय सांगू ? युवराज, आपण समजता तितका मृत्यु आनंददायक नाही ! मृत्यु तुमची आमची ताटातूट करील ! पुन्हा तुम्ही आम्हांला दिसणार नाही—आम्ही तुम्हांला दिसणार नाही ! बिचाऱ्या चांगुणादेवी--एकुलत्या एक चिलयाच्या, युवराज तुमच्या विरहानं काय करतील आणि काय नाही याचा नियम सांगता येत नाही !

चिलया : काय, आम्ही मेलो तर आमची आई आम्हांला दिसणार नाही ? असंच असेल तर मृत्यु फार वाईट आहे ! माझी मृत्यूबद्दलची कल्पना इतकी वाईट नव्हती ! आमचा एक सवंगडी एकदा 'भाकरी' म्हणून काही तरी म्हणाला; मी त्याला विचारलं, 'भाकरी' हा काय पदार्थ आहे ? तर तो म्हणाला, 'तो एक खाण्याचा पदार्थ आहे.' म्हणून आम्ही आईजवळ हट्ट घेऊन म्हटलं, 'आम्हाला भाकरी खायला दे.' तर आई म्हणाली, 'तू राजा आहेस, असलं हलकं खाणं आपण खाऊं नये !' मी समजत होतो आम्ही 'राजे' म्हणून--आम्ही 'श्रीमंत' म्हणून जशी भाकरी आमच्याकरिता नाही, तसाच मृत्यूहि आमच्याकरिता नसावा ! पण मृत्यु माझ्या वाटणीला का आला हे आता माझ्या लक्षात आलं. एक दिवस मी आईच्या नकळत माझ्या एका गरीब सवंगड्याकडे जाऊन 'भाकरी' खाल्ली, आणि म्हणूनच मृत्यु मला भेटायला येत असावा ! एकूण लहान मुलांनी मोठ्या माणसाचं ऐकावं हेच खरं. आईबाप अंतरणार असतील तर मृत्यु ही फार वाईट गोष्ट आहे. पण आता वाईट असो चांगली असो, आपण ती कबूल केली खरी ! पण चल, तूच मुळी वाईट आहेस. मृत्यूबद्दल मला आतापर्यंत

भीति वाटत नव्हती ती तू माझ्या मनांत भरवून दिलीस. अगदी वाईट--वाईट आहेस तू. जा, जा तू. माझ्या डोळ्यासमोरून ! पण नको, पुन्हा तुम्ही मला कुणी दिसणार नाही ना ? आणि म्हणूनच तू माझ्या शोधाकरिता धांवत आलीस !

दासी : युवराज, तुमचं सान्त्वन आता मी कोणत्या शब्दांनी करू ? मी आपली भोळी भावडी, आणि तुम्हा थोरामोठ्यांचे एकेक शब्द प्राणांच्या किंमतीचे ! दिलेला शब्द कोण पालटणार ! महाराज, राणीसाहेब, किंवा युवराज तुम्ही--कोणी कोणीसुद्धा आपला शब्द पालटणार नाही; आणि म्हणून तुम्ही मोठे आहात! आणि तो मेला देव तरी अशांच्याच राशीला बसलेला असतो त्यांचा छळ करायला !

चिलया : मला ते काही समजत नाही, पण देव जर असा विनाकारण छळ करीत असता तर त्याला कुणी देवच म्हटलं नसतं. जी माणसं देवासारखं वागायला लागतात त्यांची देव परीक्षा घेतो--आणि आपण त्याला वाईट म्हणतो, दुसरं काही नाही. पण तू जा आता माझ्या डोळ्यासमोरून--माझं मन तू बिघडवून टाकलंस. मी किती सुखासमाधानानं मरणार होतो,पण आता मला रडायला येत आहे !

( गझल )

हाय मनाला। धीर न उरला।
मृत्यु आला। समीप आला ! ॥ ध्रु० ॥
मरण येई तो। आईजवळी।
बसूनि घेतो। काळ पातला ! ॥१॥

(अर्धे पद म्हणून झाल्यावर देवी पार्वती प्रवेश करतात.)

चिलया : आई—आई—आई ! दुसरं काही नाही, आता फक्त आई ! मी आता असा तडक जाणार आणि आईच्या मांडीवर जाऊन निजणार ! (जाऊ लागतो. देवी पार्वती चिलयाचा हात धरतात.)

पार्वती : बाळा राजसा, कुठं चाललास तू धांवत धांवत ?

चिलया : दुसरा कुठं जाणार ? मी आता आपल्या आईच्या मांडीवर निजणार ! खरंच, माझ्या नव्या आई, मला किनई काही सुचेनासं झाल आहे ! चला ना, तुम्ही तरी इथं का थांवता ? तुमचा हात धरूनच मी येतो; मला किनई आता कुणाचा तरी आधार पाहिजे.

पार्वती : थांब हं बाळ, आपण बाळाच्या आईलाच इकडे हाक मारूं. (दासीला) जा ग, देवी चांगुणेला इकडे पाठवून दे.

दासी : वरं, देते त्यांनाच इकडे पाठवून. (जाते.)

पार्वती : वाळा, तुझं मन असं अस्थिर कशानं झालं ? आज सकाळपर्यंत तर तू अगदी शान्त होतास.

चिलया : होय, आज सकाळपर्यंत अगदी शान्त होतो; कारण मरणाची सुखदु:खं मला काहीच माहीत नव्हती. आणि आता माझ्या मनामध्ये विचारांचा गोंधळ उडून गेला आहे ! पण अतिथीकरिता मी मरायचं जे कबूल केलं आहे ते शब्द मी कधीच माघारी घेणार नाही. आजच सकाळी त्या अतिथींनी मला जवळ बोलावलं—आईच्या हाकेसरशी मी जितक्या प्रेमळपणानं धांवत जातो तितक्याच प्रेमानं मी त्यांच्याजवळ धांवून गेलो. त्यांनीहि मला प्रेमभरानं मांडीवर घेतलं आणि बोलण्याच्या नादात—लहान मुलांच्या कानात आपण ज्याप्रमाणं 'कुर्रर्र' करून ओरडतो—तसं काहीसं पुटपुटून ते स्वत:शीच हंसले आणि त्यांनी

मला जायला सांगितलं! पण तेव्हापासून माझा मात्र गोंधळ उडून गेला आहे. इकडे पाहू का––तिकडे पाहू का––असं मला झालं आहे! आणि आता तर मी पुरताच गोंधळून गेलो आहे! आई, चला, मी आता माझ्या आईकडे जातो.

पार्वती : थांब ना बाळ जरा. तुझी आई येईलच आता इकडे.

चिलया : बरं तर मग, मी या झोपाळ्यावर झोके घेत बसतो तोपर्यंत!

(टांगलेल्या झोपाळ्यावर बसून झोके घेत बसतो.)

पार्वती : सात्त्विक आणि साधंभोळं दैवत म्हणता म्हणता आज सत्त्व पहाण्याचा बराच चोखंदळपणा चालविला आहे! राजस चिलया अज्ञान असून सत्त्वस्थ मातापित्याप्रमाणं दातृत्वाला जागतो आहे, म्हणून त्या पोराच्या कानी ज्ञानवायूची फुंकर मारून––कळीवर फुंकर मारून बळजबरीनं तिचं फूल बनवावं त्याप्रमाणं––बाळ चिलयाच्या मनाचा सावळागोंधळ उडवून दिला! बरं आहे म्हणावं––मलाहि काही जमतं का पहाते. सत्त्वस्थ श्रियाळराजा आपल्या पोराचं मांस द्यायला तत्काळ तयार झाला—तर भावनांचा उद्रेक ओसरून कदाचित् श्रियाळ-राजा आपल्या शीलापासून चळेल किंवा चळला तर पहावा या बुद्धीनं 'पोटशुळाच्या व्यथेवर मांसाहार करण्यापूर्वी दोन दिवस निराहार रहायला पाहिजे' असं त्या योग्यानं मला सांगितलं आहे! म्हणून बहाणा करून दोन दिवसांची मुदत लांबवून घेतली! श्रियाळराजा व सती चांगुणा आपल्या सत्त्वापासून ढळणं शक्यच नाही. मला काळजी वाटते बाळ चिलयाची! मीहि त्याला मोहनी घालून ठेवते म्हणजे त्याला कसल्याहि सुखदुःखाची आच लागणार नाही! (उघड) बाळा, चल ये इकडे; आपणच

तुझ्या आईकडे जाऊं आता ! (चिलया पुढे येतो. पार्वती त्याच्याकडे रेखून पहाते. पहाता पहाताच चिलया गालातल्या गालात हंसू लागतो व लगेच डोळे मिटून खाली मान घालून उभा रहातो.) इतक्या निष्पाप अंत:करणाला मोहनी घालायला कितीसा वेळ लागणार ? (चिलयाला जवळ घेऊन त्याच्या पाठीवर थोपटीत) बाळा, झोप का आली तुला इतक्यात, उभ्याउभ्याच पेंगायला लागलास !

चिलया : काय ?

पार्वती : तू आपला नेहमीचा जप म्हण पाहूं !

चिलया : सांब सदाशिव सांब––सांब सदाशिव सांब––सांब सदाशिव सांब ! ! !

पार्वती : आता हाच जप पण मनातल्या मनात म्हण हं ! (चिलया त्याप्रमाणे करतो. देवी पार्वती त्याला कडेवर उचलून घेतात.) आता म्हणावं या बाळाचं आपल्याला जितक्या निष्ठुरतेनं सत्त्व पहायचं असेल तितक्या निष्ठुरतेनं खुशाल पहा !

(जातात.)

---

## प्रवेश तिसरा

(स्थळ रस्ता; कलावती आणि पुष्पधन्वा प्रवेश करतात व एकमेकांकडे पहात उभी रहातात.)

कलावती : केवढ्या प्रसंगांतून पार पडलो आपण ! आपल्याबद्दल कोणालाही काही संशय आला नाही. 'चांगुणादेवीनी आपल्याला दांपत्य म्हणून शुभाशीर्वादही दिले. पण खरंच,आपल्याला विचारायचंच राहिलं, आपलं नाव काय ?

पुष्पधन्वा : माझं नाव ! माझं नाव पुष्पधन्वा.

कलावती : अग बाई—पुष्पधन्वा ! (लाजते.)

पुष्पधन्वा : अरे बाप रे, अग बाई ! नाव काय आपलं ?

कलावती : माझं नाव, माझं नाव–माझं नाव कलावती.

पुष्पधन्वा : अरे बाप रे !

कलावती : हे काय बाई काही तरीच ! बायकाचं नाव म्हणे पुष्पधन्वा !

पुष्पधन्वा : आणि पुरुषाचं नाव कलावती—

कलावती : खरंच बाई, (पुष्पधन्व्याकडे पहात ) आपण जर खरंच पुष्पधन्वा असाल तर आपल्या रसिकपणाला बाई सीमाच नाही ! आज अशा या विचित्र वेषांत मी आपलं मन आपल्याजवळ उघड करते. आपल्या लक्षांत आलंच असेल–हो, काय बरं म्हणत होते मी–आपल्याला या स्त्रीवेषांत पाहून माझ्या मनाचं किनई अगदी खरं खरं समाधान झालं हो ! खरंच, आपल्या नेहमीच्या पोशाखापेक्षा हा स्त्रीवेषच जास्त शोभतो आपल्याला ! खरंच सांगते ना, अगदी वेष घेतल्यासारखं वाटतच नाही मुळी ! अहो, मीसुद्धा फसले ना तुमच्या या वेषाला आतांपर्यंत !

पुष्पधन्वा : अहो, तुम्ही फसलांत यांत काहीच नवल नाही ! अहो, माझा मीसुद्धा फसलो होतो आतापर्यंत ! केवळ माझं नाव मी बदललं नव्हतं, आणि आपण मला नाव विचारलंत--पण मी मात्र रसिकपणानं इतका अंतर्बाह्य स्त्रीरूपात रंगून गेलो होतो, की पुष्पधन्वा या पुरुषी नावामुळंच मी आता जागा झालो. नाही तर आतापर्यंत मला वाटत होतं की—मी—

कलावती : थट्टा करता झालं; इतका काही विसर पडायचा नाही आपला आपल्याला !

पुष्पधन्वा : अहो, आता काय सांगू तुम्हांला ? खरोखरच मी या स्त्री-भूमिकेशी इतका तन्मय झालो होतो की—आता माझ्या मनांत काय विचार चालले होते बरं—

कलावती : कसले विचार चालले होते—आठवत नाहीत वाटतं ? खरंच, मला तुमच्या या अभिनयाची गंमत वाटते. सांगा बरं आठवण करून तुमच्या मनांत काय विचार चालले होते ते !

पुष्पधन्वा : थांबा, सांगतो हं आठवण करून—हं, आलं लक्षांत ! असं वाटलं की, आपण आता घरी गेलो आणि तिथं कुणी आपल्याला आपलं नाव विचारलं तर नाव काय सांगायचं?

कलावती : अग बाई, अगदी पूर्णपणे तुमची तंद्री स्त्रीस्वरूपांत लागलेली दिसते आहे ! आता कशाला नाव आठवायला हवं ? आपण आता हे वेषान्तर टाकून—

पुष्पधन्वा : नको, असेच फिरूं या आपण गावातून जरा ! आपल्या अभिनय कौशल्याची तेवढीच आपली जास्त खात्री होईल ! (तोंड फिरवून उभा रहातो.)

कलावती : इश्श्, हे काय ! मध्येच अशी गिरकी काय मारलीत ?

पुष्पधन्वा : मी लाजलो आता !

कलावती : मला बाई लाज वाटते तुम्हाला असं लाजतांना पाहून ! इश्श् !

पुष्पधन्वा : अग बाई, इश्श् म्हणालांत तुम्ही ! अहो, पुरुष ना तुम्ही ?

कलावती : अग बाई, खरंच की !

पुष्पधन्वा : ह्या वेषान्तरानं फार धांदल होते बुवा ! कुणी

काय म्हणायचं, कुणी काय करायचं—काहो लक्षात रहात नाही !

कलावती : हो बाई, असं होतं आहे खरंच !

पुष्पधन्वा : अग बाई, पुन्हां बाई ! छट्, ते नाही उपयोगाचं ! आपलं कार्य संपलं. आता आपण आपआपले वेष पालटू.

कलावती : पण काय हो, भारीच बाई धारिष्टवान् तुम्ही ! एका अज्ञात पुरुषाबरोबर स्त्रीवेष घेऊन जायला तुम्ही कसे हो धजावलांत ?

पुष्पधन्वा : चूक झाली माझी ! पण हाच प्रश्न मी तुम्हाला विचारला तर ? आपण पुरुषवेष घेऊन माझ्यासारख्या अज्ञात स्त्रीबरोबर जायला कशा तयार झालात ? मी काय, कसाहि निभावून गेलो असतो ! पण संकटाची भीति माझ्यापेक्षा आपल्यालाच जास्त होती ! काय ?

कलावती : काय काय—ठीक आहे ! आपल्याला मी तेव्हांच ओळखलं होतं !

पुष्पधन्वा : हे परिणामावरून नंतर रचलेलं नाटक वाटतं ! ठीक आहे; आपली सबब मान्य आहे ! चला, पुन्हा हे वेषांतर करून परतू या आपण आपआपल्या घरी. ( दोघे दोन बाजूंनी निघून जातात; वीरसेन प्रवेश करतो. )

वीरसेन : मी असं साफ म्हणतो, की आमचं लग्न आमच्या वडिलांना ठरवायचा काय अधिकार ? आम्ही पूर्ण शहाणे आहोत, आमचं आम्हालां सर्व कळतं आहे ! वडील माणसांना लग्न ठरविण्याकरिता मुलाचं अगर मुलीचं जन्मकुल, शील, सांपत्तिक

स्थिति, होय नव्हे--सत्रा पंचायतीची चवकशी करावी लागते; पण आमचं तसं नाही, आमची गति शीघ्र आहे. माणूस पाहून आम्ही लगेच लग्न ठरवतो ! मला या सगळ्या गोष्टीचा एकदम संताप यायचं कारण म्हणजे गुणवतीचं तिच्या वडिलानी परस्पर ठरविलेलं तिचं लग्न ! अजून गुणवतीचं लग्न कुणाबरोबर ठरलं आहे याचा काहीच थांगपत्ता लागत नाही. पण तो एका दिवसात लावतो. आणि एकदा त्याचा पत्ता लागला की ह्यांच्या आणि त्याच्या घरच्या माणसांच्या कानात ओततो काही तरी वीष ! मग अशा तऱ्हेनं तिचं एकदा ठरलेलं लग्न फिसकटलं की गुण-वती माझी झालीच ! बस्स, गुणवती ! तिच्याशिवाय मात्र जीव जमत नाही--मन रमत नाही ! (चिंताग्रस्त चेहऱ्याने उभा रहातो तो स्त्री वेषांतच पुष्पधन्वा प्रवेश करतो.)

पुष्पधन्वा : गडे कलावती, घात झाला ग घात झाला ! (वीरसेनाच्या खांद्यावर हात टाकतो.)

वीरसेन : काय म्हणतोस, बाळा ?

पुष्पधन्वा : चांडाळा ! चल, चालता हो इथून ! तू इथं कसा ? आणि आतां इथं असलेली स्त्री कुठं गेली ? अरेरे ! तिच्यासारखी गुणवती--

वीरसेन : हरामखोरा ! पुन्हा नाव तर घे तिचं--

पुष्पधन्वा : माझ्या प्रियेचं मी नाव घेतलं, तू का रागावतोस बाबा ?

वीरसेन : कोण, गुणवती--आणि तुझी प्रिया ? अरे हराम-खोरा ! खोटा स्त्रीवेष घेऊन असले धंदे करतोस काय ? मित्र म्हणून एकवार सोडून देतो तुला, पण याद राख पुन्हां तिचं नाव काढलंस तर--(कलावती येते.)

कलावंती : पुष्पधन्वा, अहो पुष्पधन्वा, घात झाला ! अग बाई ते नव्हेत ! अरे बाप रे ! हे कोण ?

पुष्पधन्वा : प्रिये, घाबरण्याचं काहीच कारण नाही ! हा माझा जीवश्चकंठश्च मित्र आहे; याचं नाव वीरसेन ! पण हे काय, तू अजून वेष नाही पालटलास ! आणि घात कसला झाला ?

कलावती : आता सांगू तुम्हाला, आणि कसं सांगू ! पण तुमचं काय झालं ? अजून तुम्हीहि स्त्रीवेषांतच कसे ?

पुष्पधन्वा : आता काय सांगू आणि कसं सांगू तुला !

कलावती : म्हणजे ?

पुष्पधन्वा : म्हणजे काय ? आता असंच !

कलावती : आता असंच म्हणजे कसं ?

पुष्पधन्वा : आता आहे असंच !

कलावती : म्हणजे म्हणता तरी काय ? माझंही तसंच !

वीरसेन : अरे, हा काय चावटपणा चालवला आहे तुम्ही ! आता असंच काय आणि तसंच काय ! काय आहे भानगड ? आणि तुझी गुणवती ती हीच कलावती वाटतं ? काय रे भानगड आहे ?

पुष्पधन्वा : सगळ्या जन्माचीच भानगड झाली आहे !

कलावती : अग बाई, आता मी कशी आणि कोणत्या तोडानं जाऊं ?

पुष्पधन्वा : तुझं ठीक आहे; पण माझे मात्र आता पुरे हाल झाले ! आता काय करूं--करूं तरी काय ? माझं हे असंच झाल्यामुळं माझ्या वडिलांना सून यायच्या ऐवजी जांवई येणार !

वीरसेन : म्हणजे ?

पुष्पधन्वा : माझ्याशी आता कुण्णी बोलू नका ! (तोंड फिरवून बसतो. )

कलावती : मलाहि आता अगदी तोंड लपवून बसावं असं वाटतं आहे ! (तीहि तोंड फिरवून बसते.)

वीरसेन : आणि मला तुमच्याकडे न्याहाळून पहात रहावंसं वाटतं आहे ! मित्रा पुष्पधन्वा—

पुष्पधन्वा : आता कसला कर्माचा आला आहे पुष्पधन्वा ! देवाची थट्टा केली—दांपत्य म्हणून जेऊन आलो—थट्टेनं घेतलेला वेष कायमचा अंगाला चिकटला ! (पटकन् उभा रहातो.) आता जन्मभर पदर सावरीत उभं रहाणं भाग आहे ! मित्रा, वेषान्तर लयाला गेलं ! तुला थट्टा वाटेल--श्रियाळराजाच्या आशीर्वादानं मी आता पूर्णपणं स्त्री झालो आहे ! आता काय करू ?

वीरसेन : मित्रा, शान्त हो--

कलावती : अहो पण तुमचं शान्तवन करायला तुमचा मित्र तरी तुम्हांला भेटला. पण मला धीर द्यायला कोण हो आहे ! पुन्हा तीच कर्मकहाणी काय सांगू ! मी आता वेषधारी पुरुष राहिले नसून खराखुराच पुरुष झाले—आता बाबा काय म्हणतील, आई काय म्हणेल—वहिणी काय म्हणतील-भाऊ काय म्हणतील—

वीरसेन : हे पहा, अशा गांगरून जाऊ नका ! यातून तुमच्या सुटकेचा मार्ग मी तुम्हांला सांगतो ! श्रियाळराजा हा महान् शिवभक्त असल्यामुळं त्यानं दांपत्य म्हणून दिलेला आशीर्वाद असा विचित्र तऱ्हेनं फळाला आला ! तेव्हा तुम्हांला या कृत्रिम सत्यातून जर सुटायचं असेल तर पलीकडच्या रानात एक जागृत शिवालय आहे तिथं जाऊन श्रीशंकराची प्रार्थना करा--म्हणजे तुम्ही पुन्हा पूर्वस्वरूपात याल. पण तत्पूर्वी (दोघांचे हात एक-

मेकांच्या हातात देऊन) 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!' असा ह्या ब्रह्मचाऱ्याचा तुम्हांला आशीर्वाद आहे!

पुष्पधन्वा : तुला थट्टा सुचते तरी कशी? नाही, ते काही नाही--मी शंकराला प्रसन्न करून घेणार आणि पुन्हा खराखुरा पुष्पधन्वा बनणार!

कलावती : चला तर मग, घरी न जाता आपण परस्पर शिवालयातच जाऊं. पण काय हो, अष्टपुत्रा सौभाग्यवती भव असा आशीर्वाद तुम्ही आताच कसा देता? आम्ही पुन्हां पूर्व स्वरूपात आल्यानंतर--

वीरसेन : समजा, जरी तुम्ही पूर्वस्वरूपात आलात तरी बदलाबदल तुमच्या तुमच्यातच व्हायची आहे; तेव्हा आशीर्वाद आताच द्यायला काय हरकत? (पुन्हा एकमेकांचे हात एकमेकांच्या हातात देतो.) अष्टपुत्रा सौभाग्यवती भव! (जातात.)

---

## प्रवेश ४ था

(स्थळ : राजवाड्यातील शृंगारलेला महाल; अतिथीकरिता उच्चासन मांडले आहे. समया लावलेल्या आहेत. देवी चांगुणा, देवी पार्वती, अमात्य वगैरे उभी आहेत. सुरवातीला एकदोन मिनिटे मधुर वाद्ये वाजतात, नंतर पडदा उघडतो. इतक्यात श्रियाळराजा अतिथीचा हात धरून प्रवेश करतो.)

श्रियाळ : या उच्चासनावर बसावं आपण! देवी, अतिथिपूजेची तयारी आहे ना?

अमात्य : होय, महाराज! (पूजासाहित्य चांगुणेच्या हाती

देतो. देवी चांगुणा एक एक पूजासाहित्य श्रियाळराजाच्या हाती देते. श्रियाळराजा अतिथीची पूजा करतो.)

अतिथि : राजा, एकीकडे तुझ्या या अतिथिसत्काराबद्दल आनंद वाटतो आणि एकीकडे वाईटहि वाटतं. मला वाटतं तुझ्या या भोळसट वृत्तीचा अनेकांनी अनेक तऱ्हेनं फायदा घेतला असावा; आणि मी त्यापैकीच एक आहे असंच तुलाहि वाटत असेल. तुझ्या पुत्राचं मांस खाऊन मी आपली पोटशूळाची व्यथा बरी करून घेणार ! पण त्यामुळं तुला पुत्रशोकाची केवढी जबरदस्त व्यथा व्यथा होणार आहे याची आम्हांला पूर्णपणे कल्पना आहे. राजा, समज, उद्या एखादा अतिथि तुझं राज्य दान म्हणून मागायला आला तर ?

श्रियाळ : महाराज, राज्य दान द्यायला मी कुठं समर्थ आहे? जे जे म्हणून माझं आहे ते ते मी दान द्यायला तयार आहे ! माझं म्हटलं जाणारं राज्य माझ्या प्रजेचं आहे ! जी माझी खाजगी संपत्ति आहे तिचंच दान द्यायला मी मुखत्यार आहे; आणि मी जे आतापर्यंत दान---नव्हे त्याग करीत आलो तो भोळसट वृत्तीचा नाही. इहलोकी जी जी सुखदु:खं भोगणं मला शक्य होतं ती ती मी आपल्या शक्तीप्रमाणं उपभोगिली आहेत. माझ्या सर्व मनोभावना पूर्ण झाल्या आहेत. आता एखाद्या रोगानं एक एक गात्र गलित होऊन वैभवहीन होण्यापेक्षा, मी आपल्या ऐन उमद्या स्थितीतहि एक एक वैभवाची भूषणं त्यागाच्या रूपानं दूर करीत आहे. ह्या त्यागात माझं समाधान आहे; माझ्या मनाची शान्तता आहे ! जे दान मी देतो किंवा जो त्याग मी करतो त्याच्या बदला ईश्वराकडून शंभरपटींनी--सहस्रपटींनी काही मिळेल या हावऱ्या अपेक्षेवर तो केला जात नाही. भगवान चंद्रमौली व मी यामध्ये

असणारी ही वैभवाची लांबण तोडून मी मधलं अंतर कापीत आहे. आणि भगवान चंद्रमौलीचं सान्निध्य लाभल्यानंतर-वैभवाची फिकीर कोण करतो ?

अतिथि : पण राजा, ' भगवान चंद्रमौली ' हा तरी काल्पनिकच ना ? तुला त्याचं प्रत्यक्ष दर्शन कधी तरी घडलेलं आहे का ?

श्रियाळ : होय, रात्रंदिवस भगवान चंद्रमौलीचं दर्शन मला घडतं.

(चाल : जय मनमोहन)

हा शिव व्यापक श्रीत्रिपुरारी । तारक प्रभु संकटकाली ।। ध्रु० ।।
जगता सकलही व्यापुनिया उरली श्रीगुरु शंकर माउली ।। १ ।।

आपणहि प्रत्यक्ष भगवान चंद्रमौलीच आहात. अतिथिमहाराज, मी आपल्याला सांगायला हवं असं नाही, अखिल विश्वात त्याचं वास्तव्य आहे. प्रत्येक प्राणिमात्रात सूक्ष्म वा स्थूलरूपानं त्याचा वास आहे ! आम्ही आपल्या मनाप्रमाणं त्याच्या स्वरूपाची कल्पना करतो. पण त्याचं खरं स्वरूप म्हणजे ' तेज ' —' स्वयं-प्रकाशी ' तेज ! तुम्ही सूर्याच्या प्रकाशाकडे पहा, अग्नीच्या तेजाकडे पहा, मनाला उत्साह आणि समाधानच मिळेल. प्रत्येकाच्या अंत:करणात तेच तेज दडून बसलं आहे. मनाची व्यग्रता न होता आपल्या शरीरांतील तेज बाहेरच्या तेजात मिळवून दिलं की तीच मुक्ति ! देवी, बाळ चिलयाला हाक मारलीत का ?

चांगुणा : महाराज, वेळ होताच आज्ञा व्हावी, मी बाळाला घेऊन येते.

अतिथि : मग राजा, बाळ चिलयावर रे तुझा काय

....१

अधिकार ? बिचारं अज्ञान बालक ! विनाकारण त्याच्या जिवावर उदार होऊन तू आपल्या दानाचा आणि त्यागाचा डंका बडविणार !

श्रियाळ : महाराज, विनाकारण का आपण माझा बुद्धिभेद करीत आहात ? बाळ चिलया––माझा प्राण––या देहवेलीवर उगवलेलं ते फूल आहे ! ज्या हक्कानं माझ्या राज्याचा वारस बाळ चिलया झाला असता त्याच हक्कानं त्याच्या मांसाचं दान मी आपल्यासारख्या अतिथिरूप परमेश्वराला करीत आहे ! आणि महाराज, आपल्यालाहि मानवी अंतःकरणाची कल्पना आहेच. खऱ्या पित्याला स्वतःच्या देहापेक्षा आपल्या अपत्याच्या देहाचं कोडकौतुक किती असतं हे मी का सांगायला हवं ? आपण तरी माझ्याकडे मांसाची मागणी करण्याच्या अगोदर 'राजा, मला आप्त––सगेसोयरे की जे माझ्याकरिता आपल्या अंगाचं मांस देतील असे कोणी नाहीत रे !' म्हणून नकाराचा पाढा वाचलात याचा तरी अर्थ काय बरं ?

अतिथि : देवी चांगुणे, श्रियाळराजा म्हणतो याला तुझीहि संमति आहेच; येवढंच नव्हे तर चिलयाचं मांस द्यावं म्हणून तूच राजाला सुचविलं आहेस ! मला वाटतं तुमच्यासारखे निर्दय मातापिता बिचाऱ्या चिलयाखेरीज अन्य कुणालाच लाभले नसतील ! खरं सांगतो राजा तुला, माझ्याच मनाचा गोंधळ उडाला आहे !

चांगुणा : महाराज, मला वाटतं आपल्या मनाचा गोंधळ उडाला नसून आमच्या मनाचा गोंधळ उडवायचा आपला विचार आहे ! पण खऱ्या पति-पत्नीचे विचार नेहमी एकरूपच असतात.

(चाल: पहाडी धुमाळी)

वांछित जे पतिला। सतिला ते शुभकर वाटे ।। ध्रु० ।।
दो हृदये परि जीवेभावे। संगित एकचि प्रेमे गाती।
ते शुभकर वाटे ।। १ ।।

पत्नीला पतीच्या विरहित दुसरी काही इच्छाच नसते! आणि बाळ जर खरा कुलदीपक असेल तर तो काहीहि विचार न करिता मातापितयांच्या इच्छेचीच घोषणा करील.

पार्वती: आणि देवी, आजचे अतिथीहि थोडे तऱ्हेवाईकच दिसतात नव्हे! मागितलेली वस्तु मिळत असतांना–ह्या ना त्या तऱ्हेची टाळाटाळ करणं—तऱ्हेवाईकपणाचीच साक्ष देतात! देवी चांगुणे, तुम्ही तरी का उशीर करता पण? बाळ चिलयाला हांक मारा. का अतिथिमहाराज, पोटशुळाच्या व्यथेचं ढोंग करून श्रियाळराजाला त्याच्या इच्छाभोजनाच्या व्रताबद्दल खिजविण्याकरितांच आपण आला आहांत?

अतिथि: मला इथं तर सगळा राक्षसांचाच बाजार भरलेला दिसतो आहे! सर्वांपेक्षां आपला स्वतःचा जीव प्यारा, म्हणून पोटशुळाच्या व्यथेपासून स्वतःचा जीव बचावण्याकरितां मी मांसाची मागणी केली––हा अगोदर माझाचा निष्ठुरपणा––या निष्ठुरपणाबद्दल मी माझ्या जिवाला खात होतो! आणि इथं पहावं तर निष्ठुरपणाचा बाजारच भरलेला दिसतो आहे! बाळ चिलयाच्या मातोश्री या काही तत्त्वाकरिता स्वतःच्या पोटच्या पोरावर उदार––तर या आणखी वर घाई करायला तयार! राजा, यांना स्वतःचं असं मूलबाळ काहीच दिसत नाही रे!

श्रियाळ: अतिथिमहाराज, विनाकारण कालक्षेप करण्यांत

काय अर्थ आहे ? आम्ही आपला बाळ चिलया आपल्याला दान दिला आहे.आपण आपल्या मर्जीनुरूप त्याचा उपयोग करून घ्यावा.

अतिथि : राजा, म्हणजे मला काय तू वाघ, सिंह वगैरे हिंस्र पशू समजतोस ? तुझ्या पोराला मी तसाच खाऊन टाकू ? नाही राजा, जर तुला दान द्यायचं असेल तर पुरतं दान दे. मला लहान मुलाचं शिजविलेलं मांस पाहिजे आहे !

श्रियाळ : बरं आहे; चिलयाचं मांस शिजवून देतो ! देवी चांगुणे, यांत मनाला विषाद वाटण्याचं काहीच कारण नाही. सुख दुःख या दोन्ही संवेदनाच. सुखाचे जसे विलास असतात, बाळ चिलयाचं चुंबन–हंसणं–खेळणं वगैरे--त्याप्रमाणं, देवी, चिलयाचं मांस शिजवून अतिथीला घालतांना आपल्याला दुःखाचे विलास भोगायचे आहेत ! अतिथिमहाराज, जे मला शक्य आहे व जे माझं आहे अशी कोणतीही गोष्ट--बोला, ती मी आपणांला द्यायला तयार आहे ! अतिथिमहाराज, आपल्याला आश्चर्य वाटत असेल—कदाचित् भोळसट वृत्तीनं हा वेडेपणा आम्ही करीत आहोत असंही आपणाला वाटेल–पण तसं नाही ! हा आमचा एक इच्छित ध्येयाचा ध्यास आहे. कुणी आपल्या प्रिय माणसाकरिता स्वतःचं बलिदान करील कुणी स्वतःच्या धर्माकरितां स्वतःचं बलिदान करील—सर्वांचं ध्येय, सर्वांचे मार्ग एकसारखेच; फक्त त्यांच्या कल्पना निराळ्या ! सर्व प्रकारच्या ध्येयसिद्धींचा गुरुमंत्र एकच आणि तो म्हणजे त्याग ! ज्यांचा ज्याचा त्याग अधिक तो यशाचा जास्त वाटेकरी. मला माझ्या स्वतःचा अभिमान वाटतो; आणि अतिथिमहाराज, अशी ही संधि मला आणून दिल्याबद्दल मी आपला उपकृत आहे. समजा, आपण माझं स्वतःचंच मांस मागितलं असतंत तर मी ते

आनंदानं दिलं असतं. पण—पण—स्वत:च्या पोटच्या पोराचं मांस देण्यांत अधिक उच्च—उच्च दर्जाचा त्याग आहे. अतिथि-महाराज, गोष्ट सामान्य नाही. श्रियाळराजाचे डोळे आजपर्यंत कोणत्याही सुखदु:खाच्या अगदी अतिरेकाच्या वेळीसुद्धा पाण्यानं भरून आले नाहीत. पण आज तोच श्रियाळराजा स्वत:च्या लहान मुलाकरिता एखाद्या अजाण बालकाप्रमाणं डोळ्यांतून पाणी काढतो आहे!

अतिथि : म्हणजे? पण राजा, या तुझ्या अश्रु ढाळण्यानं तुझ्या त्यागाला हीनपणा येत नाही का?

श्रियाळ : नाही; महाराज, नाही! माझ्या अश्रु ढाळण्यानं माझ्या त्यागाला हीनपणा येत नसून उलट माझे हेच अश्रु माझ्या दानाला 'वैभवशाली' बनवीत आहेत! महाराज, आपणच सांगा—निष्ठुर माणसानं गंमत म्हणून केलेलं दान खरं दान या स्वरूपाला प्राप्त होईल का? वारांगनेनं केलेल्या पातिव्रत्याच्या सोंगाला आपण पातिव्रत्य म्हणाल का? महाराज, मी बाळ चिलयाचं आपणाला देत असलेलं दान अंत:करणापासूनचं आहे. त्याबद्दल अंत:करणांत आनंदाचे आवेग येत आहेत. पण भोळी माया डोळ्यावाटे रडते आहे, त्याला कोण बांध घालणार? जो त्याग केला असतांना अंत:करणाला जाणवत नाही तो खरा त्यागच नव्हे! तो हृदयहीन त्याग निव्वळ उधळमाधळीच्या स्वरूपाचाच होय.

अतिथि : राजा! शतायुर्भव—चिरंजीव हो! भगवान शंकर हे भोळं दैवत म्हणून प्रसिद्ध आहे—हृदयाच्या क्षणिक पण तीव्र पश्चात्तापाच्या भावनेलासुद्धा कळवळून ओ देणारं आहे! असं असतांना तुझ्यासारख्या भक्ताचा अजून उद्धार का झाला नाही हे

आता माझ्या लक्षांत आलं. कारण तुझी भक्ति भोळीभाबडी नाही. तू भक्तीचा व्यापार मांडलेला नाहीस--परिणामाविषयी तू बेफिकीर आहेस; आणि सात्त्विक त्यागाचा तर तू कर्मयोगच आरंभिला आहेस ! तुझं आयुष्य संपत नसून तेजस्वितेनं तेवत आहे ! आणि त्यातूनच तेज निर्माण होऊन ते इतरांना मार्गदर्शक होणार आहे ! प्रत्यक्ष ईश्वरी अवतारानं जे कार्य व्हायचं असतं ते तुमच्यासारख्यांच्या जीवनानं थोडंबहुत होत असतं. प्रत्येक प्राणिमात्रांत ईश्वरी तेज बीजरूपानं असतं म्हणतात, ते तुझ्याकडे पाहून खरं वाटायला लागतं. कारण हलक्या मनोवृत्तीतून उच्च मनोवृत्तीत आल्याशिवाय प्रत्यक्ष पोटच्या पोराचं मांस द्यायला कोण तयार होणार ? राजा, माझ्या मानभावीपणाची मला क्षमा कर. सती चांगुणे ! अहाहा, माऊली ! तूं धन्य धन्य आहेस ! अरेरे, जिच्या पोटी जन्म घेतल्यानं भाग्याचा ठरणार तिच्याच पोटच्या पोराचं मांस--

चांगुणा : पोटशुळाच्या व्यथेकरिता मागायला काहीच हरकत नाही ! अतिथिमहाराज, यात आपल्याला वाईट वाटण्यासारखं आपण काय करीत आहांत ? आपण आम्हांला जाणून बुजून का त्रास देता आहात ? पोटशूळाच्या व्यथेवर साध्यासुध्या औषधी गुण देत नाहीशा झाल्या—व्याधी असाध्य ठरली--तर असाध्य झालेल्या व्याधीवर औषधीहि अशीच काही तरी चमत्कारिक असणार ! आपण मनाला बिलकूल वाईट वाटून घेऊ नका. अहो, असं समजा—भाग्य आमचं, की आपल्यासारख्या पुण्य पुरुषाची इच्छा पूर्ण करण्याचं साधन आमच्याजवळ—आमच्या बाळाच्या राजस चिलयाच्या रूपानं आहे--! हेच आम्ही जर निपुत्रिक असतो तर मग आमचा आपल्याला काय उपयोग झाला असता ?

अतिथि : मी काय बोलू आणि कोणत्या तोंडानं बोलू ? आपल्या मुलाचं मांस खाण्याची इच्छा मी प्रदर्शित केली आहे; आपण त्याला रुकार दिला आहे. आता मला माघारहि घेता येत नाही ! श्रियाळराजा, सती चांगुणे, आपण मूळचेच भाग्यवान् आहात ! आपल्या मुलाचं मांस भक्षण करून माझी पोटशुळाची व्यथा थांबल्यानंतर हा अतिथि आपलं सारं आयुष्य तुमच्याच सान्निध्यात घालवील ! तुमच्या वैभवात यामुळं काही भर पडणार आहे असं नव्हे; पण मग माझ्यासारख्या भणंगानं तरी तुम्हासारख्या प्रेमळ हृदयाखेरीज दुसऱ्या कुठं रे वास करायचा ?

चांगुणा : (श्रियाळराजास) महाराज, बाळ चिलयाला हाक मारायची का ?

श्रियाळ : बाळ तयार आहे ना ? देवी, घेऊन या त्याला इकडे.

चांगुणा : बाळानं तर कमालच करून सोडली आहे. दोनतीन घटका झाल्या, त्यानं बोलायचंच अजिबात सोडून दिलं आहे. काहीहि विचारा—प्रेमानं हाक मारा किंवा कुरवाळा, 'सांब सदाशिव सांब, सांब सदाशिव सांब' या नाममंत्राखेरीज तो काही बोलतच नाही ! आणि त्याची वृत्तीहि समाधि लावून बसल्यासारखी शान्त आहे ! महाराज, स्वतःचीच स्तुति करून घेते आहे, पण रहावत नाही. असा बाळ पोटी आल्याबद्दल मनाला समाधान वाटतं आहे. पार्वतीदेवी, क्षमा असावी, आपल्याला आज्ञा करीत आहे; पण पोटच्या पोराच्या त्यागाच्या भावनेनं माझं मन इतकं उदात्त झालं आहे, की जिकडे तिकडे माझंच रूप आणि सत्ता आहे असं मला वाटतं आहे ! माझ्या

बाळाला--नाही, तो आता माझा नाही, आता तो जगन्नियंत्याचा आहे--घेऊन या बाळराजाला--

पार्वती : देवी, खऱ्या त्यागाचं माहात्म्यच असं आहे ! सती, माझी तर गोष्टच सोडून दे, पण अशा वेळेला जरी तूं अधिकारानं प्रत्यक्ष आदिमायेला हाक मारलीस तरी तिला तुझ्या शब्दाकरिता धावून येणं भाग आहे ! आलेच हं बाळराजाला घेऊन. पण देवी चांगुणे, हा पहा--हा पहा तुझ्या पुत्रप्रेमाचा अखेरचा सोहळा पाहून घे. बाळ चिलया आपल्या पायांनी मरणाच्या द्वारी येत आहे ! ('सांब सदाशिव सांब' असे म्हणत चिलया येतो व शान्त मुद्रेने मध्ये उभा रहातो.)

श्रियाळ : अश्रूंनो, मागं सरा ! अंतःकरणात उतू येत असलेल्या पुत्रवात्सल्या, मागं फीर ! हृदयात थैमान घालणाऱ्या भोळसट माये, तूं आपले पाश माझ्यावर टाकू नकोस ! श्रियाळराजाचा शब्द त्याची प्रजा पाळते, नवल नाही. पण तेच शब्द श्रियाळराजाच्या अंतःकरणात वास्तव्य करणाऱ्या षड्विकारांनी पाळले पाहिजेत ! अहाहा, आनंद आनंद आनंद आनंद ! मृत्यूची बिशाद काय माझा मृत्यु माझ्या डोळ्यांसमोर बाळ चिलयाच्या बालिश स्वरूपात उभा आहे ! बस्स्. हेच भाग्य-स्वतःचं मरण स्वतःच्या डोळ्यांनी पहातो ! आहे कोण अलौकिक सोहळा हा ! पुत्रस्वरूप परमेश्वरा ! हा श्रियाळराजा तुला नमस्कार करतो आहे !

चांगुणा : बाळा, त्याबरोबर या भाग्यवान मातेचंहि तुला शतशः नमन आहे ! फुलझाड जाग्यावर रहातं आणि त्याच्यावरची फुलं मात्र देवाच्या मस्तकी जाऊन पडतात; त्याप्रमाणं आम्हांला जाग्यावर ठेवून तूं कैलासाकडे एकटाच निघून चाललास.

शंकराची मर्जी ! महाराज, कांही काळ थांबा, ही देवमूर्ति एकवार माझ्या हृदयफलकावर उतरून घेऊं द्या ! बाळा—

चिलया : सांब सदाशिव सांब ! सांब सदाशिव सांब ! ! सांब सदाशिव सांब ! ! !

अतिथि : (स्वगत) इथं काही तरी घोटाळा आहे खास ! एरवी बाळ चिलया अशा वेळी इतक्या शान्ततेनं माझं नांव घेत कधीहि उभा रहाणं शक्य नाही ! (पार्वतीकडे पहातो.)

पार्वती : देवी चांगुणे, हे पहा सूर्याचे मावळते किरण दिसू लागले. आज सोमवारचा दिवस, भगवान त्रिनेत्राला नैवेद्याला उशीर अजिबात खपत नाही ! शिवाच्या नैवेद्याला विनाकारण उशीर का ? अतिथिरूप शंकराची पूजा झालीच आहे !

(दोन राजसेवक कर्पूरारति घेऊन येतात. त्यांच्या हातून श्रियाळराजा कर्पूरारति घेतो.)

श्रियाळ : कर्पूरगौरं करुणावतारं । संसारसारं भुजगेंद्रहारं ।।
सदा वसंतं हृदयारविंदे । भवं भवानीसहितं नमामि ।।

अतिथि : राजा, याच का विलक्षण देवतेची तुम्ही पूजा करता ? अहाहा, काय विचित्र ध्यान—गळयात साप, शेजारी नंदी, अंगावर व्याघ्रांबर, सभोवती भूतगण आणि स्मशानात वस्ती असं हे स्मशानवासी उग्र दैवत—

श्रियाळ : महाराज, दैवत हेच, रूप-ध्यान हेच, फक्त पहाण्याची दृष्टी पाहिजे ! जय भोलानाथ ! असं पहा, एकाच सूर्यप्रकाशांत साप, वाघ, नंदी हे हिंडू शकतात—भयाण काळोखात भूत-प्रेत-पिशाच्चं वावरतात ! पण अंत:करणातल्या कमकुवत भावनांची जळून होळी होऊं द्या—ध्यायचं कुणाला, कशाला आणि काय

म्हणून अशा थाटाची निर्भयवृत्ति अंगात संचरू द्या, म्हणजे एकाच सूर्यप्रकाशात साप, वाघ, पिशाच्चं, नंदी हे कसे निर्भयतेनं वावरू शकतात याचं भगवान गौरीहराचं स्वरूप म्हणजे अत्यंत उदात्त दर्शन आहे ! आणि याच्याहि पलीकडचं मदनान्तक शंकराचं किंवा कोणाहि दैवताचं खरं शाश्वत स्वरूप म्हणजे प्रकाश–तेज ! श्रियाळराजाच्या सर्व मनोवृत्ती ठार झाल्या ! देवी चांगुणे, बाळ चिलयाला मांडीवर घे, ज्या ममतेच्या मांडीवर त्याला वाढविलंस, तिथंच त्याची अखेरची मृत्युशय्या तयार कर !

चांगुणा : चला, बाळा ! आजपर्यंत तुम्हांला दूधभात खायला हाक मारली––ममतेनं मांडीवर अंगाई करायला जवळ घेतलं–पण–आज–आज आईच्या मांडीवर काळनिद्रा घ्यायला चला ! बालस्वरूप परमेश्वरा, चांगुणेची वाचा बंद पडली !

(चाल: जो ये तनमन का)

आतां मम चिमणा चिलया प्रभुपदिं घे आराम ! ॥<br>
हा सुटतां तनु-पिंजरा बघशिल तू कैलास ! ॥ ध्रु० ॥<br>
जा बाळा देवाघरी–सुखाने तिथें विसांवा घे !<br>
जातां संतोषें अतिथि पहा, शिवलोकी राजसा, भेट<br>
मला ! ॥ १ ॥

(चिलयाचे चुंबन घेऊन त्याला मांडीवर घेऊन बसते. श्रियाळराजा तलवार उपसतो.)

अतिथि:––राक्षसा, हे तू काय करतो आहेस ! मला तुझ्या पुत्राचं मांस पाहिजे आहे, गोष्ट अक्षरशः खरी आहे. पण स्वतःच्या पुत्राची हत्या माझ्यासमोर कठोरपणानं करण्याचा प्रयत्न करून

मला डिवचण्याचा प्रयत्न करतो आहेस ! राक्षसराजा, सांग, हे तू काय आरंभिलं आहेस ?

श्रियाळ : राक्षसराजा नव्हे, जगज्जेता श्रियाळराजा–भगवान शंकराच्या साक्षीनं अतिथीला दिलेला शब्द खरा करण्याकरिता आणि खऱ्या शाश्वत स्वरूपाची ओळख पटण्याकरिता आज हा अलौकिक आत्मत्याग करीत आहे ! जय गौरीशंकर ! ! !

(श्रियाळराजा चिलयाला तलवार मारतो; मंगलवाद्ये वाजू लागतात.

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

(स्थळः—रस्ता; वीरसेन आणि गुणवती प्रवेश करतात.)

वीरसेन : मग काय म्हणता! तुम्हांला एकदम, अचानक, आकस्मित तऱ्हेनं स्फूर्ति झाली आणि त्या भरात तुम्ही माझ्यावर पद तयार केलं आहे! ठीक आहे. आमची तुम्हांला अशी आज्ञा आहे, की ते पद आम्हांला आता म्हणून दाखवा. मी अत्यंत उत्कटतेनं ऐकायला तयार आहे.

गुणवती : आहेच आपला आग्रह तर ऐकावं —

(रागः पहाडी)

सदन जो प्रेमाचे बांधिले। कल्पनापथ माझे थांबले ॥ध्रु०॥
सकल गुण इथें। स्वरूप तेंही। प्रेमें मीं पाहिले ॥१॥

बरं, पण आपण आपली गंमत काय झाली ती सांगणार होता ना? आताच सांगावी गडे.

वीरसेन : सांगतो; ती गंमत फारच गंमतीची झाली. आणि त्यात माझी फार मोठी बेमालूम फजिती झाली!

गुणवती : तर मग लवकर सांगावी गडे, काय गंमत झाली ती! आपली काय काय—कशी कशी फजिती झाली? मला किनई बाई केव्हा एकदा ऐकेन असं झालं आहे.

वीरसेन : अरे वा रे पतिव्रता! नवऱ्याची फजिती ऐकायला इतकी उतावीळ! माझ्याबद्दल एकंदर तुला चांगलाच अभिमान

आहे म्हणायचा ! माझी फजिती ऐकायला तू तयार ! बस, आमची नाही सांगण्याची लहर लागत. अरे वा, अजून तू हसतेच आहेस ? मी रागावलों आहे तरी तू हसते आहेस ? वा: ! वा !

गुणवती : मला आता तुम्ही सांगितलं म्हणूनच समजलं हो तुम्ही रागावल्याचं ! मी किनई बाई आहे आपली भोळी ! मला किनई फारसं समजत नाही, तेव्हा आपण इथून पुढं जेव्हा जेव्हा रागवाल–रुसाल तेव्हा आपण स्पष्ट तसं तसं सांगत जा, म्हणजे आपला अपमान नाही व्हायचा माझ्या हातून.

वीरसेन : ठीक आहे, मग मी आता रागावलेला नाही.

गुणवती : मग सांगा ना ती झालेली गंमत––

वीरसेन : बरं आहे, श्रवण करा. तुम्ही मला–वनराज मारला गेला तेव्हा—तुमच्या आमच्या पहिल्या भेटीच्या वेळी सांगितलंत की, तुमचं लग्न ठरलं आहे म्हणून ! तेव्हा माझं तुमच्यावर 'प्रेम बसलं होतं' ! तेव्हा आपली प्राप्ती मला व्हावी या सद्धेतूनं प्रेरित होऊन मी खटपट करायचा ठरविला विचार ! पुष्कळ तपास केला पण आपलं लग्न कुणाशी ठरलं होतं याचा काही तपास लागेना; तेव्हा—आपलं घर मला माहित होतंच–एक दिवस सरळ गेलो आपल्या वडिलांकडे आणि त्यांना बेधडक सांगितलं, की आपण आपल्या मुलीचं लग्न ज्या मुलाशी ठरवलं आहे तो महामूर्ख आहे, त्याला कवडीची अक्कल नाही, तो कफल्लक आहे, कर्जबाजारी आहे—होय नव्हे, एकजात सगळं खोटं खोटं सांगितलं ! तुझ्या वडिलांनी शान्तपणं ते सर्व ऐकून घेतलं, आणि नंतर त्यांनी माझा फक्त कान धरायचाच तेवढा बाकी ठेवला आणि मला स्वच्छ सांगितलं की, 'आपण फार शहाणे

आहात, मुकाटयानं रस्ता पकडा. मी आपल्या मुलीचं लग्न ज्याच्याशी ठरवलं आहे त्याचे वडील माझे फार प्राचीन काळचे स्नेही असून त्यांना मी पूर्णपणं ओळखतो. आमच्या मुलीच्या व आमच्या होऊं घातलेल्या जावयाच्या जन्माच्या अगोदर हा शरीर-संबंध करायचा आमचा बेत ठरलेला असून, आमचे भावी जामात वीरसेन यांना जरी मी अद्याप प्रत्यक्ष पाहिलेलं नसलं तरी ते सुशील आहेत अशी माझी पूर्ण खात्री आहे.' तेव्हा मनात मी जो चरकलो आहे म्हणता ! मीच तो—तो—हे कळलं मला, लगेच चूक दुरुस्त केली आणि सांगितलं, की आपले जावई फार शहाणे आहेत—वगैरे वगैरे.

गुणवती : तरीच बरं का लग्नाच्या अगोदर आमचे काकाजी म्हणत होते, की जावई जरा फाजील शहाणे आणि प्रेमी-पागल दिसतात म्हणून !

वीरसेन : खरंच ? बस्स ! गुणवती, तुझे वडील म्हणजे एक महात्मा आहेत ! लग्नाच्या अगोदर जावई पागल आहे हे कळलेलं असूनसुद्धा त्यांनी आपल्या शब्दाचा मान ठेवला. माणूस आहे ! नाही तर लग्न ठरवून, एखाद्या नादान भणंगाच्या चुगलखोर चहाडीनं लग्न मोडणारे मुलांमुलींचे बाप—आपलं माणूस म्हणायचं त्यांना, बाकी शुद्ध नंदीच—काही थोडे नसतात ! ठीक आहे. बाकी केवळ गैरसमजुतीनं माझं लग्न मीच मोडायला तयार झालो होतो—

गुणवती : बाकी खरंच, मी आजच बोलूं नये आपल्याजवळ; पण आपल्या वडिलांचा—-माझ्या मामंजींचा आणि सासूबाईंचा स्वभाव काही इतका चांगला नाही !

वीरसेन : अग तूच काय, सगळं जग बोलतं आहे असं ! म्हणजे फक्त माझेच वडील आणि आई वाईट आहेत असं नव्हे हं ! एकंदर जगांतले सासू-सासरेच हरामखोर आहेत ! त्याकरिता माझ्या मनात युक्ति आली आहे, पण ती अमलात आणणं फ़ार कठीण आहे !

गुणवती : ती काय ?

वीरसेन : सांगतों. लग्नाच्या वेळेला आपली सध्या काय पद्धत आहे, की जावयाला वाजत गाजत आणून वधूच्या घरी कन्यादान करतात. पण ही चूक आहे. वधूला वाजत गाजत जावयाच्या घरी पोहोचती करून तिथं विवाहविधी करावा, आणि वरातीच्या दिवशी वधूवरांची वरात न काढतां वधूच्या सासूसासऱ्यांची वरात काढून ती वधूगृही पोहोचती करावी; मग मुलांनी पाहिजे तर वर्षा-दोन वर्षांनी आपल्या आईबापांना चारआठ दिवस माहेरपणाला आपल्या घरी आणावं !

गुणवती : खरंच, असं होईल तर काय मजा होईल ?

वीरसेन : असं वाटणं हा नवराबायकोच्या अत्यंत प्रेमाचा परिणाम आहे ! दुसरी एक गोष्ट सांगतो तुला; या जुन्या पिढीला अक्कल फार बेताची असते हे माझ्या उदाहरणावरून कळलं मला. कारण—हो स्पष्ट बोलावला काय हरकत आहे ! असामान्य उदाहरणं सोडून दिले तर तुझ्या माझ्यासारख्या सामान्य माणसांच्या बाबतीत सांगतो तुला. प्रेम म्हणजे शुद्ध गाढवपणा आहे ! प्रेम म्हणजे शुद्ध थोतांड आहे. प्रेम म्हणजे चांगल्या नावाखालचा बेवकूबपणा आहे ! प्रेम म्हणजे––

गुणवती : हो, प्रेम म्हणजे खुद्द आपण आहात ! आपलंच माझ्यावर प्रेम होतं ना ?

वीरसेन : छट्, खोटी गोष्ट ! तुझ्यावर माझं प्रम अजिबात नव्हतं !

गुणवती : म्हणजे !

वीरसेन : खरं बोलायचं झालं तर अर्धवट होतं ! कसं ते सांगतो ऐक– रानात एकटचा भेटलेल्या आणि चार गुलगुल शब्द मोकळेपणानं बोलायला सांपडलेल्या गुणवतीवर माझं प्रेम होतं; पण वडिलांनी परस्पर माझी पत्नी म्हणून ठरविलेल्या या गुणवतीवर माझं प्रेम अजिबात नव्हतं ! परंतु दोन्ही गुणवती एकच निघाल्यामुळं माझं तुझ्यावर अर्धवट प्रेम आहे. इलाज नाही त्याला ! प्रेम म्हणजे प्रेम आणि हृदय म्हणजे हृदय !

गुणवती : इश्श् ! आपलं जर माझ्यावर प्रेम नसलं तर आपला संसार कसा हो व्हायचा ?

वीरसेन : पाहूं या आता काय होतं ते ! प्रेमोत्तर विवाह का विवाहोत्तर प्रेम, या कूट प्रश्नाचं उदाहरण मी आपल्या अनुभवावरून सोडविणार आहे. पण त्यांत एक अडचण आहे, की ज्या वेळेला मी म्हातारा होईन तेव्हा मला कोडं सुटेल आणि मी सोडविलेल्या कोडयाचं उत्तर म्हातारपणीं सांगणार असल्यामुळं त्या वेळेच्या तरुणपिढीला ते काही पटायचं नाही ! तेव्हा–

गुणवती : तेव्हाच्या गोष्टीचा आपण तेव्हाच–म्हणजे आपल्या म्हातारपणींच विचार करूं. पण सध्या घेतलेल्या अनुभवावरून तरुणपिढीला जर आपल्याला काही संदेश सांगता आला तर तेवढा विचार करून ठेवा.

वीरसेन : ठीक आहे, तसा मी हजरजबाबी आहे. काही भाग्यवान माणसं सोडून दिली तर ‘ प्रेम ’ म्हणजे स्वप्न आहे.

मृगजल आहे—फसवणूक आहे ! नुसता वेड्यांचा बाजार आहे ! अहो, जे प्रेम एका घटकेत बसतं ते उडूनहि एकाच घटकेत नाही का जाणार ? प्रेम म्हणजे नुसता सावळागोंधळ आहे. समजा, माझं तुमच्यावर प्रेम बसलं पण तुमचं तिसऱ्यावरच बसलं; तुमचं ज्याच्यावर प्रेम बसलं त्याच्याजवळ प्रेमच नव्हतं—अशा स्थितीत या तीन प्रेमी माणसांची उदाहरणं कशी सोडवायची ? अहो, काही नाही, ज्याला त्याला वाटतं मीच फार शहाणा ! सगळ्या जगाची एकवाक्यता कधीच व्हायची नाही. आणि अशी एकवाक्यता जगाची ज्या दिवशी होईल तोच जगाचा भाग्यकाल किंवा प्रलयकाल ! पण या तरण्या विषयावर जास्त बोलण्याचं धाडस मी करीत नाही. कारण तरुण पिढीच्या विचारांची मुसंडी रानडुकरासारखी असते. तेव्हां पूर्वीचे तरुण पण आजचे वृद्ध अशा जगाच्या अनुभवानं घायाळ झालेल्या वृद्धांना माझी एक शिकवणूक आहे की, बेट्यांनो, एक पाऊल पुढं या; तुम्हांला तुमच्या मुलांमुलींची लग्नं तुमच्या मनाप्रमाणं ठरवायची आहेत ना ? ती तशीच ठरवा, मुलांमुलींना अजिबात थांगपत्ता लागू दिला नाही तरी चालेल. पण पुढं आपल्या मुलांची खाशी जिरवायची एक तोड हा तरुण तुम्हांला सांगतो आहे ती लक्षात ठेवा—

गुणवती : काय आहे बाई असली अजब युक्ती !

वीरसेन : ती अजब युक्ति अशी आहे की, ज्या ठिकाणी उपयोगात येईल तिथं ती रामबाण आहे; आणि जिथं ती फसेल तिथं मी सांगणार असलेल्या नियमाचा तो अपवाद आहे !

गुणवती : घरी लवकर जायचं आहे आपल्याला–आता हे चऱ्हाट आणखी किवी वेळ चालणार आहे ?

वीरनेन : अर्थात् संपेपर्यंत ! हो, तो एक विचित्र कार्यक्रम माझ्यामागं आहेच, नाही का ? आईबापानी परस्पर ठरविलेली लग्नं वधूवरांच्या गळ्यात खुशीनं कशी बांधायची हा मुद्दा होता नाही का आपला ? ठीक आहे. लग्न ठरविल्यानंतर आईबापांनी काही करायचं नाही ! मुलांमुलींना थांगपत्ता लागू न देता त्या दोघांची--ठरविलेल्या वधूवरांची एकान्तात--एकीकडे, जन-संमर्दापासून दूर गांठ पडेल-जशी तुझी पडली होती तशी—अशी व्यवस्था करायची ! की माझी खात्री आहे—तडाख्यात एक-मेकांचं प्रेम ऐकमेकावर बसेल ! मग हा तिच्या प्रेमाची भीक मागायला लागेल, ती याच्या प्रेमापायी जीव द्यायला तयार होईल ! एकमेक एकमेकावरून आपआपले पंचप्राण ओवाळून टाकायला तयार होतील; एमेकाकरिता एकमेक आपआपल्या अंगाची कातडी सोलून एकमेकांच्या पायात आपल्या कातड्याचे जोडे तयार करून चांभाराचा धंदा करतील—काय काय वाटेल ते करतील ! अहो, प्रेम बसणं म्हणजे काय ?अशी संधि मिळणं, एकमेकांची अचानक भेट ! चला, आपण तर सुटलो या प्रेमाच्या जंजाळातून—आता आपण काय वाटेल ते बोललो, आणि ते जरी धडधडीत खोटं असलं तरी त्यापासून आपलं नफानुकसान काहीच नाही ! जाऊं दे, आपण तर सुटलो-- ! काय ग, हो पण कलावतीची हकीकत कळली का तुला ?

गुणवती : तिची काय हकीकत कळायची आहे !

वीरसेन : तिनं पुरुषवेष घेतलान्—

गुणवती : ते ठाऊक आहे मला—

वीरसेन : बरं, त्याच्यापुढं सांगतो. आमचे एक पुष्पधन्वा म्हणून स्नेही आहेत; त्यानी स्त्रीवेष घेऊन ते व पुरुषवेषांत

कलावती हे असं विचित्र दांपत्य बनून श्रियाळराजाकडे गेलं. श्रियाळराजानं त्या दांपत्याला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' आशीर्वाद दिला. पण त्यामुळं झालं काय? भक्तश्रेष्ठ श्रियाळ-राजाच्या आशीर्वादाबरोबर ते कृत्रिम वेष त्यांच्या अंगाला कायमचे चिकटले—

गुणवती : इश्श्, काही तरीच ! असं कसं होईल ?

वीरसेन : कसं होईल ! अग, प्रत्यक्ष झालं ! ईश्वराची करणी ! अग, असं अतर्क्य सामर्थ्य क्वचित् एखाद्या वेळी दृष्टीस पडतं म्हणून तर ही मानवजात अजून भूमीवरून चालते आहे. नाही तर, त्याना जर अशा एखाद्या भयंकर शक्तीचा धाकदपटशा नसता तर, एव्हाना ते आकाशाला लोंबकळायला लागले असते ! आकाश खाली करून जमीन वर केली असती--

गुणवती : पण मग पुढं काय झालं त्यांचं ?

वीरसेन : तेच मला अजून कळायचं आहे ! कळल्यावर आपल्याला जरूर सांगेन हं--आता घरी जा ! तुझं काम संपलं ! कारण—

गुणवती : काय कारण--?

वीरसेन : कारण असं की, लग्न झाल्यावर स्त्रियांचं आयुष्य पुरुषाच्या आयुष्यांत विलीन होऊन जातं ! मला माहीत आहे, याच्यावर मतभेद व्हायचाच. पण मतभेदातच खरी गंमत आहे. अहो, मतभेदानं विचारांचा ताठरपणा तरी रहातो, नाही तर 'हो, तुमचंहि खरं—तुमचंहि खरं--तुमचंहि खरं आहे.' असं म्हणणारे साळसूद परिणामी फार घातुक असतात ! चल, मला त्या पुष्पधन्व्याकडे गेलंच पाहिजे !

गुणवती : पण मला सगळं सगळं सविस्तर सांगितलं पाहिजे हं—

वीरसेन : हे काय सांगायला पाहिजे वाटतं ? गुणवती, माझी मतं जरी थोडीशी विचित्र असली तरी माझ्यासारखा प्रेमी जीव मिळाल्याबद्दल तुला धन्यता वाटली पाहिजे ! माझं अंतःकरण तू--माझी हितगुज करण्याची सखी तू--माझा मित्र तू--मला प्रेमानं निरपेक्ष सल्ला देणारी तू--प्रेमानं माझं संगोपन करणारीहि तूच ! मी कदाचित् कर्तव्यच्युत व्हायला लागलो तर मला मार्गावर आणणारी देवता तू ! आणखी काय सांगू तुला ?

गुणवती : असंच असेल तर लग्न झाल्यावर स्त्रीचं स्वतंत्र अस्तित्व नाहीसं होतं असं म्हटलं तरी काही हरकत नाही !

वीरसेन : अग, मी तरी तेच म्हणतो. आणि हे बावळट मात्र संबंध जगाला पांघरूण घालण्याचा आव आणतात, आणि स्वतः मूर्खच रहातात ! चला, आपल्याला काय करायचं आहे त्यांच्याशी ! आपण आपली आपल्या मार्गाला लागू.

( जातात. )

---

## प्रवेश २ रा

( स्थळ—महाल; देवी पार्वती आणि सती चांगुणा बोलत बसल्या आहेत. )

पार्वती : सती चांगुणे, माझा पायगुण तुम्हांला चांगलाच भोवला म्हणायचा ! तुमच्या बाळाचं कोडकौतुक पाहून मन रंजविण्याकरिता म्हणून मी इथं आले आणि--

चांगुणा : देवी, कसला पायगुण आणि काय घेऊन बसलात ? हे

ज्याचं त्यातं भाग्य असतं ! बरं, माझा बाळ काही एखाद्या रोगानं मेला नाही-- माझ्या बाळाला भाग्याचं मरण आलं ! किती भाग्यवान् माझा बाळ ! आईच्या मांडीवर मरण, तोंडी शिवाचं नाम, आणि पित्याच्या हातानं मृत्यु ! खरोखर इतक्या बाळपणी असलं भाग्य असायला पूर्वजन्मीची सबळ पुण्याईच असावी लागते. पण देवी, वर वर कितीहि बोलल, सांगितलं, तोंडावर हसू आणलं तरी अंतःकरणाचा खडक फोडून आंतल्या आत वहाणारे पुत्रप्रेमाचे झरे कसे झाकून ठेवता येणार ? पण त्यामुळं मनाला किनई आनंद वाटतो आहे ! आनंद—आनंद ! आनंद ! पण हे पाहिलंत का ? माझा बाळ, माझा चिमणा चिलया. बालरूप टाकून कसा विराट्स्वरूपी झाला आहे तो ! आता माझा चिलू बाळ मला कुणीकडून हाक मारील आणि कुणीकडून नाही ह्याची कल्पना नाही ! देवी, माझा चिलू बाळ समोर दिसतो का हो ? का इकडून पहातो आहे माझ्याकडे, का पाठीमागून येऊन माझ्या गळ्याला मिठी मारील—आणि आपल्या बालहातांनी माझे डोळे झाकून 'आई, कोण आहे ते ओळख ' म्हणून मला विचारील असा मनाला एकसारखा भ्रम वाटतो आहे !

पार्वती : देवी, एकसारखा एकच विचार चांगला नाही. अजून चिलयाच्या सेवेतून आपण मोकळ्या झाला नाहीत. एकदा चिलयाच्या मांसाचं दान अतिथीला दिलंत की आपण मोकळ्या व्हाल, देवी ! पण पहा, आपण श्रीशंकराचे एवढे निस्सीम भक्त, पण अशा आणीबाणीच्या वेळीसुद्धां, अतिथीरूपानं हे जे संकट तुमच्यावर आलं ते टाळण्याकरिता भगवान शंकर धावून आले नाहीत ते कुठं !

चांगुणा : अजून आमची भक्ति तितक्या पराकोटीला गेली नसेल कदाचित् ! आणि असं पहा, जे संकट—पण त्याला संकट तरी का म्हणायचं ?–आम्ही खुशीनं पत्करलं—तिथं देवानं तरी धावून का यावं ! आणि असं पहा, दर संकटाच्या वेळी जर प्रत्यक्ष परमेश्वर धावून यायला लागला तर प्रत्येकजण संकटात उडी टाकील आणि देवाला धाऊन येण्याखेरीज दुसरं काही कामच रहाणार नाही ! अहो, आधार पाहून कुणीहि काम करील; मग भक्ती ती काय ? आणि तपश्चर्या ती काय ? पण माझा परमेश्वर मात्र आयत्या वेळेला धावून यायला चुकला नाही, हं ! नाही तर आईला धाय मोकलून रडायला लावणारा मुलाचा मृत्यु—तो मी आनंदानं कसा बरं पाहिला असता ? अशा वेळी उत्पन्न होणारं धैर्य आणि अशा वेळी मनाची टिकणारी शान्तता ही देवतांचीच स्वरूपं आहेत.

पार्वती : आपण मुळी विनतोडच बोलता आहात तिथं मी काय बोलणार ? पण मला आपलं वाईट वाटलं. मी आल्याबरोबरच ही गोष्ट व्हायला नको होती. आता मला इथून जाताहि येत नाही आणि इथं राहताहि येत नाही ! एखाद्याचं नशीव दुसऱ्याच्या नशिवाला बिघडवितं, म्हणून नेहमी चांगल्याचाच सहवास करावा ! माझ्या आपल्या मनाला वाटतं की मी आले नसते तर हा प्रसंग काही आपणांवर खास ओढवला नसता.

चांगुणा : काही तरी कल्पना ! कुणीहि कुणाचं नशीब बिघडवीत नाही. बरं समजा, तुमचं नशीब वाईट आहे आणि माझं चांगलं आहे. पण देवा, खरं चांगलं तेच, की जे वाइटाला चांगलं बनवतं ! वाईटाच्या संगतीनं जर चांगलं बिघडलं तर त्याचा चांगुलपणा तो काय राहिला ? अहो, ज्याचं नशीब ज्याच्या

त्याच्याबरोबर ! आता असं पहा, हा आमचा राजवाडा आहे; ज्या वाड्यात आम्ही राजेपणानं वावरतो आहोत--तिथंच सेवावृत्ती पत्करणारे हुजरे, दास-दासी, शिपाई प्यादे रहातात ना ? काय आमच्या नशिबाचा त्याना उपयोग ! असं आहे. जागेत काही नाही, सहवासात काही नाही, अखेर आणि प्रत्येक वेळी ज्याचा तो !

पार्वती : बरं, सध्या तर मी जाते आता इथून.

चांगुणा : कुठ जाणार आपण ? आणि घाई का अशी ? कुठं जाऊं नका आणि येऊ नका. आपण दोघी बहिणीबहिणी अशीच कालक्रमणा करू. आणि आपण जर म्हणता की आमच्यावर हे संकट आलं आहे, तर माणसाला संकटात सोडून जाणं शोभतं का आपल्याला ?

पार्वती : नाही, मी कुठंहि निघून जात नाही. आपण शान्त मनानं बसा जरा; मी अतिथीना घेऊन येते.

चांगुणा : बरं आहे, लवकर या.

पार्वती : अगदी थोडच्या वेळात येते. ( जाते. )

चांगुण : बाळाच्या सहवासाशिवाय मी आजपर्यंत थोडी का राहिले असेन ? पण त्या वेळेला काही वाटलं नाही. आता मात्र अंतःकरणावर पाहारीकुदळी चालवून उकराउकरीला सुरवात करावी त्याप्रमाणं चिलयाच्या आठवणींची डिखळं सारखी वर येतात आणि विरून जातात ! नेहमी बाळ खेळायला गेला तर मी नव्हते का त्याच्या सहवासाशिवाय एकटी रहात ? पण आज बाळ खेळायलाच गेला आहे या कल्पनेवर माझ्या मनाचं समाधान का बरं होत नाही ? बा मना ! तुझं शान्तवन आता कशानं

होणार ? नाही, बाळ चिलयाखेरीज दुसरा विचारच मनाला शिवत नाही; तो असा खेळत होता, तो असा धांवत होता, त्याचे हट्ट तरी किती समजुतीचे होते—एक ना दोन! एकसारखे तेच तेच विचार माझ्या शरीरातील सर्व रोमरोमांत भिनून गेले आहेत. बरोबरच आहे, मनाचं समाधान तरी इतक्यात कसं होणार! सूर्य अस्ताला गेला तरीसुद्धा त्याचा संधिप्रकाश नंतर किती तरी वेळ टिकतो. बारा तास प्रकाशून अस्ताला जाणाऱ्या सूर्याचा संधिप्रकाश नंतर किती तरी वेळ टिकतो—तर माझा बाळ, सूर्य आज इतकी वर्षं एकसारखा माझ्या घरात प्रकाशत होता--मग त्याचा संधिप्रकाश, संधिप्रकाशमय त्याच्या आठवणी इतक्यातच कशा बरं नाहीशा होतील ? बाळाच्या आठवणींच्या गोड मोहनीनं माझं सर्व अंग कसं अगदी मोहरून गेलं आहे! चिलूबाळा,–पण आता माझा बाळ देवरूप झाला–आता बाळाचं म्हणून देवाचंच नाव घ्यायला पाहिजे मला.

( चाल : झनन झनन जाते )

बाळ देवरूप होय। तरिही मज शान्तता ॥ ध्रु० ॥
ईशस्वरूप गमत मला। बाळरूप ते! ॥ १ ॥

शिवहर रे! शिवहर रे! सांब सदाशिव शिवहर रे! ( कोचावर डोळे मिटून बसते, इतक्यात श्रियाळराजा प्रवेश करतो,)

श्रियाळ : बाळ चिलयाच्या मृत्यूनं माझ्या सर्व विचारांना एक प्रकारचा नागवेपणा आला आहे. सभोवार पहाण्याची दृष्टीच अजिबात बदलून गेली आहे. सर्व नाती लयाला गेल्यासारखी वाटतात. स्त्री-पुरुष हा भेदहि डोळ्यांना दिसत असून मनाला भासेनासा झाला आहे! मृत्यूनंतरची स्थिति हीच असेल का?

देवी चांगुणेचं धैर्य आणि अंतःकरण यांची आज परीक्षा झाली. निसर्गतःच निष्ठुर असणाऱ्या पुरुषजातीनं माझ्याइतका, स्वतःचं मूल मारण्याचा पराक्रम करणं काही अशक्य नाही; पण फुलासारखं ज्यांचं अंतःकरण जात्याच कोवळं त्या स्त्रीजातीत माझ्या स्त्रीनं--देवी चांगुणेनं--ममतेच्या मांडीवर धीरानं आपल्या पोटच्या पोराचा बळी द्यावा--पण यात तरी आश्चर्य काय आहे ! स्त्री आणि पुरुष हे जातिभेद लौकिक संसारापुरते ! पण ज्ञान, त्याग, तपस्या या बाबतीत दोघांनाहि हक्क, अधिकार आणि शक्ति सारखीच आहेत ! जगातलं स्वारस्य कायम ठेवण्याकरिता परममंगल परमात्म्यानं स्त्री-पुरुषात्मक भेद निर्माण करून आनंदी आनंद निर्माण केला आहे !

( चाल : भूप-त्रिवट )

वाटे जिवाला आनंद। भासे जगी ना भेद ॥ ध्रु० ॥
भजतां शिवा। सुख हो जिवा। ध्यावा विसावा।
नमन शंकरा ॥ १ ॥

( चांगुणेकडे पहात ) अहाहा, ही त्यागाची देवता म्हणू, का सत्त्वस्थ प्रेममयाची प्रतिमा म्हणू ! मानसिक आनंदाची समाधि लागलेली दिसते आहे ! देवते, देवी चांगुणे ! ( चांगुणा एकदम उठून उभी राहते, ) नाही, उठायचं काहीच कारण नाही; जशा बसला होतात तशाच बसा !

चांगुणा : आपण बसावं !

श्रियाळ : देवी, आपली लौकिक संसाराची सरहद्द आता संपली ! आज आपण नवराबायको या स्वरूपांत एकमेकांना

भेटत नाही; आणि आता कधीहि भेटणं शक्य नाही! आपण दोघंहि आता आनंदाच्या प्रवासाला निघालो आहोत!

चांगुणा : पण आपल्या बाळानं आपल्या अगोदरच मुक्काम गांठला, नाही? का आपलं आनंदानं स्वागत करण्याकरिता तो अगोदरच तिथं जाऊन बसला बरं! आपल्याला नाही बाळाबद्दल वाईट वाटत?

श्रियाळ : या प्रश्नाचं उत्तर शब्दांनी देणं अशक्य आहे. सागराची एकसारखी चालणारी घडपड माझ्या अंतःकरणात चालू आहे. पण तरीहि मनाचं समाधान टिकलं आहे, एवढंच! चला, वसू या जरा--(चांगुणेचा हात धरून) आणि दोघांनीहि आपले सुखदुःखाचे एकच सूर लावून आनंदानं राहिलेली कालक्रमणा करूं!

चांगुणा : सगळं खरं; सगळ्या नात्यांचा विसर आपल्यालाहि पडेल आणि मलाहि पडेल; पण मी चिलयाची आई आहे या नात्याचा विसर मात्र मला कधीच पडणार नाही. आणि या एका कल्पनेवरच माझ्या मनाचं समाधान टिकलं आहे! चिलयाच्या मांसाचा पाक तयार झाला आहे—अतिथिराज बरोबर माध्यान्हीला येतो म्हणून सांगून गेले—माध्यान्हीला किती बरं अवकाश आहे अजून?

श्रियाळ : फार तर प्रहर–दीड प्रहराचा अवधि असेल.

चांगुणा : आता प्रहर काय आणि दीड प्रहर काय—सर्व वेळ सारखाच आहे! कालाच्या जाण्या-येण्यानं आमच्या आयुष्यात आता काय फेरबदल होणार आहे? आपल्या आयुष्यातील सर्व प्रकारची सुखदुःखं आता एकरूप झाली आहेत. अंतःकरणांत वास

करणाऱ्या शान्तवृत्तीचा परीस--( पार्वती आणि अतिथि प्रवेश करतात. श्रियाळ, चांगुणा अतिथीला उत्थापन देतात. )

अतिथि : राजा, धन्य आहेस तू ! आणि तुला मिळालेल्या या अनुरूप भार्येनं तुझ्या भाग्याला मोल नाहीसं केलं आहे.

पार्वती : पण देवी चांगुणे, भावनेच्या भरांत आपल्या हातून चूक झाली आहे.

चांगुणा : काय चुकलं, देवी, माझ्या हातून ?

पार्वती : आपण चिलयाच्या शरिराचा पाक तयार केलात--पण चिलयाचं शिर नजरचुकीनं तसंच राहिलं आहे !

चांगुणा : असं जर असेल तर खरंच चूक झाली म्हणायची !

अतिथि : चांगुणे. मला तुमच्यावर विनाकारण आघातावर आघात करावे लागत आहेत ! शिर तसंच राहिलं असेल तर बाकीच्या मांसाचा पाक काय उपयोगी पडणार ?

चांगुणा : माफी असावी; चूक झाली इलाज नाही. चिलयाच्या-माझ्या बाळराजाच्या शिराचाहि पाक करून मी आपल्याला लवकर वाढते ! देवी पार्वती, चलता का माझ्याबरोबर--

पार्वती : चला, देवी ! चला--

अतिथि : देवी चांगुणे, क्षमा कर. मुलाच्या वियोगदुःखानं मतीला भ्रम उत्पन्न होणं साहजिक आहे. तेव्हां आता असं करा; चिलयाचं शिर उखळांत घालून इथंच आणा आणि त्याचं कांडण इथंच करा. एकान्तांत दुःख भोगणं असह्य होतं; चार माणसात दुःखाचा थोडा तरी विसर पडतो--

चांगुणा : महाराज, आज्ञा करा ती प्रमाण आहे ! ह्या

चांगुणेला आता मन राहिलं नाही, भावना राहिली नाही ! देवी चला तशीच व्यवस्था करू.

पार्वती : आता आपण तसदी घेऊं नका--मीच उखळांत शिर घालून आपल्याची व्यवस्था करते.

चांगुणा : बरं, तसं करा ! शिवहर रे ! शिवहर रे ! सांब सदाशिव शिवहर रे !

(पार्वतीदेवी निघून जातात. दोनं दासी उखळ व मुसळ घेऊन येतात. चांगुणा पदर बांधते व मुसळ हातात घेते.)

श्रियाळ : अतिथिराज, थोडी अमर्यादा होते आहे, क्षमा करा. सुखदु:खाचं कांडण कांडणाऱ्या या माझ्या भाग्याच्या देवतेला मला पहिल्यांदा नमस्कार करूं द्या !

चांगुणा : महाराज, किती झालं तरी मी आपली भार्या आहे, आपली अर्धांगी आहे ! आपलं पादसंवाहन करणं हे माझं काम– आणि वेड्यासारखं आपण का मला नमस्कार करणार !

श्रियाळ : कुणी मला गर्विष्ठ म्हणो, स्तुतिप्रिय म्हणो–काहीहि म्हणो ! देवी, आपण माझ्या अर्धांगी आहांत, गोष्ट अक्षरश: खरी आहे ! पण ओळीनं नऊ पुत्राना जन्म दिला की भार्येला मातोश्री म्हणून नमस्कार करायचा असतो. देवी, एकाच अलौकिक पुत्राला जन्म आणि मरण देऊन नऊ पुत्रांना जन्म दिल्याचं भाग्य आपण पदरी पडून घेतलं आहे ! अतिथि आणि देवी पार्वती यांना साक्ष ठेवून हा श्रियाळराजा आपल्या भार्येला मातोश्री म्हणून वंदन करीत आहे !

( चाल : नादीर दीर दीम )

नमन तव पदा । मोहास अवरूनि । त्याग अमोल । दाविसि
विमल तव ! ।। ध्रु० ।।

अलौकिक तव कांडण भूवर। ऐसी शान्ती नसेल कोठें ! ॥१॥

अतिथि : देवी चांगुणे, तुझ्या हिताची गोष्ट सांगतों, कांडण करताना आपण ओव्या म्हणा, मनाला तितकाच विरंगुळा वाटेल.

चांगुणा : आता संगीताशिवाय मला तरी दुसरं काय सुचणार? हृदयांत संगीत चालूच आहे, तोच सूर तोंडावाटे काढायचा--

धैर्याचें उखळ। सत्त्वाचें मुसळ।
कांडिते वेल्हाळ। चांगुणादेवी ! ॥ १ ॥
चिलु माझा रे दाणिया। भरतसे गोणिया।
निघालासे पेणिया। वैकुंठींच्या ॥ २ ॥
चिलु बाळ माझा। भावाचा भकेला।
निघालासे माहेरा। कैलासींच्या ॥ ३ ॥
चिलयाची आई। ओव्या ज्या ह्या गाई।
वरी पडत घाई। मुसळाच्या ॥ ४ ॥

(अतिथि आणि पार्वती पुढे येतात.)

पार्वती : प्रलयाच्या देवा, ही लांवण आणखी किती वेळ लांबणार आहे ?

अतिथि : काय—काय--काय--?

पार्वती : ही सत्त्वपरीक्षा संपणार केव्हा ?

अतिथि . देवी, ज्याप्रमाणं भक्ताला अंत:करण असतं त्या-प्रमाणं देवालाहि अंत:करण असतं ! चांगुणामातोश्रींच्या मुसळाचे घाव चिलयाच्या मस्तकावर पडत नसून ते माझ्या अंत:करणावर बसताहेत ! देवी, काय सांगू तुम्हांला ! या भक्तश्रेष्ठ दांपत्याच्या

भक्तीच्या अत्युच्च कडेलोटामुळं आज या प्रलयरुद्राच्या अंतःकरणाचा, नव्हे प्रत्यक्ष प्रलयाचाहि प्रलय होण्याची वेळ आली आहे!

पार्वती : ते सर्व खरं, पण हा प्रलय थांबणार कधीं? मी आले कशाकरिता आणि माझ्या येण्याचा उपयोग काय झाला? काही--काही माझ्या येण्याचा उपयोग झाला नाही? माझ्या सहवासानं देवी चांगुणेला किंचित् समाधान वाटलं असलं तर वाटलं असेल कदाचित्! शेवटी मीच चुकले—चिलयाचं शिर तसंच राहिलं आहे हे मला बोलून जायचं काय बर कारण? भावनेच्या उन्मादात मीच ते बोलून गेले, आणि देवी चांगुणेला आपल्या लाडक्या वेल्हाळाचं—बाळ चिलयाचं शिर उखळात घालून कुटावं लागलं! पण त्या माता माउलीनंहि आसवांचा पाऊस डोळ्यावाटे पडत असतांनासुद्धां समाधान आणि शान्तीच्या खड्या पहाऱ्यात ते अलौकिक कांडण करून दाखवलं! श्रियाळराजानं या प्रलयप्रसंगी आपल्या भार्येला--देवी चांगुणेला मातोश्री म्हणून नमस्कार केला! त्यांच्या आयुष्यांत आणखी प्रलय व्हायचा तो काय राहिला आहे? प्रलयाच्या देवा, ही लांबण आणखी किती वेळ लांबविणार आहांत?

अतिथि : काय सांगावं आणखी किती वेळ लांबणार आहे ती! देवी, माझं चित्त आता भानावर राहिलेलं नाही! मनाला उन्माद आला आहे--काय होत आहे आणि काय नाही-मनाला अजमास लागत नाही! आणि कोणतीहि गोष्ट अजमासाच्या बाहेर गेली की तोच प्रलयकाल!

पार्वती : देवा, हे सगळं तत्त्वज्ञान ठीक आहे! पण एवढा प्रलय करायला तरी कुणी सांगितला होता?

अतिथि : पण प्रलय म्हणजे तरी वाईट गोष्ट नाही ! देवी, जगताचं जीवन-नृत्य उत्पत्ति, स्थिति आणि लय या त्रितालावर चाललेलं आहे ! एकापाठीमागून एक एक गोष्टी व्हायलाच पाहिजेत ! उपत्ति झाली नाही तर लय कशाचा व्हायचा ? आणि लय झाला नाही तर उत्पत्तीला वाव कुठं राहिला ! पण देवी, हे तांडवनृत्य नाचायला काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर या षड्विकारांना पायांखाली तुडवावं लागतं, किंवा त्यांचे पैंजण पायांत घालून हे नृत्य नाचावं लागतं ! प्रत्येकाच्या आयुष्यांत हा प्रलयकाल ठेवलेलाच असतो ! मनाची स्थिरता हा मूळ पाया ! (बेभान होऊन नाचाची पावले टाकूं लागतात.)

पार्वती : ह्या मनाच्या स्थिरतेतच चिलयाच्या मांसाचं भोजन करणार आहांत ना ?

अतिथि : चिलयाचं मांस—चिलयाचं मांस ! देवी, चिलयाचं मांस कुठं आहे ? चिलया कुठं आहे ? चिलयाची टीचभर मूर्ति आता अखिल ब्रह्माण्ड व्यापून उरली आहे ! भक्तश्रेष्ठ चिलया हा भोळाशंकर तुला नमस्कार करीत आहे ! देवी, आपल्यालाहि मी वंदन करतो आहे. मी मला स्वत:लाहि वंदन करीत आहे ! चराचर जगताला मी वंदन करीत आहे आणि चराचर जगहि मला वंदन करीत आहे ! देवी, या माझ्या प्रलयानंदांत माती कालविण्याच्या हेतूनं आपण श्रियाळराजाच्या इथं दासीरूपानं येऊन राहिलात, पण काय उपयोग झाला ? आपण मला सहाय्यच केलंत ! आणि या अद्भुत कथेत शिरकांडणाची चमत्कृति आपल्याच कृतीनं निर्माण झाली ! देवी, एक लक्षांत ठेवा, प्रकृति आणि पुरुष एकमेकांशी कितीहि भांडली, एकमेकांवर कितीहि रुसली, तरी ती अखेर एकमेकांना साथच करणार !

पार्वती : होय देवा, असं तर खरंच; पण--

अतिथि : आता पण काय ?

पार्वती : हे काय ! देवा, आपण तर नाचाची पावलं टाकूं लागलांत !

अतिथि : तुमच्या नाही अंगात अजून संचार होत ? देवी, प्रलय हाच विश्वाचा आनंद ! प्रलय हेच विश्वाचं अंतिम ध्येय ! प्रलय हे सर्वांचं सार ! प्रलय हाच प्रलय-आणि जगाचा अति आनंदाचा अंतिम सुखसोहळा म्हणजे तांडव-नृत्य ! (पडद्यात डमरू वाजूं लागतो. ती ऐकून शंकराची नाचाची पावले भराभर पडूं लागतात. देवी पार्वती शंकरांना साथ करतात. प्रकाश कमी कमी होत अंधार पडतो. फक्त डमरूच्या नादांत शिवतांडव नृत्य पांच मिनिटे ऐकू येते. पडदा पडतो.)

---

## प्रवेश ३ रा

( स्थळ : रस्ता; कलावती आणि पुष्पधन्वा प्रवेश करतात. )

पुष्पधन्वा : गडे कलावती, मला नाही वाटत आता आपण आपल्या पूर्वस्थितीप्रत जाऊ म्हणून ! आतां हा विचित्रपणा आपल्याला जन्मभर चिकटणार !

कलावती : परमेश्वराची आळवणी करून पाहूं. नाही तर मग जन्मभर आहेच हे असं रखडायचं ! काय करायचं !

पुष्पधन्वा : देवा ! आमची स्थिति तेवढी पालटलीस, पण आमची मनं आमच्या या स्थितीप्रमाणं का पालटली नाहीस ? कलावती, मी जेव्हां पुरुष होतो तेव्हां मला वाटे, आपण नाजुक-

साजुक दिसावं, बोलतांना मान वेळीत बोलावं–चालणंसुद्धा इतकं नाजुक असावं की आपल्या चालण्याची आपल्यालासुद्धा चाहूल लागू नये! पण आता जातिवन्त स्त्री झाल्याबरोबर छाती पुढं करून चालावंसं वाटू लागलं आहे! चालतांना दाणदाण पाय आपटावेसं वाटू लागलं आहे—बोलण्यानं कुंभकर्णानंसुद्धा झोपेतून जागं व्हावं असं आरडून ओरडून बोलावंसं वाटू लागलं आहे. पण आतां काय करणार? (पदर सावरतो.)

कलावती : देवाची करणी विचित्र म्हणतात तेच खरं! मीसुद्धां स्त्री होते तेव्हा मला तुमच्यासारखंच वाटत होतं. पण आता पुरुष झाल्याबरोबर– लाजावसंच वाटतं! सरळ समोर न पहाता हळूच तिरप्या डोळ्यांनी तुमच्याकडे पहाण्याची बुद्धि होते––काय होतं आणि काय नाही! आता वाईट वाटून काय उपयोग! देवा या विचित्र स्थितीतून सोडीव रे बाबा आम्हाला! खरंच अशा उलटसुलट मनोवृत्ति असण्याचं काय बरं कारण? आपण एवढे पढलेले आहात, सांगा तरी बाई विचार करून—

पुष्पधन्वा : आता विचार करण्याशिवाय आमच्या हाती काय राहिलं आहे! तेव्हा आता नुसता विचारच करायचा! भगवान शंकरा, तुला अनन्यभावानं शरण आहोत! आम्ही आपणहून आमच्यावर ओढवून घेतलेल्या या आपत्तीतून सोडीव रे बाबा आम्हाला!

कलावती : जगज्जननी–-देवी भवानी––माते पार्वती! तुला अनन्यभावांनी शरण आहोत. आम्हांला वाटेल ते प्रायश्चित्त दे; पण आई, या आपत्तीतून वांचव! आम्हाला या संकटातून मुक्त केल्याशिवाय आम्ही पुन्हां आमच्या घरचा रस्ता पहाणार नाही, हाच आम्हा उभयतांचा कृतनिश्चय!

पुष्पधन्वा : कलावती ! गडे, आपल्या दोघांच्याहि मतीला भ्रम पडला पहा ! या अरण्यात जे जागृत शिवमंदीर आहे तिथं जाऊन पोहोचण्यापूर्वीच आपण या वाटेतच वेळ गमावीत आहोत ! चल, ते पहा समोरच शिवमंदीर दिसत आहे. श्रीशंकर हे अत्यंत भोळं दैवत आहे; ते आपल्याला प्रसन्न झाल्याशिवाय खचित रहाणार नाही !

कलावती : चला, आपण जिकडे चल म्हणाल तिकडे येणं मला भाग आहे ! माझ्या विचित्र मनःप्रवृत्तीमुळं मी जिवंतपणीच मेल्यासारखी झाले आहे !

पुष्पधन्वा : नाही; प्रिये, वास्तविक तुला लाजिरवाणं वाटण्याचं काहीच कारण नाही ! स्त्रीनं मर्दुमकी गाजविण्यात थोडासा अद्‌भुत रस आहे ! त्यामुळं आसपासचे लोक तुझे पोवाडे गातील ! पण मी पुरुष असून मला पदर सांवरण्याचा प्रसंग आला ! चल लवकर, माझं मलासुद्धा तोंड पाहू नयेसं वाटू लागलं आहे ! चल, समोरच दिसणाऱ्या शिवमंदिरात आपण धरणं धरून बसू !

कलावती : चला तर मग—पण खरंच, आपली स्थिति पालटेल का हो ?

पुष्पधन्वा : मनानं नेहमी धीर धरावा, निराश होऊ नये असं शास्त्र सांगतं; आणि तुला पुन्हा एकदा सांगतो, श्रीशंकर हे दैवत भोळं आहे, ते आपल्याला इष्ट वर खचित देईल !

(जातात; वीरसेन प्रवेश करतो.)

वीरसेन : भगवान शंकरा, तुझे हाल आहेत, बाबा ! तुझ्या भोळेपणावर फार लोकांचा डोळा आहे. यांनी वाटेल तसे स्वैर आचार करावेत आणि त्याचे परिणाम भोगतांना तुला हाक मारावी ! आणि जर तू प्रसन्न झाला नाहीस तर ह्या लोकांचा

तुझ्यावर विनाकारण रोष! भगवान शंकरा, मदनान्तका! तुला माझी हात जोडून विनंति आहे की, पुष्पधन्वा आणि कलावती यांच्यावर जे विचित्र संकट आलं आहे ते निवारण करूं नकोस! कारण हल्ली स्त्रियांचं पुरुषीकरण आणि पुरुषाचं स्त्रीकरण चाललं आहे, त्याचं हे विचित्र चित्र असंच काही लोकांसमोर वावरायला पाहिजे! याना नाही आत्मसंयमन, पण प्रौढविवाह आणि ध्येय ह्यांच्या देखाव्याचे पतंग उडवीत हे एकीकडे लोकांना फसवितात, आणि मनात झुरून स्त्रीसहवासाची उणीव आपल्याच बायकी वागण्यानं भरून निघते! तीच गोष्ट स्त्रियांची. त्यांच्या पुरुषी थाटाच्या वागणुकीला कारण हे असले बायकी पुरुष, किंवा पुरुषांच्यासारखंच काही तरी कारण! ज्यांना अर्थाचे अनर्थ करायचे असतील त्यांनी खुशाल तर्कवितर्क करावेत; पण स्त्रियांनी कोमलच रहायला पाहिजे आणि पुरुषांनी दणगटच असायला पाहिजे! स्त्री आणि पुरुष मिळून व्यक्तित्व पूर्ण होतं. स्त्री-पुरुष ही दोन निरनिराळी तत्त्वं आहेत, आणि ती एकमेकांना पूर्णावस्थेत नेतात! अपवादांनी काही नियम सिद्ध होत नाही; आणि मी म्हणतो हा अनादिसिद्ध नियम आहे! ज्यांना आपल्या आयुष्यातील आनंद व खरा सुखास्वाद घालवायचा असेल त्यांनी खुशाल पुरुषांचं स्त्रीकरण आणि बायकांचं पुरुषीकरण करावं; पण——

(पडद्यात; कलावती व पुष्पधन्वा : हे शंकरा, आम्हाला या संकटातून सोडीव! नाही तर निदान आमचं शरीरसौष्ठव बदललंस त्याप्रमाणं आमची मनंहि बदलून टाक!)

वीरसेन : यांना आतां अकला सुचायला लागल्या, बरं का! ऐकू या, देवाजवळ आणखी काय मागणं मागताहेत ते——

(पडद्यात) कलावती : देवा, मला पुरुषत्व दिलंस पण माझ्या मनातले बायकी विचार जात नाहीत; तेव्हा माझं मन तरी बदलून टाक! पण नको; देवा पुरुष होण्याची माझी इच्छा पुरी झाली. मला पुन्हा स्त्रीच कर, अशी तुला हात जोडून विनंती आहे! पुष्पधन्वा : शंकरा, तू सर्वांठायी वास करतोस; तेव्हां तू कुठंहि असलास तरी माझी विनवणी तुला ऐकायला येईलच! देवा, माझं मन बदलू नकोस. माझं पूर्वस्वरूप मला दे–जय शंभो –हरहर महादेव!!)

वीरसेन : आता का शंकराची आळवणी करता? आणि असं ओरडून तरी आता काय होणार आहे! यांना निराश करून परत फिरवलंच पाहिजे. काय बरं युक्ती योजावी? आतल्या बाजूला जाऊन झाडावर चढावं आणि तिथून खोल आवाजात ओरडावं, म्हणजे ती आकाशवाणीच झाली असं समजून ही घरी निघून जातील! (जातो; व आतून ओरडतो, 'हे माझ्या भक्तांनो, असे बाजूला व्हा! माझ्या देवळात उभं राहण्याइतकं पावित्र्य तुमच्यात राहिलेलं नाही.' दोनतीनदा ओरडतो.)

(पुष्पधन्वा व कलावती येतात.)

पुष्पधन्वा : कुठनं बरं आवाज आला हा?

कलावती : भगवान शंकराची आकाशवाणी असावी ही!

पुष्पधन्वा : पण पुढं कसं काहीच ऐकू येत नाही! देवा, आम्ही आता करावं तरी काय पुढं?

(पडद्यांत) वीरसेन : 'ऐका, जे जे आचार निसर्गतःच तुम्हाला दिले गेले ते सोडून निसर्गालाच तुम्ही अक्कल शिकवायला लागलात. त्याबद्दल मी तुम्हाला क्षमा केली असती, पण

तुम्ही माझा परमप्रिय भक्त जो श्रियाळराजा त्यालाही फसविण्याचा बेत केलात; त्याच्याच आशीर्वादानं तुम्हांला ही स्थिति प्राप्त झाली आहे! मी आपला स्वतःचा शब्द एक वेळ मोडीन, पण माझ्या भक्ताचा शब्द मी कधीहि मोडणार नाही! ही शिक्षा या जन्मी तरी तुम्हाला भोगलीच पाहिजे! आणि निसर्गाविरुद्ध आचरण केल्याबद्दल या जन्मी तुम्ही निपुत्रिक व्हाल, असा माझा तुम्हाला शाप आहे. तरी इथून पुढं जर नीट वागाल तर या जन्मानंतर मुक्त व्हाल! आता माझी अधिक प्रार्थना करण्यात काही अर्थ नाही, उलट आणखी एखाद्या शापाचे धनी व्हाल!)

पुष्पधन्वा : अरेरे! निर्दय दैवा, कसा दावा साधलास! कलावती, माझ्या नाशाचं कारण तू!

कलावती : आता एकमेकावर टेपर फोडण्यात काय अर्थ आहे! आपणामुळंच मी फसले!

पुष्पधन्वा : अखेर फसलोच ना!

कलावती : अग आई ग ऽ!

पुष्पधन्वा : अरे बाप रे?

कलावती : ऐकलत का, आता किती वेळ असं इथंच बसून रहायचं!

पुष्पधन्वा : खरंच, आता मला तुझ्याशिवाय दुसरा कुणाचा आधार?

कलावती : हं! आता आपले एकमेकांचेच एकमेकांना आधार! तेव्हा आपआपसांत आपण आता गोडीगुलाबीनंच रहायला पाहिजे!

पुष्पधन्वा : आयुष्यातली खरी गोडी संपली; आणि नुसता गुळचटपणा खाली राहिला आहे. चला, तोच आता गोड मानून घेतला पाहिजे !

( जातात )

---

## प्रवेश ४ था

( देवी चांगुणा शुभ्र वस्त्रे परिधान केलेली, हसतमुख अशी प्रवेश करते. )

चांगुणा : आज माझ्या आयुष्यातला अत्यंत आनंदाचा दिवस! एक अतिथि आले, बाळ चिलयाला घेऊन गेले ! राहिलेली संपत्ति आणि परिवार घेऊन जाण्याकरिता, विश्वांतल्या प्रेमळ अतिथींनो, अत्यंत उत्साहानं धावून या ! सर्वस्वाचं दान करून आज आम्हांला या प्रपंचातून मोकळं व्हायचं आहे ! दान-त्याग, वैराग्य ही असामान्य माणसाकरिता आहेत असं वाटतं—पण जगांत असामान्य असं काहीच नाही ! दान, त्याग या गोष्टी प्रत्येक प्राणिमात्राला कराव्याच लागतात; पण मनुष्य लोभानं आपला हात मागं घेतो, आणि म्हणून त्याच्या त्यागाचं दिव्य स्वरूप जाऊन, जी ऐहिक, पारमार्थिक संपत्ति 'दान' या उदात्त स्वरूपात दिली जायची ती दरोडेखोरानं लुटल्याप्रमाणं महासमर्थ काळ हिरावून नेतो; आणि अखेर शेवटी प्राणिमात्रा-जवळ काहीच रहात नाही ! बा प्राण्या, तू का विनाकारण लोभात गुंतून आपलं हंसं करून घेतोस ? जे जे तुला पाहिजे असेल त्याचा तू त्याग कर म्हणजे ते ते अक्षय्य स्वरूपात तुला

मिळेल ! ज्याला त्यागाचं महत्त्व, स्वरूप व योग्यता कळली तो अखिल विश्वाचा--अनंत ब्रह्माण्डाचा स्वामी आहे !

[ चाल: धिरधिरना— ]

सतत सुखद दान हे–अंश तनु त्यागा
करि आई सुत प्रसवे–सुख गमत खरे ते ॥ध्रु०॥
स्वर्ग सौख्य त्यागीं ! जना मिळे ॥
सोडिल आशा तया सकल सुख ॥ १ ॥

( पद झाल्यानंतर पडदा उघडतो. अतिथींचे पान मांडले आहे, अतिथि व राजा श्रियाळ बोलत उभे आहेत असा प्रवेश.)

श्रियाळ : महाराज, बसावं या आसनावर--

अतिथि : राजा, मी तर बसतोंच; पण तुझं पान मांडलेलं कुठं दिसत नाही ते ?

श्रियाळ : महाराज, काय सांगू ? मी आपलं पान कसं मांडू ? स्वतःच्या पुत्राचं मांस मी देऊं शकलो, पण ते स्वतःच भक्षण करण्याकरिता मी पान मांडून घेऊन बसू !

अतिथि : राजा, ते सर्व खरं रे ! पण तू यजमान आहेस ! मी जरी एक दारोदार भीक मागणारा अतिथि असलो तरी मलाहि काही रीतभात आहेच की नाही ? तू माझा यजमान-- यजमान पंक्तीला बसल्याशिवाय मी जेवायला कसा बसू ? राजा, नाही, मला एकट्याला जेवायला बसता येणार नाही !

श्रियाळ : महाराज, एरवी रोजचं जेवण असतं तर मी आपल्याबरोबर आदरानं जेवायला बसलो असतो ! पण आजच्या-सारखं अपूर्वं पक्वान्न ! नाही, अतिथिराज, माझा धीर होत नाही !

अतिथि : काय बोलतोस राजा हे तू ! आजचं पक्वान्न एका दृष्टीनं अपूर्वच आहे ! ज्या अपूर्व अन्नानं माझी पोटशूळाची व्यथा बरी होणार, राजा ! तुलाहि पुत्रहानीची व्यथा आहेच, तेव्हा ही अपूर्व मेजवानी करून तुझीहि पुत्रहानीची व्यथा बरी होऊ शकेल ! राजा, ऐक; माझं ऐक आणि घे पाहू आपलं आपण पान वाढून !

चांगुणा : महाराज, सेवेला दासी तयार आहे—(पार्वती प्रवेश करते.)

पार्वती : देवी, व्हा, बाजूला व्हा. आपण आतापर्यंत खूप कष्टला आहात; या अपूर्व अतिथीची सेवा माझ्या हातूनहि थोडीशी होऊ द्या ! आजचं वाढप मी करते--

चांगुणा : कशाला कष्ट तुम्हाला विनाकारण ? आणि मला तरी काय काम आहे आतां ? देवी, सर्व सोहळा माझ्या हातूनच होऊ दे ! माझ्या बाळाची ही माझ्या हातून होणारी अखेरची सेवा आहे ! अतिथिराज, आतां विलंब का ? मध्यान्हकाळ झाला बसावं या पाटावर !

अतिथि : त्यागाच्या देवते, तुझी आज्ञा शिरसावंद्य आहे ! मातोश्री, आतापर्यंत माझे सर्व हट्ट आपण पुरविले—आता एवढा एक शेवटचाच हट्ट पुरवा.

चांगुणा : हट्ट कसला त्यात ? आल्या अतिथीला प्रसन्न करून घेणं हे व्रत आम्ही आपण होऊन पत्करलेलं आहे ! बोला, काय इच्छा आहे आपली ?

अतिथि : माझ्या पंक्तीला श्रियाळराजानं बसावं अशी माझी इच्छा आहे.

चांगुणा : शिवहर रे ! शिवहर रे ! सांब सदाशिव शिवहर

रे ! ( श्रियाळराजास ) देवा, एवढी आघाडी मारलीत--आणि या गोष्टीला का आपण राजी नाही ? बसावं आपणहि पंक्तीला!

श्रियाळ : काय, पंक्तीला बसू ? स्वतःच्या पुत्राचं मास खाऊ ? स्वतःच्या पोटच्या पोराचा अस्थि-मांसाचा रगतभात खायला बसू? देवी, चिलयाच्या माते ! कोण, तूच का हे सांगते आहेस ?

चांगुणा : होय, मीच; बाळ चिलयाची आई--चिलु बाळाची माता-- आपल्याला सांगते आहे ! अघटित काय वाटलं यात आपल्याला ? आणि जरी थोडंसं अघटित असलं, तरी देवा, त्याला टाळून आतां कसं बरं चालेल ? अघटित कर्तृत्वाचा किती तरी मार्ग आपण आतापर्यंत आक्रमिला आहे. आणि आताच अशी बुद्धीला भुरळ कशी ? स्वतःच्या मुलाचं दान आतापर्यंत कुणी केलं आहे का ? आपल्या हातानं कुणी आपल्या मुलाचं शिर आपणच उखळात घालून कांडतांना आतापर्यंत कुणी कुणाला पाहिलं आहे का ? कोणी न केलेल्या--ऐकलेल्या गोष्टी आतापर्यंत आपण इतक्या केल्या आहेत, आणि आताच आपल्याला कसं बरं नाही म्हणता येईल ?

श्रियाळ : देवी, आपण म्हणता ते मनाला पटतं हो !—पण धीर होत नाही मनाला पाटावर बसण्याचा !

चांगुणा : असं म्हणून कसं चालेल ! देवा, असं म्हणून नाही बरं चालणार ! आयुष्यातील माझ्या भागीदारा, आता असं म्हणून नाही बरं चालणार ! मला काहीच का कष्ट होत नसतील ? आणि असं पहा, बाळाचा भार मी नऊ महिने वाहिला तोच तुम्हाला चार प्रहरात खाऊन पचवून टाकायला काही जड नाही ! महाराज, आता पानावर बसावं—पानावर बसून तुम्हाला जितके कष्ट होणार नाहीत--तितके मला बोलताना

होत आहेत हो ! आणि आपणच मला परवा सांगितलंत ना—
दु:खाचे विलास भोगायचे आहेत आपल्याला !

अतिथि : राजेश्वरा, देवीची आज्ञा उल्लंघन करणं पाप आहे. चल माझ्या पंक्तीला—

श्रियाळ : ठीक आहे; देवी, आणा तर मग पान वाढून—

( चांगुणा जाऊं लागते तोच— )

अतिथि : मातोश्री, आता शेवटची इच्छा आहे आपणहि माझ्या पंक्तीला यावं ?

चांगुणा : त्यालाहि माझी तयारीच आहे ! अतिथिराज, आले मी ! मी चिलयाची आई आहे; मला त्याची कोणती सेवा गोड मानून घेतलीच पाहिजे ! पण देवा, मी जेवायला बसल्यानंतर वाढप कोण करणार !

अतिथि : ( पार्वतीकडे बोट करून ) या कोण आहेत मला माहीत नाही, पण प्रेमळ बहिणीप्रमाणं आपल्यावर आलेल्या कोणत्याही प्रसंगाला या हजर असतात ! या घेतील आपल्या-करिता थोडासा त्रास. हरकत नाही ना काही तुमची ?

पार्वती : माझी कसली हरकत असणार ? तुम्हा सर्वत्रांची सेवा करायला मी तयार आहे !

चांगुणा : नाही तरी त्यांच्या मनाचा हिरमोड झालेलाच आहे ! ऐकलत का, या आपल्याकडे ज्या आल्या—त्या दासीची नोकरी मागण्याकरिता म्हणूनच आल्या ! पण मी यांच्या उज्ज्वल मुखावरून ओळखलं की या काही सेवा करण्याकरिता जन्माला आलेल्या नाहीत ! यांनाहि दोन मुलगे आहेत हो.

अतिथि : असं का, भाग्याच्या आहेत तर मग ! पण आता उशीर का विनाकारण ? बसू या आता आपण भोजनाला—

( पार्वतीदेवी पाने वाढतात. )

चांगुणा : अतिथिराज, करावी सुरवात —

अतिथि : ( एकदम पानावरून उठून ) नाही, देवी ! मला जेवता येणार नाही !

चांगुणा : का बरं ? चुकलं का आमच्या हातून काही ?

अतिथि : नाही, मला जेवता येणार नाही !

चांगुणा : का ? का--असं का ? अतिथीराज, असं का तेवढं सांगा ! शंकरा, भगवान चंद्रमौले--चंद्रशेखरा, वृषभध्वजा, सदाशिवा--असा शेवटी मात्र अंत पाहू नकोस ! दिल्या दानाचा जर उपयोग झाला नाही—तर त्या दानाचा काय उपयोग ? (अतिथीचे पाय धरून) देवा, का असा कोप आमच्यावर ? चुकल्यामाकल्याची क्षमा करा, आम्हांला पदरात घ्या !

अतिथि : मातोश्री, उठा, उठा; पाया पडण्याचं काय कारण? चूक तुमची नाही—चूक माझी आहे ! अरेरे, कसा असा माझा बुद्धिभ्रंश झाला ! मातोश्री, तुमचा एकुलताएक चिलुबाळ मी भोजनाकरिता मागून घेतला—पण त्या वेळेला माझ्या लक्षात आलं नाही—अरेरे ! पापी—पापी चांडाळ मी ! मातोश्री, माझा नियम आहे, मी निपुत्रिकाच्या घरी जेवत नाही—निपुत्रिकाच्या घरी मी पाणीसुद्धा पीत नाही !

चांगुणा : शंकरा ! दीनानाथा—पार्वतीपते ! आता मात्र तुझ्याशिवाय आम्हांला कोणीच त्राता नाही ! देवा, आता या संकटातून सुटण्याचा मार्ग आपणच दाखवाल तर दाखवाल ! अशा विचित्र तऱ्हेनं 'निपुत्रिक' असण्याचा कलंक आम्हाला लागला ! देवा, आमचं तोंड आता काळं झालं ! आता तुझ्याशिवाय आम्हांला कोणीच त्राता उरला नाही !

अतिथि : मातोश्री ! अशा निराश होऊ नका. केल्या कर्मा-प्रमाणं सुखदुःख भोगणारा मीहि एक मर्त्य जीव आहे ! हा निपुत्रिकपणाचा कलंक मलाहि धुवून काढता येईल ! मलाहि तुमच्याकरिता काही त्याग करता येईल ! देवी, माझ्या हातून कळत नकळत काही पापकर्मं घडली असतील म्हणून ही पोट-शूळाची व्यथा माझ्या मागं लागली हे जसं खरं, तसं मी आपल्या आयुष्यांत काही पुण्यकर्मंहि केली असतील ! मातोश्री, हाक मारा--बाळ चिलयाला हाक मारा ! चिलयाचं संजीवन होण्या-करिता मी आपल्या सर्व पुण्यांशाचं दान करीत आहे ! मातोश्री, हाक मारा माझ्या बंधूला !

चांगुणा : अतिथिराज, एवढी मात्र गोष्ट करायला सांगू नका ! आपण अतिथि आहात--आपल्या इच्छा आम्ही पूर्ण करायच्या, आणि त्याच्याबद्दल शुभाशीर्वादाशिवाय आम्ही आपल्याकडून दुसऱ्या कशाचीहि अपेक्षा करायची नाही ! आमच्याकरिता आपण आपल्या पुण्याचा क्षय करू नका ! आमचं दैवत आमची मनकामना पूर्ण करील ! आपण आपल्या पुण्याचा क्षय करू नका, देवा !

अतिथि : देवी, आपल्याला असं बोलायला शिकवलं तरी कुणी ? आईनं मुलांकरिता वाटेल ते कष्ट सोसावेत—आणि मुलानं मात्र कृतघ्न व्हावं असं का आपण म्हणता ? नाही, मी कृतघ्न नाही ! आणि छेः ! आता मला हे सहनहि होत नाही ! देवी चांगुणा, या अतिथीची तुला आज्ञा आहे. बाळ चिलयाला हाक मार ! आणि ज्या भोळ्या शंकराला प्रसन्न करून घेण्या-करिता आपण हा त्याग आरंभिला आहे त्याची शपथ घालून

तुम्हाला सांगतो, की बाळ चिलयाला हाक मारा, तोच भोळा शंकर माझ्या अंतःकरणात स्फुरण पावून तुम्हांला ही आज्ञा करीत आहे असं समजा; आणि याउपरहि जर आपण माझी अवज्ञा कराल तर तो या अतिथीचा अपमान नसून तुमच्या दैवताचा--भोळ्या शंकराचा तो अपमान आहे!

चांगुणा : आता इलाजच नाही; हा पहा मला प्रेमपान्हा फुटला. बाळ चिलयाला आलिंगन देण्याकरिता माझे बाहु स्फुरण पावूं लागले--बाळाच्या चुंबनाकरिता माझ्या ओठांची धडपड चालू झाली, यावरून माझ्या शंकराचीही मी बाळाला हाक मारावी अशीच इच्छा दिसते आहे! तर मग, बाळा--ये!

[ चाल : राग भैरवी, ताल--त्रिवट ]

चिलया त्वरे चल धावुनी ये।
विरहे तुझ्या मी व्याकूल झाले! ॥ ध्रृ० ॥
मी हाल केले विसरूनि बाळा।
तव गोड बोला मज ऐकवी रे ॥ १ ॥

( आकाशातून पुष्पवृष्टि होते व त्यांतूनच बाळ चिलया प्रकट होतो. चिलया चांगुणेला एकदम मिठी मारतो.)

चिलया : आई! आई—आई--!

चांगुणा : काय बाळ--?

चिलया : आई! आई--! आनंद झाला! मला हेच ओरडून सांगावंसं वाटतं, की तू माझी आई आहेस! माझ्या आई--

चांगुणा : काय म्हणतोस, बाळा! बाळ, मी तुला आई शोभत नाही रे! तुझ्याशी किती निष्ठुरतेनं वागले--

चिलया : आई! आई कितीहि निष्ठुर झाली तरी आईची

माया निष्ठुर होणं शक्य नाही ! आई, माझ्यावर जेव्हा तातांनी तरवारीचा प्रहार केला--त्या वेळी मी एकदम डोळे मिटले, आणि मला आठवतं, नंतर मी गुलाबाचं झाड झालो आणि माझ्या हातापायांच्या जागी गुलाबाची फुलं निर्माण झाली ! आणि मग तू ते माझ्या हातापायांचं एक एक गूलाबाचं फूल खुडून देवाच्या पायावर वाहिलंस ! आणि माझ्या झाडाचं शेवटचं फूल जेव्हा तू तोडलंस तेव्हा पटकन् मी आकाशीची चांदणी झालो आणि आकाशात चमकत राहिलो ! तिथून मी तुमच्याकडे एकसारखा टक लावून पहात होतो-- मला काय गंमत वाटत होती म्हणून सांगू आई, तुला ! आणि तुम्ही दोघं माझ्याकरिता रडत होता---तेव्हा किनई आई, मला खूपखूप हंसायला येत होत ! आणि खरंच, माझी दुसरी आई कुठं आहे ग ?

चांगुणा : त्या बघ, बाळ, उभ्या आहेत तिथं--( चिलया व चांगुणा मागे पहातात, तो मागचा पडदा उघडतो. अतिथि शंकरस्वरूपात बसलेले आहेत. पार्वतीदेवी शेजारी बसल्या आहेत.)

पार्वती : चिलया---बाळा, ओळख विसरलास वाटतं माझी ! ये--ये माझ्या मांडीवर---

श्रीशंकर : वत्सा ! चल—चल—चल !

चांगुणा : भगवान--आपण का आमच्याकरितां एवढे कष्ट घेतलेत ?

श्रियाळ : आणि पार्वतीमातोश्री, आपण का दासी म्हणून आमच्या घरी आला होतात--?

श्रीशंकर : भक्तश्रेष्ठ श्रियाळराजा, मीच आलो होतो--तुझा अतिथि तो मीच ! कोणतंहि तप एकनिष्ठेच्या बळावर

फलद्रूप होत असतं; मग ते तप स्वर्गाच्या प्राप्तीकरिता, देशाच्या स्वातंत्र्याकरिता किंवा यापेक्षा अगदी हलक्या अशा कोणत्याही इच्छेकरिता असो. ज्या मानानं निष्ठा असेल त्याप्रमाणं फलप्राप्ति होईल ! एकनिष्ठेनं देव प्रसन्न होतो, एवढंच नव्हे तर एक-निष्ठेनं मनुष्यच देवरूप होतो ! पवित्र भावना आणि एकनिष्ठा या कोणच्याहि ध्येयप्राप्तीच्या शिडया आहेत ! चिलू बाळा, चल ये--

चिलया : आई, जाऊं मी तिकडे ? मगाशी तू हाक मारलीस तेव्हा जसा मी धांवून आलो त्याप्रमाणं मी त्या आईच्या मांडी-वर बसून तुला हाक मारतो; मग तू ये हं माझ्याजवळ !

चांगुणा : बरं हो बाळ ! ( चिलया पार्वतीदेवीच्या मांडीवर बसतो. श्री. शंकर त्याला जवळ घेऊ लागतात. तो दोघांच्या मध्ये बसतो. )

श्रीशंकर : श्रियाळराजा, देवी चांगुणे, आपली आता काय इच्छा आहे ?

श्रियाळ : महाराज, आम्ही आता निरिच्छ झालो आहोत ! सर्व तऱ्हेची सुखदुःख आम्ही भोगलेली आहेत; आता आपल्या स्वरूपात ठाव मिळावा एवढीच इच्छा आहे !

श्रीशंकर व पार्वती : तथास्तु--तथास्तु--तथास्तु !!!

( चाल : सोहनी रूपक )

द्या बुद्धिबल ही विजयश्रीला। देई वर हा भारता ! ॥ ध्रु० ॥
क्षुद्र खलमल भेद जावो । धर्मरविचा उदय पावो ।
ऐक्य बल आनंद नांदो । हाचि वर दे भारता ॥१॥

---

संगीत

# बोलका सिनेमा

यशवंत गोपाळ जोशी

'प्रसाद' रौप्यमहोत्सवी प्रकाशन

प्रकाशक :

मनोहर य. जोशी, B.A., B. Com.

प्रसाद प्रकाशन

१८९२, सदाशिव, पुणे ३०

*

रौप्यमहोत्सवी प्रकाशन

१९७२

*

मुद्रक :

र. भ. निगुडकर

प्रकाश मुद्रणालय

३९५/४, सदाशिव, पुणे ३०

म. ग्रं. ... शाखा.
दा. क्र. ७५८३५ ता. २०।२।५५
वि. ना. ना

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

नवीन नीफ रुळण्याकरिता आपण ज्याप्रमाणे त्या निफाने पहिल्यांदा वाटेल तो मजकूर खरडून पाहतो त्याप्रमाणे नाट्य-वाङमय लिहिण्यापूर्वी मी ‘ संगीत श्रीमुखात ’ व ‘ बोलका सिनेमा ’ ही दोन प्रहसने लिहिली. ‘श्रीमुखात’ हे मागेच प्रसिद्ध झाले असून ‘ बोलका सिनेमा ’ हे आज प्रसिद्ध होत आहे. बोलका सिनेमा हे प्रहसन लिहिल्याला तीन वर्षे होऊन गेली. आता त्याच्यावरचा धुराळा झाडताना त्यात थोडी साफसुफीही केलेली आहे ! नीफ चालू करताना जरी आपण काही सुसंबद्ध मजकूर लिहीत नसलो तरी त्या लिहिण्यातही काही तरी हेतू असतोच. तसेच हे आहे. व त्याच दृष्टीने वाचकांनी व प्रेक्षकांनी हे पहावे.

वास्तविक गंभीर लेखनाकडे माझा मूळचा कल; पण ‘ विनोदी प्रहसनामुळे ’ माझा नाट्यव्यवसायात शिरकाव होत आहे व गंभीर

आणि रसपूर्ण अशी माझ्या जवळची तीन नाटके 'गंभीर चेहेरा' करून माझ्याच टेबलावर पडून आहेत !

असो. माझे मित्र रा. विश्वनाथ गणेश ताम्हणकर यांनी सदर पुस्तकाचे प्रकाशन पत्करल्याबद्दल त्यांचा व रा. शिंदे यांच्या "नाट्यविजय नाटक मंडळीतील" सर्व नटवर्गाचा मी आभारी आहे. त्यातल्या त्यात माझे नटमित्र श्री. बापट व पुराणिक यांचा विशेष उल्लेख करणे जरूर आहे.

तसेच पुणे येथील आनंद प्रेसने सदर पुस्तक तातडीने दोन-तीन दिवसांत छापून दिल्याबद्दल सदर छापखान्याचा व त्याचे मॅनेजर श्री. गुर्जर व दामोदरपंत जोशी यांचाही मी आभारी आहे.

ता. १३-१२-१९३२ यशवंत गोपाळ जोशी

# बोलका सिनेमा

## अंक पाहिला

### प्रवेश पहिला

( बार होतो व पडदा उघडतो. सूत्रधार व एक नर्तकी उभी आहे असा प्रवेश. )

सूत्रधार : नमन शारदा पदा—

नर्तकी : अहो, आमचे मालक असलात तरी जगाच्या मागे ३५० वर्षे आहांत ! आता सूत्रधार प्रवेश पाह्यला कुणाचीही तयारी नाही, समजलांत ! कंपनी चालावी अशी इच्छा असेल तर हे तुमचे शारदास्तवन–टाळ, झांजा बंद करा. आणि खेळाची सुरवात नव्यानवाईने करा.

सूत्रधार : बरोबर आहे, अगदी बरोबर आहे. मी आत जाऊन माझ्या प्रियेला–नटीला बोलावून आणतों आणि—

नर्तकी : ते काही नाही, एकाद्या भयंकर साथीचा रोग येऊन ही जुन्या विचारांची पिढी साफ झालीच पाहिजे ! म्हणे बायकोला घेऊन येतो. अहो, नवराबायकोच्या प्रेमप्रवेशाची किंमत आता गेली आहे, समजलात ! सध्या बिझिकचा डाव चालू आहे ! या डावात राजाराणींना किंमत नसते ! राणीगुलामांना खरी किंमत असते. तुमच्या कंपनीत इतके दिवस अन्न खाल्यामुळे तुमच्या कंपनीची काळजी मला जास्त आहे ! तुम्ही आत जा आणि खेळाच्या तयारीला लागा ! तोपर्यंत परमेश्वराचं नाव

मनात गुणगुणून मी करते या रसिकांचं स्वागत ! उगीच उशीर नको. (पायांत चाळ बांधू लागते.)

सूत्रधार : (स्वगत) पैशापायी मनुष्य असा रंजिस येतो ! आता या बायका जशा नाचतील तसे त्यांना नाचू दिले पाहिजे ! आम्ही नुसते नावाचे मालक; खरा रुबाब आणि दरारा यांचाच !

(नर्तकी नाचाला सुरवात करते. सूत्रधार तिरस्काराने दुसरीकडे पाहतो. ती लाडिकपणाने सूत्रधाराच्या जवळ जवळ येते.)

सूत्रधार : आता रसिकांची आणि हिची परस्पर गाठ पडल्यानंतर माझी लुडबुड इथे कशाला ? चला, आपण पुढच्या तयारीला लागावे.

(सूत्रधार जातो. नर्तकी प्रेक्षकांना मुजरा करून नाचाला आरंभ करते. व थोडा वेळ नाचल्यानंतर पडदा पडतो.)

---

## प्रवेश दुसरा

(वैकुंठ, सदानंद व बिभीषण. वैकुंठ गात आहे असा प्रवेश.)

वैकुंठ : भराऱ्या माझिया त्या तुझ्या प्रीतिविना पंगू ॥
जरी ना होशी मस्तानी कसा गे होऊ मी बाजी ॥१॥

सदानंद : वारे वा, मजा उडवलास बुवा ! वैकुंठा, जसा तुला गळा आहे तसं जर शरीरसौष्ठव असतं तर महा भयंकर नट झाला असतास बुवा !

बिभीषण : शरीराचं जाऊं दे; पण वैकुंठाचा मुखडा कसा आहे ? आणि क्षणाक्षणाला चेहरे काय मजेदार पालटतो ! आपण तर अगदी खूष आहो बुवा वैकुंठाच्या चेहऱ्यावर !

सदानंद : पण चेहेरा सदोदित रडवा--

वैकुंठ : (पुढे येऊन व्याख्यात्याच्या सुरात.) माझ्या या रडव्या चेहऱ्याची सारी जबाबदारी या समाजावर आहे ! चालू सरकारावर आहे ! कुठल्याही ऑफिसात जा, अर्ज कितीही सुंदर लिहा, टाईपरायटरवर छापून न्या, सर्व जातीच्या अर्जांना 'नो व्हेकन्सी' हे ठराविक उत्तर हं ? खाजगी नोकरीत पंधरा रुपयावर पगार नाही, पंधरा रुपये पगार वेळेवर मिळायचा नाही, आणि शिवाय मालकाची एकसारखी करावी लागणारी हांजी हांजी ! आपल्या हातून साफ होणं शक्य नाही ! पगार पंधरा रुपये हं ? इथे पंधरा रुपये विड्या सिगारेटस्‌ना पुरत नाहीत आम्हाला, आणि पगार पंधरा रुपये; हं ? ते काही नाही, मित्रांनो, आपण काही तरी केलं पाहिजे !

बिभीषण : पण काय करणार ?

सदानंद : काय करणार ? ते काही नाही. काही तरी केलंच पाहिजे !

वैकुंठ : मित्रांनो, टाळी द्या ! टाळी द्या ! हॅम्लेटला बापाचा खून चुलत्याने केला हे सत्य कळताच त्याला जसं आनंदाने अस्मान ठेंगणं झालं तसं मला झालं आहे ! माझ्या कल्पने की जय ! सांगा, सांगा मित्रांनो माझी कल्पना कशी काय आहे ?

सदानंद : अतिशय सुंदर आहे. पण कल्पना काय आहे ती बोला बुवा !

वैकुंठ : नाही कळत ? नाही कळत ? ही बघा माझी कल्पना.

बिभीषण : कुठे, कुठे ! खिशात आहे की काय ?

वैकुंठ : नाही. ही पहा चेहेऱ्यावर आहे ( वाकडे तिकडे वाटेल तसे चेहरे करतो व एकदम टाळी वाजवून ) आपण आता सिनेमा कंपनी काढणार ! ( उसासा टाकून ) पण भांडवल ?

मित्रांनो, या सिंहाचे पाय गळाले–नखे बोथटली ( एकदम खाली बसून ) भांडवलाचं काय करणार ?

विभीषण : वत्सा, असा हताश होऊ नकोस. माझ्याजवळ जरी भांडवल नसलं तरी गृहपरिस्थितीच्या भपक्यावर एकाद्या उल्लू सावकाराच्या डोळ्यात धूळ टाकून आपण भांडवल उभे करू ! तू काळजी करू नकोस !

वैकुंठ : एक प्रश्न मिटला ! पण नटी ? अभागी आर्यदेशा–कुलवान् बायकांना नटीचं काम करण्याची अजून सुबुद्धि सुचू नये हं ! हाय, हाय, कोण या आर्यावर्ताची दुर्दशा ! अजून बायका नटी होत नाहीत! कसं कसं स्वराज्य मिळणार–स्वराज्य दूरच राहिलं–पण डोमिनियन स्टेटस् तरी अशाने मिळेल का ?

सदानंद : वत्सा, काळजी करू नकोस ! याच्या गृहस्थितीच्या जोरावर आपण भांडवल काढू. माझ्या–माझ्या रंगेलपणाच्या जोरावर मी नटी पैदा करतो ! पण कायरे, बायकांनी नाटकात कामं करावी म्हणतोस. मग तू तर विवाहित आहेस. मग का नाही आपल्या बायकोला काम करायला लावीत ?

विभीषण : हो खरंच, वैकुंठा, तुझी बायको खरंच सुंदर आहे. नाव कमवील बघ ! काय सांगू तुला वैकुंठा, तुझ्या बायकोनं जर काम केलं तर–तर हुबेहुब 'स्ट्रेट' गंधर्व ! डिट्टो गंधर्व ! ! लोक झुलवायला काय हरकत आहे ! करतोस का धाडस–

सदानंद : अरे येवढं धाडस तू करायचाच अवकाश की पैसा पायाशी लोळण घेत येईल तुझ्या ! गावातले पंढरीनाथ, एकनाथ, गंगारामबुवा, तुकारामबुवा वगैरे सरदार–दरकदार सोन्याची पदकं बिल्ले घेऊन तुझ्या बायकोच्या चरणी लोळण घालतील ! अरे आहेस कुठे तू ?

वैकुंठ : (स्वगत) अरेरे सफाई घोटाळा झाला ! कशाला कशाला माझं लग्न झालं ! नसत झाल तरी परवडल असतं ! असली अंगलट येणारी बेजबाबदार विधानं सड्या फटिंगांनी करायची असतात हे मी विसरलोच ! वेळ प्रसंग पडल्यास नटीशी लग्न करता येईल. पण लग्नाच्या बायकोला नटी बनवणं काही शक्य नाही बुवा ! (उघड) अरे सगळं खरं ! पण जमलं तर आपण हळूहळू पुढे पाहू. तूर्त नको. नाही तर मी म्हणतो सिनेमा फिल्म कंपनी सुद्धा नंतर काही दिवसांनीच काढू आपण ! काय ? (स्वगत) माझा पत्रिकेवर आहे विश्वास. माझ्या बायकोच्या पत्रिकेप्रमाणे तिला पुढच्या वर्षी आहे मृत्युयोग. पत्रिकेप्रमाणे जर यदाकदाचित् ती आटपली तर हा पठ्ठ्या पुन्हा लग्नाचं नाव नाही काढणार ! बायकोचा मृत्यू की आमच्या फिल्म कंपनीचा जन्म ! नेऊ या हे एक वर्ष तसंच रेटून !

बिभीषण : वैकुंठा, असा घाबरू नकोस ! दुःशासनाने द्रौपदीला भरसभेत हात धरून खेचून आणली, त्याप्रमाणे आम्ही काही तुझ्या बायकोची ओढाताण करीत नाही ! अरे या सुधारणेच्या अभिनव कल्पनेच्या गोष्टी नेहमी दुसऱ्याच्या खिशावर व संसारावरच बेतायच्या असतात. बरं, ते जाऊं दे; पण कायरे सदानंद, तुझी ती विठी आणि रंगी येतील का नाही ?

सदानंद : हात्त्याच्या. न यायला काय झालं ? पण गाढवा, अगदी गद्यांत नावं घेतलीस की त्यांची ! अरे ती विठी आणि ती रंगी म्हणजे खऱ्या 'चंद्रिका' आणि 'मनोरमा'! त्यांच्या आईबापांनी चुकून त्यांची विठी आणि रंगी अशी नावे ठेविली. आणि सिनेमात त्या आल्यानंतर तर त्यांची पुन्हा बारशी करायला पाहिजेत ! एकीचं नाव ठेवणार आहे मी 'नूरजहान' आणि

दुसरी ' मस्तानी ' ! बरं, तर ' शुभश्च शीघ्रम् '. आजच्या आज पेंटरकडे बोर्ड रंगवायला द्या कंपनीच्या नावाचा ! वर्तमानपत्रात जाहिरात द्या नट–बोलट पाहिजेत म्हणून !

बिभीषण : तसंच लेखकांना गोष्टीबद्दलही जाहिरात द्या. आलेल्या गोष्टींत पहिल्या नंबरची गोष्ट ठरेल त्यांस एक हजार रुपयांचं बक्षिस देऊ असं जाहीर करा.

वैकुंठ : माझ्या डोक्यात एक गमतीची कल्पना आली आहे. पहिल्या गोष्टीस एक हजार बक्षिस हे ठीक झालं पण ज्या गोष्टी नापास होतील त्या गोष्टींच्या लेखकांनी प्रत्येकी शंभर रुपये दंड कंपनीला द्यावा लागेल अशी टीप घाला त्या जाहिरातीत.

सदानंद : मंजूर. चल लिही जाहिरात.

वैकुंठ : अरे, ज्या गोष्टी आज आपण तोंडावाटे बाहेर काढतो त्या आपल्या अंतःकरणात कधीच शिजत असतात ! अरे दोस्त हो, हा पहा जाहिरातींचा मसुदा तयार आहे ! पहा वाचून–

सदानंद : ओ–होऽ ! ऐका.

" अभिनव फिल्म कंपनी लवकरच सुरू होणार !

स्वार्थ साधून परमार्थ साधा ! तारखेकडे लक्ष असू द्या.

कंपनीकडे–कंपनीच्या बिऱ्हाडाकडे, कंपनीच्या नट–नटींकडे लक्ष असू द्या ! कंपनीस भांडवलाची भरपूर मदत झाली असून कितीही नासधूस, उधळमाधळ झाली तरी कंपनीस तीन वर्षे भीती नाही असे तज्ज्ञांचे व प्रसिद्ध डॉक्टरांचे मत आहे. कंपनीस भांडवल पुरवणारी व्यक्ति म्हणजे कंपनीची आदिशक्ति रा. रा. बिभीषण हे असून कंपनीच्या देण्याघेण्यास सर्वस्वी तेच जबाबदार राहतील ! अप्रसिद्ध नकलाकार व स्वतःच्या लग्नाच्या बायकोकडून ' येळकोट मल्हार ' ही अभिनव पदवी प्राप्त झालेले

प्रो. येळकोट मल्हार वैकुंठराव हे कंपनीचे धंद्यातील डायरेक्टर असून प्रसिद्ध रसिक सदानंद महाराज यांच्या कृपेने व वशिल्याने श्रीमती दुर्गी व ठकी भांबुर्डेकरीण, नव्हे नव्हे श्रीमती चंद्रिका-बाईसाहेब व रंभा आत्याबाई यांनी नटीची कामे करण्याचं कबूल केलं आहे. बाकी लागणारे नट बोलट त्वरित पाहिजेत! लायकीप्रमाणे भरपूर पगार! लायकी मात्र आम्ही ठरवणार! नोकरीस राहाणारास तीन दिवसांचा बाँड लिहून द्यावा लागल! कंपनीचा पहिला चित्रपट 'धुमधडाका' हा असून त्या चित्रपटास लागणारे कॅमेरा–फिल्म्स–निगेटिव्हस्–पॉझिटिव्हस् वगैरे सर्व तऱ्हेचे सामान खास विलायतेहून आणविणार आहोत!

त्वरा करा! त्वरा करा! त्वरा करा!

धावा, पळा, धूम ठोका! कंपनीचे ऑफिस सदाशिव गल्लीत असून घर नंबर ३६ आहे! कंपनीचे समोरील रस्ते म्युनिसि-पालिटीने नुकतेच केलेले असल्यामुळे आपण धावत आलात तरी वाटेत ठेच लागून पडण्याची अजिबात धास्ती ताही!

सबब धावा–पळा–धूम ठोका!'

बिभीषण : काय रे लेका वैकुंठा, श्रीमती चंद्रा आणि रंभा यांची नावं आगाऊच कशी दडपलीस? आणि मी भांडवलाची सोय करीन असं तुझं माझं कधी बोलणं झालं होतं का?

वैकुंठ : याचं उत्तर संक्षेपानं द्यायंच म्हणजे 'डोळा'! अरे लोक हो, माझा डोळा या बिभीषणाच्या खिशावर आणि तुझ्या ओळखीमुळे त्या दुसऱ्या जिनसांवर कधीपासूनचा आहे!

सदानंद : वेष असावा बावळा। अंतरी असाव्या नाना कळा! बरं चला, पुढच्या व्यवस्थेला लागू आता.

बिभीषण : ओ हो ! ओ हो ! मजा आला, मजा आला ! जर आपल्याला कंपनीत यश आलं-काय समजलेत-जर आपल्याला कंपनीत यश आलं–तर आपण आपला फोटो आणि चरित्र पदरचे पैसे देऊन छापू एखाद्या मासिकात ! आणि दोस्त हो, आताच्या या सड्याफटिंग वृत्तीचा मागमूस लागू द्यायचा नाही हं त्या चरित्रात ! काय वाटेल त्या थापा मारू ! आपण आपल्या आईबापांना सत्यवान् सावित्री बनवू ! देवधर्मावर त्यांचं लक्ष ठेवू आणि मग सध्या जरी मी आपल्या आईला प्रत्यक्ष नसल्या तरी शाब्दिक लाथा मारतो आहे तरी चरित्राच्या वेळी त्या आमच्या आईट्लीला 'माऊली' संबोधून त्या माऊलीच्या पोटी हा 'हिरा' जन्माला आला म्हणून लिहू हं चरित्रात ! काय ?

सदानंद : दॅट्स् राईट !

वैकुंठ : अगदी बरोबर ! अगदी बरोबर !

बिभीषण : चला. तावडतोब हला इथून ! नाहीतर शेजारीच वर्तमानपत्राचं ऑफिस आहे ! आपण पुढं करणार असलेल्या प्रचंड क्रांतिकारक कामगिरीची कुणकुण जर आत्ताच त्यांच्या कानावर गेली, तर पटकन् त्याचा बातमीदार आपली सर्वांची मुलाखत घ्यायला यायचा !

वैकुंठ : काय रे, ही मुलाखतीची भानगड काय आहे ?

सदानंद : त्याच असं आहे. ज्या दिवशी ज्याची मुलाखत घ्यायची असेल त्याला रामरूप मानून मुलाखत घेणाऱ्या प्रतिनिधीने हनुमंताचा अवतार घ्यायचा ! प्रतिनिधिरूप मारुतीने हात जोडून विचारायचं 'जगाविषयी आपलं काय मत आहे !' आणि त्या दिवशीच्या रामरायाने शिराळशेटी अधिकारात सांगायचं की 'सगळं जग गाढव आहे !' चला घाबरू नका.

काम करायला सुरवात करा. म्हणजे कोण आपल्या मुलाखती छापीत नाहीत, तेच पाहतो. चला कार्याला सुरवात. (जातात.)

---

## प्रवेश तिसरा

( स्थळ : रस्ता. एकीकडून कवि चातक व एकीकडून विठी मोलकरीण प्रवेश करते. )

विठी : मोलकरणी माळणींना काय बी मिळत नाय ! तवा हा धंदा सोडून शिनेमा कंपनीत काम मिळालं तर बगाया होव ! तिथं काय म्हन योका महिन्याला पाच वीसा रुपये पगार मिळतूया ! पन आपणाला तथं कोन ठेवणार ? मला बी आताशा शेनिमाचा लई नाद लागलाय ! पण काय करनार ! तथं लागनार हावभाव मी अक्षि पाठ करून ठेवल्याती ! पन त्याच चीज कवा होनार हे रामराया तुलाच ठाऊक ! यो बया, ह्यो तर आमच्या शेजारचा कपि चातक. परवा त्या शेनिमा कंपनीच्या बिऱ्हाडातून बाहेर पडताना बघितल्यावानि वाटतुया ! तवा त्यालाच विचारावं–अहो कपी–

चातक : ए विठे–कपि म्हणतेस मला. लाज नाही वाटत ?

विठी : द्येवा–का असं रागवता गरिवावर ? कपि म्हटलं तर काय झालं ? आपल्या डोक्यातल्या गोष्टी काढून लिव्हनं पुसनं करतात त्यांना ' कपिच ' म्हणतात ना जणु ?

चातक : विठे, काय हे तुझे अज्ञान ! अग त्यांना कपि म्हणत नाहीत कवी म्हणतात, देवी ! कपि म्हणजे काय माहित आहे का तुला ?

विठी : नाय बया !

चातक : अग कपि म्हणजे माकड !

विठी : यो बया ! द्येवा, चुकून काईच्या बाईच बोलल्ये बघा ! मी आपल्या पायाची बटकूर आहे ! रागाऊ नका हं धनी !

चातक : नाही रागावणार ! आणि पहिल्यांदा सुद्धा रागावलो नसतो, पण फार मार्मिक लोक अलीकडे कवींना कपि म्हणायला लागले आहेत आणि मला वाटलं तेच तुला कळलं की काय ?

विठी : न्हाई जी ! आम्हाला काय समजतंय त्यातलं ? पन द्येवा, आपलं एक काम कराल का ?

चातक : माझ्याकडे काय आहे काम तुझं ?

विठी : मला एका शेणिमा कंपनीत द्याना चिकटवून !

चाणक : अग विठे, विठे म्हणतेस तरी काय तू ! तू सिनेमाची स्टार होणार ?

विठी : काय म्हणता, शेणिमात मी ठार होणार ?

चातक : चल, अगदी वेडी आहेस तू ! तुला नाही समजणार त्यातलं काही. बरं पण हरकत नाही–तुझी तयारी आहे ना ? मी करतो तुझ्याकरिता काही तरी व्यवस्था–पण तिथं हावभाव करावे लागतात ते जमतील का तुला—

विठी : हो द्येवा–मी शेनिमा पाहून पाहून पाठ करूनशान ठेवल्याति हावभाव ! लक्षात राहू द्या हं माझ्या कामाचं—

चातक : पण विठे, तू सिनेमात काम करायला तयार आहेस हे बोलू नकोस हां कुणाजवळ ! चार आठ दिवसांत मी करतो तुझी सोय—

विठी : बर कुनाजवळ बी नाय बोलायची बघा–द्येवा जाते

आता मी–जाता जाताच मी पाठ केलेल हावभाव करून दाखवते हं तुम्हाला—

( विठी पायांत चाळ बांधते व हावभाव करीत निघून जाते. कवी चातक आ वासून तिच्याकडे पाहत उभा राहतो व ती गेल्यानंतर टाळी वाजवितो.)

चातक : माय गॉड ! अनंतहस्ते कमलावराने देता किती घेशिल दो कराने ।। गुड लक्. ही विठी जर माझ्या तंत्राने वागली तर माझ्या गोष्टी सिनेमा कंपन्यांनी घ्यायला उशीर तो किती ? अरे हयात असलेल्या सिनेमा कंपन्या तर माझ्या गोष्टी घेतीलच–पण माझ्याजवळ गोष्ट तयार आहे आणि एक विठी आहे असं कळलं तर–कुणी कुणी नवीन सुद्धा फिल्म कंपन्या काढायला तयार होतील ! विठीला वाटतय की माझ्या वशिल्यानं विठीचा शिरकाव सिनेमा कंपनीत होणार; पण वेडे विठे, तुला जरी तसं वाटत असलं तरी तुझ्या वशिल्यानं हा कवि सिनेमात आपले नाव अजरामर करणार बरं ! नाहीतर माझी आजची अवस्था काय आहे ! या लेखनाच्या आणि सिनेमाच्या नादापायी वडिलांनी घरातून हाकून दिल्याला आज चार दिवस झाले ! हॉटेलात भजी मिसळ खाऊन व ओळखीच्या सिनेमा कंपन्यात पथारी लावून चार दिवस कसे तरी काढले ! पण पुढे काय ? पाच कंपन्यांकडे सिनेमा स्टोरीज पाठविल्या आहेत. प्रत्येक कंपनीने १००० रुपयांचे बक्षिस लावले आहे ! पाचापैकी तीन स्टोरीज जरी अॅप्रुव्ह झाल्या तरी तीन हजार रुपये मिळणार ! त्याच नोटा वडिलांच्या पुढे टाकून वडिलांना चीत करणार ! मग वडिलांच्या मांडीला मांडी लावून जर ‘ पासिंग शो ’ नाही पेटविली तर मी कवी कसला ? (सिगारेटचा झुरका मारून) आज

बारा वर्षं या सिनेमाच्या आणि लेखनाच्या नादानं हाडाचे बोरू केले, गुबगुबीत गुलाबी गाल पांढऱ्या कागदासारखे पांढरे फटफटीत आणि सपाट बनवले ! जागरणानं डोळ्यांच्या आजुबाजूच्या सरहद्दीवरचा प्रदेश काळ्या शाईसारखा रंगीत बनवला; त्याचे चीज व्हायची वेळ आता या विठीमुळे खास येणार ! वेड्याच्या इस्पितळातून सुटावं आणि लेखक व्हावं किंवा लेखक व्हावं आणि वेड्याच्या इस्पितळात जावं अशी स्थिती झाली होती ! सगळं लिहिणं आणि सगळं सगळं जमतं. पण लोकांना कळत नाही, का आम्हांला समजत नाही; या कोड्याचा उलगडा मात्र मरेपर्यंत होणार नाही असे वाटत होते ! पण आता–विठीच्या जोरावर–(बिभीषण येतो) हॅलो, कसं काय आहे ?

बिभीषण : ठीक आहे कविराज !

चातक : शिवी देऊ नका बुवा ! कवी हा शब्द शिवीसारखा होत चालला आहे हल्ली ! मला जर कुणी कवी म्हटलं–तर मळमळायला लागतं बुवा !

बिभीषण : आणि खरं तसं आहेही ! झालंय काय हल्ली सगळेच कवी झाले आहेत ! आणि बिचाऱ्यांचे जीव तर इतके हळवे असतात की त्यांच्या काव्यावर जर कुणी थोडी टीका केली–तर कुत्र्याला गोळी घातल्याप्रमाणे हे विव्हळायला लागतात.

चातक : तुम्हाला कल्पना यायची नाही ! कवीचा जीव अत्यंत हळवा आणि नाजुक असतो हो–म्हणून–

बिभीषण : म्हणूनच मी म्हणतो की २५० जोर आणि ५०० बैठका ज्याला झेपत नाहीत अशा कोणच्याही माणसाचे लेखन वाचायचं नाही, त्याला कुणीहि आधार द्यायचा नाही असा ठरावच उद्याच्या साहित्यपरिषदेत पास करून घ्यायला हवा !

चातक : हिंदुस्थानातील जनतेची जशी हल्ली दुर्दशा आहे तसं अगदी आमच्या कवींचे जीवन आहे हो ! तुम्हा माणसांना आमची कल्पना नाही यायची !

बिभीषण : बरं, निघालात कुठे ?

चातक : सहज भटकतो आहे.

विभीषण : अरे हो, बरी आठवण झाली. आमची जाहिरात तुम्ही पाहिली असेलच ! आमच्या कंपनीकडे पाठवा की एखादी गोष्ट.

चातक : तुम्ही कंपनी काढली आहे ?

बिभीषण : म्हणजे आमच्या जाहिराती नाही पाहिल्यात अजून? आम्ही सिनेमा कंपनी काढली आहे. ही पहा जाहिरात–बरं जातो आता मी–मला काम आहे जरा ! कंपनी काढिली आहे आता मालकीची-आता कुठली सवड व्हायला ? बरं—

चातक : बरं, चला चहा तर घेऊं.

विभीषण : नको हो झाला चारदा ! अहो आता कंपनी काढली आहे तेव्हा आतापासूनच चहा फार व्हायला लागला ! आतांच चार वेळ झाला—

चातक : म्हणजे आता होणारा पाचव्यांदाच ना ? मग त्यात काय आहे ? अजून ओव्हर बाउंडरी झाली नाही काही !

बिभीषण : बरे चला. पण गोष्ट अवश्य पाठवा हं ! मी आहे ना तिथं–मी करतो तुमची गोष्ट पास–तयार आहे ना एखादी ?

चातक : (मोजतो. एक, दोन–) एकवीस का बावीस-

बिभीषण : नाही तारीख चोवीस आजची–

चातक : तारीख नव्हे–गोष्टी किती तयार आहेत त्या मोजल्या-बरोबर बावीस गोष्टी तयार आहेत ! आणखी एक सांगू का ? माझी गोष्ट घेतल्यास मी कंपनीला एक सुंदर नटी मिळवून देईन—

विभीषण : अस्सं ?

चातक : हं !

विभीषण : कोण बुवा ?

चातक : ते आयत्या वेळेला कळेल.

बिभीषण : पण नाव तरी सांगा—

चातक : नुसत्या नावावरून काय कळणार ? तिचं नाव आहे साधंच ! सिनेमाला साजेसं नाव ठेवू मग आपण. पण–

बिभीषण : पण सध्याचं नाव ?

चातक : विठी—

बिभीषण : हात्त्याच्या ! ती आपली विठी माळीणच ना ? मग तिला आणायला तुम्ही कशाला पाहिजे ? अहो, तिला मी पाहिजे तेव्हा आणू शकेन ! बरं जातो–आतांच जातो तिच्या घरावरून.

( निघन जातो. )

चातक : काय करणार आता इथे ! आं–अरे कवीला कुणीही फसवावे आणि हुलकावण्या दाखवाव्यात हं ? पण याद राखा– नाही तुमची अखेर जिरवली तर–बरे हरकत नाही–तूर्त गोष्ट पाठवायला काय हरकत आहे ?

---

## प्रवेश चवथा

( वैकुंठरावांचे घर. पात्रे वैकुंठरावांची पत्नी सदाफुली, आरशात पाहात उभी आहे असा प्रवेश. )

सदाफुली : बाबांनी काय पाहून मला या ठिकाणी दिली हे त्यांचे तेच जाणोत. लहरी स्वभाव मेला. धड एका गोष्टीचीही

पुरती अक्कल नाही. आणि सगळ्या जगाच्या शहाणपणाचं सारं अत्तर यांच्या डोक्यात तयार असल्यासारखं बोलणं ! बोलताना काय पण घमघमाट सुटतो-पण अत्तर खरं नसल्यामुळे तो सुवास काही फार वेळ टिकत नाही. स्पिरिटवर तयार केल्यासारखी सस्ती अत्तरं ही-जरा वेळाने लगेच उग्रट घाण यायला लागते ! बरं, घरी काही कमी का आहे ? नुसतं स्वस्थ बसून खाल्लं तरी जन्मभर पुरेल. पण सत्रा धंदे करायची हौस यांना ! यांना काय म्हणे कीर्तिवंत व्हायचं आहे ! आताच काय यांची थोडी कीर्ती झाली आहे-म्हणा-बाजाच्या पेटीसारख्या यांच्या कीर्तीची अवस्था ! हे वाजवतील तेव्हाच वाजायची ! हे बडबडतील तेवढ्या वेळापुरती यांची कीर्ति-की नंतर लगेच शुकशुकाट ! यांना काय म्हणे पुढे यायचं आहे ! पण पुढे पुढे म्हणजे कुठपर्यंत जायचं आहे हे परमेश्वरालाच माहीत ! चांगले खेडेगावी शेतीच्या गावी होतो-तो पुढे यायचं म्हणून चिंचवडला आलो आणि नंतर सारख्या या गावाहून त्या गावाला अशा सारख्या यात्रा करतो आहोत तरी यांचं पुढं जाणं संपतच नाही अजून !

प्रियसखा लाभला या जगी सुदैवे आपणा ।। ध्रु० ।।
जन्म कंठण्याचा । त्यासवे सुखाचा । जरी असेल सत्य जाण ।
असेल त्यांत सौख्य समज ।। सौख्य पूर्ण तरीच जाण ! ।।१।।

आणि आम्ही जरा बोलायला लागलो की 'आर्यस्त्रिया' या शब्दाचं भूत आमच्यापुढे उभे करतात-की आमची दातखिळी ! आणि आर्य पुरुष काय सुरवातीपासूनच माकडं होती की काय-ते त्यांच्याबद्दल तक्रार कधीच करायची नाही ! (वैकुंठ येतो. सदाफुली न लाजता उभी राहते. वैकुंठ तिच्याकडे मारक्या म्हशी-

सारखा पाहात उभा राहतो) का झाली का घरी यायची वेळ ? समाजकार्य चालली असतील ना काही तरी ! पण गडे–तुमच्या-सारखे जे जे समाजकार्य करीत आहेत–त्यांच्या समाजांत त्यांच्या घरची माणसं येत नाहीत काहो ? अजून मी जेवायची खोळंबले आहे—

वैकुंठ : थोडा उशीर झाला, कबूल आहे ! पण तू का जेवा-यची थांबलीस ? हा धर्मभोळेपणाच आर्यसमाजाचं वाटोळं करणार ! हा कोण जुलूम बायकांवर ? नवरा म्हणजे अगदी देवासारखा मानायचा–त्याच्याकरितां आपण उपाशी राह्यचं–तशानं नाही तुमची समजूत व्हायची–नवऱ्याला देवाच्या ऐवजी दगड मानायला लागा आता, म्हणजे वर्तणूक बदलेल तुमची.

सदाफुली : इश्श, दगड नसला तर मानायचा ना ? जिथं मुळांतच असायचं—

वैकुंठ : वा: ! छान छान ! कोटी पसंत आपल्याला ! असला धाडसीपणा स्त्रियांत यायला पाहिजे. (स्वगत) बोललो पुन्हा बेफाटपणाने ! तरी बेफाट बोलण्याने मघाशी बत्तीशी पडायची वेळ आली होती ! बायकोलाच नटी बनवा म्हणे ! परमेश्वरा, नको; आमच्या बायका आहेत तशाच असू दे–अगदी काही काही सुधारणा नको !

सदाफुली : इश्श, काढलेली रांगोळी वाऱ्यानं उडून जावी अन् मग खालची जमीन जशी उदास भासते असा का चेहरा झाला आपला ?

वैकुंठ : कालपासनं माझी अक्कलदाढ एकसारखी दुखते आहे ! सारख्या कळा येताहेत.

सदाफुली : मग टोल्याने शेकू का जरा ?

वैकुंठ : (गालावर हात फिरवीत) नाही, राहील आता ! मध्येच पटकन् कळ येते केव्हा तरी !

सदाफुली : मग काय गावाकडे केव्हा चलायचं राह्यला ?

वैकुंठ : गावाकडे ? उं ! हो तुला सांगायच राहिलं-मी एक नवा धंदा सुरू केला आहे; कंपनी काढली आहे-पाचपन्नास लोक आज हाताखाली नोकरीस ठेवणार आहे ! भांडवल पाच हजार रुपये हाती आले असून त्यापैकी १००० रुपये कंपनीकरिता मोकळे ठेवले आहेत. एक हजार रुपये माझ्या सूट्सकरिता, १००० रुपये तुला नटविण्याकरिता आणि दोन हजार रुपयांचे घरात फर्निचर भरणार आहे !

सदाफुली : म्हणजे घराचंच थेटर बनवणार वाटतं ? हो, चार हजार गेले घर सजविण्यात-आणि राहिलेले हजार हँडबिलं छापायला आणि वाटायला लागतीलच !

वैकुंठ : अग, पन्नास लोक हाताखाली ठेवणार आता मी ! आता मला वैकुंठराव कोण म्हणणार ! आता मी साहेब होणार! तसं पाह्यला गेलं तर धंद्याला भांडवल लागतच नाही मुळी ! आपल्या अंगाचा शेकाटा गुढीपाडव्याप्रमाणे सजवायलाच काय ते भांडवल लागतं !

सदाफुली : बरं, मग मी माहेरी जाऊन राहते तर मग— म्हणजे धंदा अंगावर आला तरी माझ्या अंगावरच्या दागिन्याला हात नाही लागणार !

वैकुंठ : अग, स्त्रीधनाला कोण हात लावतो ? कायदाच आहे मुळी तसा.

सदाफुली : पण धंदा तरी कसला काढणार आहात ?

वैकुंठ : सिनेमाकंपनी—

सदाफुली : हं धंदा चांगला आहे पण आपल्याला काय कळणार त्यात ?

वैकुंठ : वा ! त्यात काय समजायचं आहे ? सिनेमा म्हणजे काय, वाकडी तिकडी तोंडं करणं, हातपाय हापटणं–बसायला येत असलं तर घोड्यावर बसून फेरफटका करणं–त्यांचे फोटो घेणं आणि हँडबिलं काढून फिल्म्स खपवणं त्यात काय आहे ? काहीच नाही !

सदाफुली : म्हणजे ? त्यात कलाकौशल्य या दृष्टीने काहीच नाही तर !

वैकुंठ : हं हं- तसं मात्र समजू नकोस ! त्यात मूळ खरं अवघड काम असतं सावकार गटविण्याचं–त्याला उल्लू बनवण्याचं गोत्यात आणण्याचं वगैरे ! ते एकदा साधलं–म्हणजे त्याचं किंवा आपलं दिवाळं निघेपर्यंत धोका कसलाच नसतो ! आणि फिल्मकंपनी चालविण्याच्या दृष्टीने म्हणशील–तर नाही म्हटलं तर त्यात पुष्कळच आहे आणि म्हटलं तर काहीच नाही ! मूळ त्यात काम असतं डायरेक्टराचं ! नट फक्त जागा भरून काढण्याकरिता ! आणि डायरेक्टराचं काम काय तर क्लोज अप–फेड आऊट–फेडइन्–मिडशॉट–लाँगशॉट हे शब्द आणि त्याचा अर्थ वापरणं येवढंच ! आणि त्याचं शास्त्र असं आहे की मिडशॉट कधी घ्यावयाचा नाही ! ‘ फेडआउट ’ करीत असताना ‘ फेडइन ’ कधी करायचं नाही–म्हणजे काय ? लांबून फोटो घ्यायचा असला म्हणजे जवळून कधी घ्यायचा नाही आणि जवळून घ्यायचा असला म्हणजे लांबून घ्यायचा नाही आणि मूळ मुद्दा म्हणजे अगोदर काहीच करायचं नाही !

सदाफुली : अस्सं, मग अगोदर काय करायचं ?

वैकुंठ : अगोदर चोरांचं संमेलन भरवायचं ! म्हणजे डायरे-क्टर लेखक यांचं ! ह्या दोघांनी मिळून निरनिराळ्या पाहिलेल्या चार इंग्रजी चित्रपटांची गल्लत करायची—त्याच्यावर एकादं मराठी धेडगुजरी कथानक बसवायचं—आणि मग नट भरतीला घालून लागायचं—फिल्म घ्यायची—लांडगेतोड करायला ! आणि सबंध फिल्म घेऊन झाली चार तज्ज्ञ बोलायचे आणि मग ठरवा-यचे की हा क्लोजअप, हा लाँग शॉट, हा फेड आउट, हा फेड इन्—काय समजलं ?

सदाफुली : सगळं समजलं ! अगोदर ठरवलं नाही तरी चुकून का होईना हे सर्व प्रकार होतात ना फिल्म घेताना ?

वैकुंठ : तर तर—बोलून चालून सिनेमा म्हणजे हालचाल ! तिथं स्थिर असं काहीच नाही ! सगळी चलबिचल ! म्हणजे आकार बदलतो—आकार बदलला की रूप बदलतं—आणि रूप बदललं की नाव निराळं आलंच ! आणि मग त्यांची नावं ठेवा-यची ती आपल्या ओळखीची ठेवायची—की जमलं त्याचं सोयर सुतक !

सदाफुली : गप्पा मारण्याकरिता जगातले सगळे कलाकौशल्याचे धंदे किती सोपे असतात, ज्यांच्या जवळ अकलेचे भांडवल बिल-कूल नाही असे लोक सुद्धा भांडवलाच्या अभावी आपल्या अंगात असणारे कलाकौशल्य सफाई ठार बुडते आहे अशी एकसारखी हाकाटी करीत असतात !

वैकुंठ : आणि शेवटी ते कलाकौशल्य अचानक कुठे बाहेर उपटतं माहीत आहे का ? संपूर्ण-स्वदेशी-स्वतंत्र-धंद्यात ! ते धंदे कोणचे तर कोळशाचं दंतमंजन, हगवणीचा काळ, मुळव्याधीवर

वस्ताद व डोळ्यात नेत्रांजन! याच्या पुढे औद्योगिक प्रगती नाही अजून !

सदाफुली : अगदीच काही त्याची ही नको करायला ! पुनर्जन्म झालेल्या भारताच्या या बाललीला आहेत.

वैकुंठ : बरं पण ते जाऊ दे. ( बिभीषण आणि सदानंद प्रवेश करतात ) ओहो, या–या, आईये जनाब–आईये जनाब–( दोघेही बसतात )

सदानंद : काय वहिनी कसं काय ठीक आहे ?

विभीषण : आता वहिनी, अगदी खुशीत असतील! कारण नवऱ्यानं स्वतंत्र धंदा सुरू केला आता–आता काही वहिनींना तक्रार करायला जागा नाही !

सदाफुली : आणि आता घरात तरी राह्यला जागा मिळेल का नाही याचा संशयच आहे !

सदानंद : का हो ?

सदाफुली : म्हणजे असे—

वैकुंठ : ए बुवा, माफ करा हं ! झालं येवढं संभाषण तूर्त पुरे ! कारण माझ्या बायकोला विनय कसा तो अजिबात माहीत नाही ! केव्हा पटकन बोलेल–काही नेम नाही सांगता येणार ! तेव्हा आपल्याला काही अब्रू असेल आणि ती सांभाळायचा आपला विचार असेल तर संभाषण-समारंभ आखडता घ्या ! नाही तर असं करा–चला बाहेरच जाऊ आपण आता—

बिभीषण : म्हणजे ? चहा चुकवायचा हा आडमार्ग का राजमार्ग ?

सदानंद : आणि चहा घेण्याकरिता कितीही बेअब्रू झाली तरी पत्करू. पण चहा घेतल्याशिवाय आपण नाही हलणार येथून !

वैकुंठ : ( सदाफुलीस ) बरं चहा कर पाहू एक तीन कप—

बिभीषण : वहिनी, अहो वहिनी—

सदानंद : थांव मी सांगतो—वहिनी, वहिनी, आता तुम्ही फार प्रसिद्ध होणार, आता मासिकातून तुमचे फोटो काय येतील.

सदाफुली : ते काय म्हणून ?

विभीषण : अजून अवकाश आहे पण वैकुंठराव धंद्यात एकदम क्रांती करून दाखविणार आहेत ! स्वतःच्या फिल्म कंपनीत ते तुम्हाला काम करायला लावणार आहेत–मग नाही का मासिकातून तुमचे फोटो यायचे. बाकी वहिनीसद्धा असं मारू काम करतील म्हणा.

सदाफुली : कुठे–कुठे काम करायचं म्हणालात ?

सदानंद : सिनेमात—

सदाफुली : तोंडाला रंग लावून ?

सदानंद : होऽ !

सदाफुली : आणि मी ? आग लागली मेल्यांनो तुमच्या तोंडाला ! चला, चालते व्हा माझ्या घरातून ! चहा नाही आणि काही नाही ! एकेकाच्या पाठीत केरसुण्या बसतील आता—

वैकुंठ : अगदीच काय ताळ सोडून बोलते आहेस ! अग आपल्या इथे आलेले पाहुणे ना ते ?

सदाफुली : मग मला त्यांच्याशी काय करायचं आहे ? आणि ते काय म्हणताहेत ?

वैकुंठ : येवढं का समजत नाही तुला ? अग ती नुसती थट्टा !

सदाफुली : हं ते करतील नुसती थट्टा ! आणि तुम्ही लावा मला नट्टापट्टा करून नाचायला ! काही आहे का आपल्याला ?

सदानंद : काय ?

वैकुंठ : अन् तुला तरी आहे का ?

सदाफुली : मला असली नसली तरी तुम्हाला काय करायचं आहे त्याच्याशी ? हं चला चालते व्हा पाहुणे तुम्ही—

वैकुंठ : शुः शुः. पुरे पुरे ! झाले येवढे शहाणपणाचे पाढेपर-वाचे पुरे झाले ! मुकाट्याने तीन कप चहा करून आण नाही तर—

सदाफुली : नाही तर काय घराबाहेर व्हावं लागेल येव-ढंच ना ?

वैकुंठ : हो हो, नाही तर घराबाहेर व्हावं लागेल !

सदाफुली : ही पहा निघाले मी घराबाहेर ! आपण बसून राहा घरात चहा पीत, आणि तुमच्या सिनेमा कंपनीचं दिवाळं निघालं की काढा याच घरात हॉटेल नाहीतर खाणावळी ! तुमच्या या निघ-णाऱ्या कंपनीचं ' वाटोळं झालं ' असं या कानांनी ऐकल्याशिवाय माझं अडलं आहे खेटर पुन्हा परत या घरी यायला (निघून जाते.)

बिभीषण : काय रे वैकुंठा ?

वैकुंठ : असा तिखट स्वभाव आहे बघा हिचा ! आता गेली ना निघून. आता परत आल्याशिवाय काही यायची नाही ती या घरात ! बरं चला. झालं तेही एका अर्थाने बरंच झालं ! धंद्या-कडे आता आख्खे चोवीस तास लक्ष द्यायला सापडेल !

सदानंद : बाकी–तुझी बायको निघून जाण्याची ही ' स्टंट ' एकाद्या पिक्चरला चांगली आहे नाही ?

बिभीषण : स्क्रीनला नाही चांगली. स्टेजला फार चांगली आहे !

वैकुंठ : समजा. तूर्त तर हातांनी चहा करून घ्यायची पाळी आली ना ? पण काय रे ॲक्टर्सची पत्रं–लेखकांच्या गोष्टी आल्या आहेत का काही ?

बिभीषण : गोष्टी एकंदर आठशें ते हजाराच्या सुमारास आल्या आहेत ! नटांची पत्रे आली आहेत चोवीस पंचवीस व दोन तीन नट आपणाला नोकरीला ठेवल्यास कंपनीला एका सुंदर नटीचा लाभ होईल असं म्हणताहेत !

सदानंद : आणि वरं का वैकुंठा–त्या तिन्ही नटांच्या पत्रांचा अन्वयार्थ लावून पाहता ती तीन पत्रात सामावलेली नटी एकच असून एक धमकीचे पत्र आलं आहे.

वैकुंठ : कोण ? कुणाला धमकी देणार ?

सदानंद : त्या नटीचाच संबंध आहे वाटतं त्यात काही ! बाकी–आयुष्याला आता खरा मजा आला ! काय सांगू एकाद्या कवीसारखं व्हायला लागलं आहे मला ! घटकेत वाटतं पाऊस पडतो आहे–घटकेत वाटतं विजा चमकत आहेत–तर घटकेत वाटतं सर्वत्र उन्हाळा माजला आहे—

वैकुंठ : आपण खबरदारी येवढीच घ्यायची, की या धंद्यामुळे आपल्या संसाराचा नाही उन्हाळा होता कामा !

सदानंद : ते तर शक्यच नाही ! अरे, इथे कुणाच्या पदरचं काय जाणार आहे ! मेला तर परस्पर सावकार मरेल ! आणि समज आपल्याही अंगावर शेकलंच काही, तर नादारीचा अर्ज देऊन मोकळं होऊ. मित्रा वैकुंठा, जोपर्यंत सरकारनं दिवाळखोरीला सक्तमजुरीची शिक्षा ठरविली नाही, तोपर्यंत धाडसी कर्तृत्ववानांची चैन आहे ! हे बघ पण तसं नको, गद्यात सांगितलं तर त्याला चव नाही यायची, म्हणून जमलं तर पद्यात सांगतो.

(काहीतरीच गाऊ लागतो.)

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(सदानंद गात गात प्रवेश करतो.)

सदानंद : धंद्याला सुरवात केल्यापासून आम्हा तिघांचाही रुबाब बदललाच म्हणायचा ! एकदम वहाणा धोतर टोपीला सोडचिठ्ठी देऊन सूटपँट, हॅट शिवाय बाहेर पडत नाही हल्ली ! हाताखालच्या लोकांना काबूत ठेवण्याकरिता ब्लडीफूल–सुवर–डाँकी या शब्दांचे चाबूक पाठ करून ठेवले आहेत ! साध्या व्यवहारातही चेक शिवाय बोलत नाही आम्ही ! परवा कोपऱ्यावरच्या पानपट्टी-वाल्याकडून एक पानपट्टी आणि एक सिगरेट विकत आणली पण पैसा रोख नाही मोजला–तिथल्या तिथं अर्धाआण्याचा चेक फाडून दिला त्याला ! पण तो सुद्धा पोस्ट डेटेड अस्सा रुबाब आहे ! ' साहेब ' या संबोधनाशिवाय हाक नाही मारीत आम्हाला कुणी ! इंग्रजी वर्तमानपत्राशिवाय वर्तमानपत्र हातात धरीत नाही हल्ली ! आणि तोंडात महामंत्र एक–इंग्रज लोक इथून तिथून चांगले–काय त्यांच्या रीतिभाती, काय त्यांच्या अकला, काय त्यांचा कल्पना-विलास–आणि आपल्याकडच्या लोकांविषयी बोलताना यू इंडियन्स काय तुमची पुराणं–काय तुमच्या रीतिभाती, काय तुमचा समाज ! हा वेद पाठ ! ऑल राईट. सिनेमा कंपनीसारखा स्वतंत्र धंदा काढल्यामुळे आम्ही तर सर्व लोकांच्या पुढे आलो-पण आमचे स्नेही मि. वैकुंठराव यांच्या पत्नि मिसेस–सदाफुली यांनी त्यांच्या हातावर तुरी दिल्यामुळे ते जरा विरहानलाने व्याकुळ झाले

आहेत ! तेव्हा वहिनींच्या माहेरी जाऊन त्यांना परत घरी आणण्याकरिता या दूताची रवानगी झाली आहे–चला आल्यासारखं ते काम फत्ते करून–मिसेस सदाफुलीसकट–प्रयाण करावे–चला। ( जातो )

---

## प्रवेश दुसरा

(सदाफुलीचे माहेर. बागेचा सीन. सदाफुली एकटीच विचार करीत फिरते आहे असा प्रवेश)

सदाफुली : या मेल्या सगळ्या पुरुषांनी आपल्या लाजा, भिडा, मर्यादा सगळ्या भाजून तरी कुठे खाल्ल्या ? काय ग बाई थेरथेर करतात हे पुरुष ! आणि आमच्या घरच्यांची तर सगळ्यांच्या वर कडी ! मला सिनेमात काम करायला सांगणार होते म्हणे ! अन् मेले पुरुष तरी असे लाघवी बनले आहेत; हल्ली–ओळख व्हायचा अवकाश की यांची नाती तयार. घटकेत वहिनी म्हणतील, घटकेत ताई म्हणतील, कुणीकडून तरी लोकांच्या बायकांजवळ लघळपणाने चार शब्द बोलायला मिळावेत येवढा उद्देश ! आणि काय मायाळूपणा दाखवतात पण ! बायका आपल्या भाबड्या–त्यांना अजून यांचे पेच कुठे कळताहेत ? परवा आमच्याकडे त्यांचे एक स्नेही आले होते–कुठे एकदोनदा पूर्वी घरी येऊन गेले असतील–तर परवा बाई त्यांच्या–अगदी खुद्द त्यांच्या देखत मला म्हणतो कसा " वहिनी, तुम्हांला किनई हा किरमिजी रंगाचा पोलका नाही शोभत चांगलासा " ते ऐकून आमचे नंदी म्हणतात " हो माझंही तसंच मत आहे–कायरे कोणच्या रंगाचा पोलका हिला शोभून दिसेल ?" त्यांनी सांगितला गुलाबी ! आणि आमच्या या

आचरट स्वारीनी लगेच दुसऱ्या दिवशी गुलाबी कापड आणून दिलं मला आणि मला सांगितलं "तो आला असताना किरमिजी पोलका घालीत जाऊ नकोस, त्याला तो रंग आवडत नाही!" आता यांच्या या करणीला काय म्हणावं? आणि वर म्हणतात कसे? "तुम्ही बायका म्हणजे क्षुद्र विचाराच्या, तुमच्या मनात नाही तिथे पाप दिसतं–तो मनुष्य फार सच्छील आहे" मी त्या दिवसापासून बोलणंच सोडन दिलं! आणि त्यांचे असे हे एकेक थेर जेव्हा रोज रोज वाढू लागले तेव्हा मी आपली माहेरी निघून आले! (पाहून) अगबाई, हा कोण? तोच मेला साळसूद! आमच्या घरनंच काही निरोप आणलेला दिसतो आहे.

(सदानंद प्रवेश करतो)

सदानंद : वहिनी, बरं झालं–घरात कोणीही नसताना आपली गाठ पडली ती! अहो मांडला आहेत काय हा अविचार तुम्ही? वैकुंठरावांचा निरोप आहे आपल्याला निघून येण्याबद्दल! तुम्ही घरी नसल्यामुळे बिचारा स्वतःचा स्वतःशीच दुःखी होऊन–मुळुमुळू रडतो सुद्धा एकाद्या वेळी! असं चांगलं नाही. बघा बुवा–त्यांतून तुम्हाला–आणि तुमच्या कुळाला शोभून दिसेल असं करा! आम्ही काय आपले नुसते निरोपाचे धनी! येत असलात तर घेऊन जातो–नसल्या येणार तर हा चाललो.

सदाफुली : ठीक आहे जा आपण निघून. माझं मी पाहीन काय ते.

सदानंद : हा वहिनी, पुरे करा तुमची बडबड. सोईनं शिस्तीनं सांगून पाहिलं तरी तुमच्या डोक्यात उजेड पडत नाही–मग शेवटचा आणीबाणीचा वैकुंठरावाचा निरोप सांगतो आपल्याला.

आपण जर परत आला नाहीत तर वैकुंठराव पुन्हा आपले तोंड पाह्यला तयार नाहीत ! टाकून देतील ते तुम्हांला.

सदाफुली : राहूं दे ! कशाला उगाच तोंडाची वाफ दवडता ? बायकांना टाकून देणारे पुरुष मागच्या पिढीतले ! ती धडाडी हल्लीच्या पुरुषात नाही. आताचे पुरुष बायको आपल्याला टाकील की काय याच काळजीत असतात ! जा जा बरं तुम्ही आणि सांगा माझा निरोप त्यांना की आपल्या कंपनीची वासलात लागल्याशिवाय मी तर तिकडे येणार नाहीच पण आपणही आपलं तोंड दाखवायला येऊ नका इकडे ! बरं जा आता. त्रास देऊ नका मला विनाकारण.

सदानंद : बरं आहे, जातो तर मग ! मग काय हाच निरोप सांगायचा ना त्यांना ? ठीक आहे ! बरं पण विचार करा हो नाही तर आपण आपल्या संसाराची विनाकारण वाताहात करून घ्याल ! हो, काय नेम सांगावा ? या वैतागात मि. वैकुंठराव दुसरंही लग्न करण्याच्या भानगडीत पडतील !

सदाफुली : करा करा म्हणावं दुसरं लग्न ! पण लक्षात ठेवा त्यांना हे फार जड जाईल !

सदानंद : ठीक आहे ! जातो तर मग. (जातो.)

सदाफुली : काय करावं बाई अशा माणसाशी गाठ पडल्यानंतर ? बाकी माझी खात्री आहे की, आमच्या इकडे असं धाडस व्हायचं नाही ! आणि मी जिवंत असताना कोण मुलगी देणार त्यांना ? आता एकादी सुशिक्षित ३० वर्षाची कुमारी जर प्रेमाने त्यांच्या गळ्यात पडली तरच काय ते शक्य आहे ! पण तेही जमणं शक्य दिसत नाही. कारण सुशिक्षित स्त्रियांना प्रेम करायला लावणारं त्यांच्याजवळ काय आहे ? ते का एकादे बॅरिस्टर

आहेत, आय्. सी. एस्. आहेत–का डॉक्टर आहेत–का ते ध्येयाचे पतंग उडवून प्रेमाचे रडगाणे गात आहेत ! काही नाही ! ते तसे फार साधे आहेत. त्यांना आपलं फक्त नवराबायकोचे प्रेम माहीत ! लग्नाच्या बायकोला घरी विव्हळत ठेवून प्रेमाचा गुंजारव करायला लागणारा धाडशी बेछूटपणा त्यांच्याजवळ कुठे आहे ? बाई बाई–चांगले सुखासमाधानाने आम्ही संसार करीत होतो तो कुठला यांना पुढं यायचा नाद लागला कुणाला ठाऊक ? असो.

पद.

कळे ना काय हा चाले जगी हा एवढा चाळा ॥ ध्रु० ॥
कुठेही पाहतां सारे दिसे की पूर्ण चांचल्य ।
जगी या सर्व चांचल्य !
विचारा ताळ ना कसला । जगी या सर्व चांचल्य ।
दिसे की पूर्ण चांचल्य ॥१॥
नशिबी असेल ते भोगलं पाहिजे आता–(जाते.)

---

## प्रवेश तिसरा

( स्थळ–रस्ता. एकीकडून विठी व एकीकडून कवी चातक प्रवेश करतात )

विठी : द्येवा–माझं काम झाल बघा ! ते नव्या कंपणीचे मॅनिजर आले व्हते माझ्याकडे–त्यांनी आज बोलावलं हाय मला शेनिमाकंपनीत–द्येवा लई उपकार झाले गरिवावर !

चातक : पण विठे, आता मला मात्र विसरू नकोस हं ! कारण आजकाल नटीना जी किंमत आहे ती कवींना नाही ! सर्व कला या सध्या वायकांच्या मर्जीवर अवलंबून आहेत ! आपण आता कंपनीच्या राणीसरकार होणार ! स्वर्ग–नरक आहेत का नाहीत

परमेश्वराला माहीत–पण तू काही तरी पुण्यावान् आहेस. आता बघ ४।६ महिन्यात या विठी माळणीची सिनेमा चंद्रिका होणार! कंपनीचे जसे जसे चित्रपट निघू लागतील तसतशी तू सीता–सावित्री–द्रौपदी–तारामती होऊन सर्वमान्य होणार ! विठाबाई माउली ग। माय माझे विठाबाई माउली ।।! पण विठे, हा कवी चातक तुला सांगतो आहे ती एक गोष्ट लक्षात ठेव ! कुठे भाळू नकोस ! पदव्या पदकाना लालचावू नकोस–म्हणजे साध्वीचं सोंग घेता घेता–तूही—

विठी : खरंच वघा द्येवा–द्येवाच्या नावात माझं मन अक्षी लई रंगतं ! पंढरीची वारी चालली की वाटतं आपण बी पताका घेऊन त्यात सामील व्हावं ! अन् लागाव द्येवाच्या नावानी नाचायला !

चातक : विठे, हाच साधेभोळेपणा टिकव ! नावाला भाळू नकोस; वर्तमानपत्रकाराला मुलाखती देऊ नकोस–

विठी : द्येवा मुलाखत म्हणजे हो काय ?

चातक : तोंडपुजेपणा ! तुझ्याकडे यायचं आणि तुला विचारायचं,—‘ विठे सिनेमासंबंधाने तुझं मत काय आहे ?’

विठी : अन् मला काय कळणार त्यात ?

चातक : हं असंच आहे ! मुलाखतीत ज्याच्याबद्दल आपल्याला काडीचीही माहिती नाही त्याचीच सगळी माहिती सांगावयाची असते ! अन् मग साधे प्रश्न विचारायचे ‘आपल्याला भाजी काय आवडते–पातळं कसली आवडतात- दागदागिन्यांची आपल्याला आवड आहे का नाही ! आणि याची उत्तरं आपण फार साळसूदपणानं द्यायची ! की लोकांना वाटावं कुठली तपस्विनी अवतरली आहे या भूलोकावर ! बरं ते सगळं जाऊ दे–मी परस्पर प्रयत्न करून पाहतोच–पण न जमलं तर माझी गोष्ट ध्यायला

लाव हं तेवढी कंपनीत ! आणि समज तुझंही त्यांनी नाही ऐकलं तर साफ सांग–' मी काम करणार नाही ' ताडकन् मालकाचे डोळे पांढरे होतील आणि मग विठे, माझी गोष्ट पटकन् खपेल !

विठी : तुम्ही येवढं सांगता तर तुमच्या पायी काय वाटेल ते करीन बघा ! बर द्येवा, जाऊ आता मी ? लई वेळ झाला बघा येते हं ! ( जाते. )

चातक : अहाहा–पहिल्यांदा कलेच्या नादानं जे जीव प्रामाणिकपणानं कलेत शिरतात ते इतके निरुपद्रवी आणि सोज्वळ असतात बरं ! पण मग परिस्थितीने कंगाल–बुद्धीने भडक–व कमालीचे स्वार्थी लोक–यांच्यांतून विष निर्माण करतात ! आणि तेच विष–कला ध्येय क्रांति–नवी नवलाई–या शब्दांचे ढोल वाजवून समाजाच्या गळी उतरवतात ! आणि त्याला म्हणायचं स्वतंत्र विचार ! नवीन शोध–अजब तमाशा ! ! ! कुठेही पहा टग्गेगिरी आणि वशिलेबाजी ! मी तर प्रांजलपणानं केव्हाही कबूल करायला तयार आहे की मला कशातच काही समजत नाही म्हणून ! पण मग मी या उलाढालीत का पडलो असं कुणी विचारील तर त्याचं खरं उत्तर असं आहे की माझ्यापेक्षाही इरसाल मूर्खं आज कलावंत म्हणून गणले जात आहेत ! मोटारीतून नाचताहेत ! आणि मी असा का ? माझ्या अंगांत फक्त मूर्खपणाच्या जोडीला इरसाल पाजीपणा नाही म्हणून ! ऑल राईट. मला कुठेही जरी चान्स मिळाला नाही–तरी आय् ॲम् एंजॉईंग माय लाईफ ! माझं आयुष्य मजेचं चाललं आहे ! कारण काय? माझ्या अंगात सोदेगिरी नाही ! ( जातो. )

---

## प्रवेश चवथा

( स्थळ—अभिनव फिल्म कंपनीचे ऑफिस. खोटचा लढाईचा देखावा. एकदोन मिनिटे लढाई चालल्यानंतर.)

नट १ ला : वंदेमातरम् ! वस्स्. म्हटलं कंपनी सोडून आज सहा महिने झाले ते तरवारीचे हात तरी ध्यानात आहेत का नाहीत पहावं. हो, आपला पोटपाण्याचा धंदा तो ! विसरला म्हणजे पंचाईत यायची !

नट २ रा : अरे, पण मालकांचा पत्ता नाही अजून ? पगाराचे आंकडे विचारून गेल्याला अर्धातास झाला. का आपल्याला इथें बसवून झाले फरारी ? हो, नाहींतर जागेवाला भाडं आपल्याजवळच मागायचा !

नट ३ रा : अरे, ते काही विचारू नकोस–नवीन कंपनी निघते आहे, चला म्हणून एजंट भरती करतो–तोच बातमी येते कंपनी भांडवलाच्या अभावी बुडते आहे म्हणून–आपणही धास्तीने दुसऱ्या कंपनीत पळ काढावा–तो तिथंही तेच ! असा मी बारा कंपन्यांत फिरलो गेल्या सहा महिन्यात; पण अजून एक कंपनी निघाली नाही. नुसत्या जाहिराती आणि पाटचा! कुठे तालमीला सुरवात तर कुठें पडद्याला सुरवात की अडचणीचा प्लेग दत्त म्हणून हजर ! बरं सगळ्या कंपन्या हल्ली शिवाजीच्या मागं लागल्या आहेत. अन् मी शिवाजीच्या नकला पाठ करून तर कंटाळलो ! शेवटच्या कंपनीत शिवाजीचा मेकअप् करून आता फोटोग्राफीला सुरवात होणार तोच कंपनी मोडली ! ज्या धडाडीत खरा शिवाजी आग्र्याहून पळाला त्याच धडाडीत ह्या नाटकी शिवाजीनेहि बुडत्या कंपनीच्या जिरेटोपासकट पळ

काढला ! पण मग लक्षात आले की जिरेटोप बुडत्या कंपनीचा मी मिळवला पण माझी कोटटोपी कंपनीतच राहिली—तेव्हा ह्याच मेकअपने हिंडतो आहे हल्ली गावातून !

नट ४ था : माझी गोष्टही तुझ्यासारखीच ! मी एका कंपनीत नोकरीला राहिलो. पहिला चित्रपट बाहेर यायच्या अगोदर कंपनीचे आलटून पालटून बारा मालक झाले. त्यामुळे मालकाचा चेहरा लक्षात ठेवता ठेवता पंचाईत झाली ! आज ज्याला मालक समजावा, तोच उद्या त्याच कंपनीत कारकून !

नट ५ वा : पण अखेर चित्रपट बाहेर पडला की नाही ?

नट ४ था : चित्रपट तयार झाला होता, पण तो आयत्या वेळी सावकाराने जप्त करून नेला ! आणि चित्रपट बाहेर पडायच्या दिवशी मालकासकट आम्ही सगळेच बाहेर पडलो ! ( सदानंद, वैकुंठ, बिभीषण प्रवेश करतात. ) सर्व नट उठून उभे राहतात. वैकुंठराव सगळ्यांना बसण्याची खूण करतो.

बिभीषण : काय वैकुंठराव, काय ठरवलंत या सगळ्या लोकांचं ?

वैकुंठ : त्यांना त्याचे पगाराचे आकडे विचारून घेतले आहेत. पगाराच्या आकड्याची सुरवात १। रुपयापासून असून शेवटचा आकडा तेवीस रुपयांचा आहे !

नट १ ला : नाही हं साहेब, मला पंचवीस रुपये पगार द्यावा लागेल. त्याखाली मला परवडणार नाही ! एका सुप्रसिद्ध नाटक कंपनीत—म्हणजे हो (खाकरत) गंधर्व नाटक मंडळीत मी १।। वर्ष काम केलं असून तीन फिल्म कंपन्यात काम केली आहेत. म्हणून—पंचवीस, पंचवीस रुपये पगार पाहिजे मला.

सदानंद : आपल्या या म्हणण्याचा अवश्य विचार करूं ! पण

झालं आहे काय, माहीत आहे का ? कॉलेजातली पोरं सिनेमाच्या धंद्याचं शिक्षण घेण्याच्या उच्च हेतूने इथे येतात–फुकट काम करू म्हणतात–पण त्यांच्या होतात नंतर तीन तऱ्हा-एक त्यांचं मूळ कॉलेजातलं शिक्षण सुटतं–मग घरनं हकालपट्टी होते–मिळून बेरीज पूज्य ! काही सिनेमाची कला हस्तगत करण्याऐवजी– कंपनीतील नटीच हस्तगत करून पसार होतात ! मिळून बेरीज पूज्य ! आणि तिसरा वर्ग सिनेमा कंपनीची पायरी चढतांनाच आपण स्वतंत्र कंपनीचे मालक कसे बनू या उच्च विचाराच्या वेडांत-सिनेमाचं आणि सगळेच ज्ञान रहाते बाजूला आणि मग शेवटीं कुठेतरी एखाद्या नाटक कंपनीत थोबाडाला रंग फाशीत बसतात ! एवंच काय, कॉलेजातली पोरं आम्हाला नको आहेत ! तुम्ही काय गंधर्व मंडळीत काम केलं आहे म्हणता ? कोणाचं बुवा ?

नट १ ला : ( खाकरत व शर्टचे कॉलरबटन खोलीत ) मृच्छकटिक या सुविख्यात नाटकातील चारुदत्ताला फाशीकडे नेणाऱ्या मांगाचं !

बिभीषण : आणि फिल्म कंपनीत कोणच्या कोणच्या ?

नट १ ला : फिल्म कंपनीत मी डार्करूमकडे नोकरीला होतो.

बिभीषण : मग यांना पंचवीस रुपये पगार जरूर द्यायला पाहिजे ! पण कायरे वैकुंठ कांही अपवाद सोडले तर आपल्या देशी फिल्मस् काही नाव घेण्यासारख्या निघत नाहीत याचं कायरे कारण असावं ?

सदानंद : याचं कारण देशी फिल्मस् आपल्या लोकांना समजतच नाहीत अजून ! अरे, आम्ही अजून खऱ्या फिल्म्स् घ्यायला लागलो आहोत कुठे ? इंग्रजीत ज्याला पॅरेडी सटायर म्हणतात–

किंवा मराठीत ज्याला विडंबन म्हणतात–तो प्रकार आहे देशी फिल्म्स् म्हणजे! आमच्या कंपन्या फक्त विलायती फिल्म्सवर सटायर करण्याकरिता फिल्म्स् काढीत आहेत! अरे असं नसतं तर विलायतेत माणसं पिकतात आणि हिंदुस्थानात काय लांबकाने पिकतात वाटतं! काय?

विभीषण : खरं आहे गुरुजी!

वैकुंठ : बर मग यू ऑल, तुम्ही म्हणालात ते ते पगार मान्य आहेत आमच्या कंपनीला. आता याच बैठकीत–नायक व्हिलन–खलपुरुष यांच्या भूमिका कुणी करायच्या तेवढं ठरवून टाकू.

१ नट : हो आणखी एक सांगायचं राहिलं 'मी नायकाशिवाय दुसरं कोणतही काम करणार नाही!

२ रा : मीसुद्धा हीरोशिवाय दुसरं कोणाचंही काम करणार नाही!

३ रा : मलासुद्धा हिरॉइनच्या नवऱ्याचंच काम मिळालं पाहिजे!

४ था : माझंही तसेच! काय?

५ वा : मी काय या सर्वांपेक्षा लायकीने कमी आहे म्हणून दुसरं काही म्हणेन? होय म्हणा–नाही तर हा पहा चाललो!

वैकुंठ : मोठं कोडं टाकलंत बुवा तुम्ही सगळ्यांनी आमच्यापुढे! हे पहा, तुम्ही आळीपाळीने 'हीरो' व्हा! मग तर हरकत नाही?

सगळे : आम्हाला आळीपाळीने हीरोची कामं नको आहेत! वारसदारी पाहिजे! वंशपरंपरा पाहिजे! अखंडित पाहिजे!

बिभीषण : (वैकुंठास एकीकडे) आता या सगळ्या नंदीबैलांना शुद्धीवर आणण्याकरिता वेसण अडकवतो हं यांच्या

नाकात. हे पहा, कंपनीनं याला एक तोड काढिली आहे–एरवी जमणं काही शक्य दिसत नाही ! तुमच्या या हमरीतुमरीच्या भाषेवरून–लायकी नालायकीचा प्रश्नच उरत नाही तुमच्यात ! तेव्हा आमच्या कंपनीत ज्याला हीरोचं काम करायचं असेल त्याला अजिबात पगार मिळणार नाही !

सगळे : आम्हाला अजिबात पगार नको !

बिभीषण : येवढंच नव्हे तर हीरोचं काम करणाऱ्या माणसानं कंपनीला दरमहा २५ रुपये दिले पाहिजेत !

१ ला : आपण देतो.

२ रा . आपण त्याच्या दुप्पट पन्नास देतो.

३ रा : आपले पाऊणशे.

४ था : माझे ऐंशी.

५ वा : आपली ओव्हर बाउंडरी एकशे एक रुपिया !

पाचवा सोडून चौघे : हं बाबा, कमाल केलीस–अशा टोणग्यां-पुढे कलेनं काय जीव द्यायचा? हो बाबा तूच एकटा नायक !

बिभीषण : आता कंपनीचा शिरस्ता बदलला ! आता या कंपनीत हीरोनं १०१, व्हिलनने ८५, कॉमिक नटाने ६०, सेकंड हीरो ५०, सेकंड व्हिलन ४०, या अनुक्रमाने पैसे कंपनीला दिले पाहिजेत आणि आमच्या कंपनीत पगार फक्त गड्यांनाच मिळेल ! मग कसं काय ?

बहुतेक सगळे : जे काय आपण ठरवाल ते ! पगार नाही तर नाही, पण दुपारी विसाव्याला ठिकाण आणि दिसायला धंदा तर हवाना ? करता काय, नाही तर पोलिस उडाणटप्पूचा खटला भरायचा पटकन् !

नट १ ला : बरं, ते सगळं झालं. पण पहिला चित्रट कोणचा आपला ? ‘ धुडगूस ’ म्हणता नाही का ?

वैकुंठ : काहो, अहो का ? नसती चौवकशी कशाला करता ? गावात दहा फिल्म कंपन्या आहेत, इकडची बातमी तिकडे कळू नये म्हणून ही शक्कल आहे ! कंपनीचा खरा चित्रपट अगदीच निराळा असून त्याचं खरं नाव चित्रपट सिनेमात लागल्यानंतर दीड महिन्यानी आम्ही प्रसिद्ध करणार आहोत ! नांवावरून ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक हे कळू नये म्हणून पुरुष पात्रांची नावे अआ कका खखा अशी ठेविली असून स्त्रीपात्रांना एबीसीचा आश्रय दिला आहे ! आणि संदर्भाने सुद्धा कथानक फुटू नये म्हणून एकाही नटाला त्याचे काम समजावून देण्यात येणार नाही ! आम्ही हावभाव करून दाखवू तसे तुम्ही कॅमेऱ्या-समोर केले पाहिजेत ! नट म्हणजे नुसते ब्लॉटिंग पेपर ! आम्ही चेहेऱ्यावर जशी अभिनयाची शाई दाखवू तशी तुमच्या चेहेऱ्या-वर टिपून निघाली पाहिजे ! काय समजलेत ? यू कमॉन— (एक नट पुढे येतो) हं म्हण चांडाळणी—

नट ३ रा : चाडाळणी !

वैकुंठ : राइट् यू आर. अगदी हिंदुस्थानचा जॅकी कूगन आहेस बुवा तू !

२ रा : आणखी एक सांगायचं राहिलं ( ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत उड्या मारीत जातो. )

सदानंद : काय हो, ही कसली शर्यत ?

२ रा : साहेब, तुम्हीच सांगा हे काय आहे ? तर म्हणेन खरे तज्ज्ञ !

सदानंद : हात्तिच्या, त्यात काय सांगायचं आहे–हा इंडियन डग्लस फेअर बॅक्स आहे !

२ रा : चालवणार बुवा तुम्ही कंपनी !

४ था : ( खिशातील मोठा चष्मा डोळ्याला लावून) हॅरोल्ड लॉईड !

५ वा : आपली सर्वांच्यावर कडी–नो कॉंपीटिशन–काय ?

वैकुंठ : काय हो आपण इंडियन कोण आहात ?

५ वा . (कुत्र्यासारखा ४ पायावर चालून) रिन् टिन् टिन्! रिन् टिन् टिन् ! !

वैकुंठ : अरे वा, एकूण सगळ्या प्रख्यात इंग्लिश नटांचे सांगाडे आपल्या कंपनीला पहिल्या प्रथमच लाभले की ! गुड लक् ! मग आजच्या सुमुहूर्तावर काही अभिनयही आपण बसवून टाकू !

१ ला : पण–पण काय हो–बरं पण काही नाही ! चालू द्या आपल्याच मनाप्रमाणे.

वैकुंठ : आणि बरं का बिभीषणपंत मी काही नवीन युक्त्या शोधून काढल्या आहेत ॲक्टिंगच्याबाबत ! त्या युक्त्या जर अंमलांत आणल्या तर अभिनयाच्या बाबतीत आपली कंपनी नंबर एकची ठरेल !

सदानंद : तसा आहेसच तू डोक्याचा म्हणा, काय आहेत बुवा या नवीन युक्त्या ?

वैकुंठ : ओळीनं सांगतो. पहिल्या प्रथम हिरो, बहुतेक कंपन्यातून हिरोईनचा नवरा येवढ्याच नात्यावर ‘ हीरो ’ची पदवी मिळविता येते; पण ‘ हीरो ’ हे नाव सार्थ करण्याकरिता व

हुबेहुब हीरोलाईक उंडारलेल्या ॲक्शन्स वठविण्याकरिता मी काय करणार आहे ?

सदानन्द : तर्क चालत नाही बुवा !

वैकुंठ · अरे, नाहीच चालायचा, कारण डोकं ओरिजनल आहे ! हीरोच काम करणाऱ्या माणसाला काम करायला सुरवात करण्यपूर्वी बरोबर एक तास चाळीस मिनिटे सडकून भांग पाजायची ! आणि त्या निशेने तो सैतान एकदा तर्र झाला की ऐशा झोकदार ॲक्शन्स् करील म्हणतोस की बस्स् ! तो स्क्रीनवर-सिनेमाच्या पडद्यावर दृश्यमान झाला रे झाला की एकदम काड् काड् टाळ्या पडतील नुसत्या ! काय, कशी आहे कल्पना ?

सदानन्द : आता काय सांगू ? वैकुंठ–सगळ्या पदव्या आल्यागेल्यांनी उष्टावून टाकल्यामुळे–राजा, तुझ्या ओरिजनल शहाणपणाला द्यायला पदवी शिल्लक नाही रे या मराठीत ! जाऊ दे, मी आपलं तुला माणूसच म्हणतो. तेव्हा माणसा, तूच सांग विनोदी पार्टीकरिता काय पेय शोधून काढलं आहेस !

वैकुंठ : त्याला पेय नाही. दुसरी युक्ति आहे त्याला ! त्यांच्या करिता काय करायचं ?

बिभीषण : अरे आम्ही काय सांगणार, तूच सांगना बाबा ! आमची अक्कल अगदी गहाण पडली आहे या बाबातीत !

वैकुंठ : काय मिस्टर सदानन्द नाऊ युवर ट्रायल–काय सांगणार आहे मी आता ?

सदानन्द : ऐकण्याकरिता कान टवकारून ठेवले आहेत ! आता फक्त तू सांगायचं आणि आम्ही हंसायचं एवढंच बाकी उरलं आहे !

वैकुंठ : यू ऑल जंटलमेन, तुम्ही आपली डोकी खाजवा, विनोदी पाटर्यांनी काय करायचं ?

नट ३ रा : हात्त्याच्या मी सांगतो ! विनोदी पाटर्यांनी धावतांना पाय घसरून मधेच पडायचं ! आणि चक्रमसारखे अभिनय वठण्याकरिता—अभिनय अजिबात करायचा नाही. फक्त आपला मूळातला चेहरा कायम ठेवायचा ! द्या टाळी !

वैकुंठ : थोडंस बरोबर आहे. पण हा टांकसाळीचा छापील विनोद झाला ! मी आपल्या कंपनीकरिता स्वतंत्र चार्ली चॅपलीन निर्माण करणार आहे !

सदानंद : करशील बुवा ! पण कायरे, युक्ति काय योजणार ?

वैकुंठ : उत्कंठा वाढली तुमची पूर्ण ? आता हंसणार अगदी मी बोलल्याबरोबर ?

बिभीषण : ए बुवा, पुरे कर आता, तू सांगायच्या आधी पोटभर हंसून दाखवू का ?

वैकुंठ : वेट ए मिनिट् ! विनोदी पार्टी जातिवंत तयार करण्याकरिता उंदीर आणि झुरळं——

बिभीषण : काय उंदीर आणि झुरळं ? काय खायला घालणार की काय विनोदी पाटर्याला ?

वैकुंठ : नाही ! उंदीर आणि झुरळं त्याला खायला मिळणार नाहीत तर विनोदी पार्टी जातिवंत तयार करण्याकरिता आणि त्याच्या आडव्या तिडव्या उड्या साहजिकच येण्याकरिता यू नंबर थ्री कमॉन !

नट ३ रा : उंदीर, झुरळं आणि मी ! आपण नाही विनोदी पाटर्याचं काम करणार !

वैकुंठ : अहो असं काय करता ? सिनेमा कंपनीतल्या माण-

सानं म्हणजे प्रत्येक संकटाशी झुंजायला तयार असलं पाहिजे! आणि तुम्ही नुसते उंदीर आणि झुरळ म्हटल्याबरोबर घाबरता? हे पहा माझे खिसे. उंदीर आणि झुरळं काही मी खिशात भरून आणलेली नाहीत! कमॉन्---

नट ३ रा : बरं बुवा! काय करायचं?

वैकुंठ : आता काही करायचं नाही. नुसते या टोकापासून त्या टोकापर्यंत सरळ चालत जा. मी आता नुसती माझी कल्पना सांगणार आहे.

नट ३ रा : बर पण चालत कसा जाऊ? हीरोसारखा, का विनोदी पाटर्यासारखा?

वैकुंठ : सध्या सरळ आपले माणसासारखे चालत जा–(नंबर ३ चा नट ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत चालत जातो.)

वैकुंठ : ऐकलंत का बिभीषणपंत व सदानंदराव. हा आता सरळ चालला आहे ना? आता त्याच्या पायात उंदीर आणि झुरळं सोडायची! की हा अडखळेल–गांगरेल आणि झुरळं पायाखाली चिरडू नयेत व उंदीर पायाला चावू नयेत या सद्हेतूने प्रेरित होऊन हा असा काही मजेत चालू लागेल–अहो फेंगड्यासारखा–अहो हुबेहुब चार्ली चॅपलीन!

सदानंद : याला म्हणतात (नुसतीच मान हालवतो.)

बिभीषण : (सदानंदाच्या हातावर टाळी मारून) खर आहे बुवा!

नट १ ला : वैकुंठ, माफ करा हं. सगळ्या कंपन्या पालथ्या घातल्या पण असला ओरिजनल प्रकार नाही कुठे पाह्यला मिळाला! वैकुंठराव, या कल्पनेचं पेटंट घ्या बुवा तुम्ही!

वैकुंठ : अहो, ह्या कल्पनेचं पेटंट कसं घेता येईल ? उंदीर आणि झुरळांचं पेटंट कसं घेता येणार ?

नट २ रा : खरंच वैकुंठ, आणि व्हिलनचं काय करणार तुम्ही ?

वैकुंठ : सांगतो–सांगतो—

नट २ रा : मला एक कल्पना आली आहे.

वैकुंठ : हं सांगून टाका.

नट २ रा : मला वाटतं व्हिलनचं काम करणाऱ्या माणसाला तुम्ही इतके छळणार–वेळेस मारपीट सुद्धा; की तुमच्यावर सूड घ्यायचं त्यांनी ठरवलं पाहिजे ! मग काय नुसतं तुम्ही समोर यायचा अवकाश (एकदम भुवया चढवून–मिशीला पीळ घालून–एक हात रुबाबात वर करून मूठ मिटवून हात वर करतो आणि दुसऱ्या हातानं एक हात दुसऱ्या हातावर आपटीत) अरे चोरा, आतां मी पाहतोच माझ्या तावडीतून कसा सुटतोस ते ! आणि लगेच फक्त मानेला अर्धांगवायूप्रमाणे (चेहरा कायम ठेवून नुसतीच मान हलवतो) मला वाटतं या हलणाऱ्या मानेवर एकादं घड्याळसुद्धा रेग्युलर वेळ दाखवील नाही ?

वैकुंठ : आहे, डोकं आहे ! होईल तयार. पण माझी कल्पना अगदी निराळी आहे ! आता सांगितली असती पण आपण घाबरून जाल—

नट ४ था : असं आहे का ? मग व्हिलनचं काम मीच करणार आणि आपल्या नवीन कल्पनेप्रमाणे करणार ! सांगा–सांगा आपली धडाडीची कल्पना सांगा–सांगा–सांगा—

वैकुंठ : पण आपलं हार्ट वुईक नाहीना–नाही तर हृदयक्रिया बंद पडून मृत्यु यायचा पटकन् !

नट ४ था : अहो उंदीर झुरळांना घाबरलो नाही तो आपल्या कल्पनेला घाबरतो काय ?

वैकुंठ : असं म्हणता ?

सदानंद : आहे बुवा, धाडसी माणूस दिसतो आहे, सांगच तू आपली कल्पता—

वैकुंठ : व्हिलनचं काम करणाऱ्या माणसाच्या खिशात आणि खाकेत.

नट ४ था : काय ?

वैकुंठ : विंचू ठेवायचे ! की त्यांनी डंख मारायला सुरुवात करतांच अभिनयच अभिनय !

नट ४ था : काय विंचू ?

वैकुंठ का घाबरलात का !

नट ४ था : हो, हो, विंचू खाकेत, खिशात घालून काम करून दाखविण्याची माझी तयारी आहे; पण कंपनी माझ्या आयुष्याचा विमा उतरील का ?

वैकुंठ : शक्य नाही ! ज्याच्या त्याच्या जिवाचा जो तो जोखीमदार ! अगोदर मेलात म्हणून तुमच्या कुटुंबाच्या पोटगीची सोय जर कंपनीने करावयाची–तर समजा आपण चुकून जास्त जगलात तर कंपनीला वारसदार कराल का आपल्या इस्टेटीची ?

नट ४ था : अहो विलायतेत नटनटींना पगार काय असतो– त्यांच्या सुखसोयी काय असतात—

वैकुंठ : अहो पण ते विलायतेत असतं ! ते जर आम्ही हिंदुस्थानात चालू केलं तर विलायतेचं वैशिष्टच काय राहिलं ? विलायतेचं तसे वैशिष्टच, हिंदुस्थानचं असं वैशिष्टच !

सदानंद : आणि दुसरं असं, विलायतेत—

बिभीषण : विलायत आणि अमेरिका एकच का हो ?

सदानंद . हात्त्याच्या, येवढं का माहीत नाही तुला ? अरे हिंदुस्थान सोडलं की सगळीच विलायत—

बिभीषण : अस्सं ?

सदानंद : हो सांगायच काय राहिलं ! विलायतेत धंद्याकरिता धंदा करतात आणि आम्ही लोक आमच्या जवळची मोडतोड उपयोगात यावी म्हणून धंदा करितो.

वैकुंठ : उदाहरणार्थ, एकाजवळ कॅमरा आडगिऱ्हायकी आला होता. त्याचा उपयोग व्हावा म्हणून त्याने सिनेमा कंपनी काढली ! दुसरा नालाचा स्वत: व्यापारी म्हणून त्याने घोडे खरेदी केले ! त्याचं म्हणणं असं की, नालाचा खुद्द व्यापारी मी, आता मी जर घोडे खरेदी केले तर त्यांना ठोकण्याकरिता नाल व्यापारी भावाने घरात पडणार मला ! आणि एका राजश्रींनी तर, फिल्म कंपन्या आहेत—तेव्हा त्या चालत असल्याच पाहिजेत ! मग आपण काढली तर का नाही चालणार ? येवढी मोठी इमारत बांधून फिल्मकंपनी काढली ! आणि तो म्हणतो बेहेत्तर आहे फिल्म-कंपनी मोडली तर. इनडोअर सीन्सवर अर्धे ॲक्टर्स वाटून देऊन एक नाटक कंपनी चालू करीन व आऊटडोअर सीन्सकरिता केलेल्या तंबूराहुटया एकत्र शिवून व बाकीचे नट भरतीला घालून एकीकडे सर्कस चालू करीन !

नट १ ला : बराय साहेब (गोष्टींच्या गठ्ठ्यांकडे पाहून दचकतो) ह्या काय गोष्टी की काय ?

बिभीषण : हो गोष्टीच आहेत त्या ! घाबरायसारखं त्यांत विशेष कांहीं नाहीं ! ह्या गोष्टी येवढ्या दिसताहेत ना तुम्हाला डोंगरायेवढ्या—नाहीतर समुद्रासारख्या पसरलेल्या, पण या एकूण

एक जायच्या परत; आणि समुद्रमंथनानंतर रत्नें सांपडलीं त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टींतील थोडाथोडा भाग घेऊन ५।५० स्टोरीज तयार करायच्या. काहींवर आपल्यापैकीच नावे दडपायची व काहीं वर प्रसिद्ध लेखकांना थोडेथोडे पैसे देऊन त्यांची नावं दडपायची. मूळ लेखकांनी खुशाल आपल्या परत आलेल्या चोपड्या शुक्रवारी काबलीवाल्याला रद्दीदाखल देऊन काय येईल ती आदपाव छटाक 'मसालेदार' काबली खात बसावे ! शुक्रवारची काबलीय !

सदानंद : पण वैकुंठराव, आतांपर्यंतच्या सगळ्या हिकमती ठीक झाल्या पण मूळ जबाबदारी पुढेंच आहे ! पुरुषपाटर्यांकरिता आपण सुचविलेले उपाय ठीक आहेत; पण नटी–नटींना लाजायला कसं शिकवणार तुम्ही ?

बिभीषण : आहे खरंच कोडं-जिथे मुळांतच लाज नाही तिथें–

वैकुंठ : हे लक्षांत ठेवा दोस्तहो ! या जगांत अशक्य असं काही नाही ! आणि या सिनेमासृष्टीत तर नाहीच नाही ! ट्रिक-सीन्स ! धंद्याच्या सुरुवातीपासून सगळ्याच ट्रिक्स ! खरी आर्ट कुठेंच नाही ! नटी कशा लाजत नाहीत त्या मीच पाहतो हं– (हातावर टाळी वाजवून) एक-दोन-तीन-चार–बसला आडाखा, काय सदानंदराव आल्या आहेत का आपल्या नटी ?

सदानंद : आणून बसवल्या आहेत बाहेर ! अहो मंडळींना म्हणाव तुम्हाला बोलावताहेत–(एक नट जाऊन येतो.)

नट ४ था : त्या म्हणतात त्यांना इथे यायला लाज वाटते आहे.

बिभीषण : अरे लाज हा शब्द माहीत आहे की त्यांना-काय?

वैकुंठ : बरं, म्हणावं नुसत्या येऊन जा–

नट ४ था : ( जाऊन परत येतो. ) येताहेत साहेब. ( कवि चातक प्रवेश करतात. )

चातक : हॅलो मिस्टर बिभीषणपंत–गुड नून !

बिभीषण : या हो बसा. वैकुंठराव, हे एक माझे स्नेही आहेत. ह्यांना गोष्टी वगैरे लिहिण्याचा नाद आहे—

वैकुंठ : हरकत नाही. कोणच्याही गोष्टीच्या नादी असणं काही वाईट नाही ! आणि आपणही अगदी वेळेवर आलांत ! आम्ही आतांच आमच्या नटीना बोलावणं पाठवलं होतं आणि ताबडतोब आपण आलांत ! हरकत नाही ! या बसा असे, कमीत कमी दोन डझन गोष्टी तयार असतील आपल्याजवळ ?

चातक : अलबत ! सगळ्या गोष्टी ओरिजनल असून अत्यंत सुंदर आहेत ! काय समजलेत ?

वैकुंठ : पण सध्या आपलं जगण्याचं साधन काय आहे ?

चातक : अर्थात् वडिलांचा खिसा ! लेखनावर उपजीविका होणे शक्य नाही असं माझं ठाम मत झालं आहे !

वैकुंठ : नाही ते एकंदरीत फार चांगलं आहे ! बरं, आपली गोष्ट ऐतिहासिक आहे, का पौराणिक आहे, का सामाजिक आहे?

चातक : तसं काही नक्की सांगता येणार नाही बुवा ! फार झालं तर गोष्ट आहे येवढं सांगता येईल !

वैकुंठ : का होईना; येवढी तरी खात्री आहे ना आपली ?

चातक : अगदी नक्की–पण प्रकार नक्की सांगता न येण्याचं कारण असं की गोष्ट ऐतिहासिक आहे म्हणावं तर त्यात इतिहासाचा धागा अजिबात नाही ! फक्त तरवारीचा खणखणाट पळापळीचा दणदणाट–लढाईचा सणसणाट–दुष्कृत्याचा भणभणाट आणि ऐतिहासिक सत्याचा व कल्पनेचा ठणठणाट दृष्टीस पडतो !

आमच्या ऐतिहासिक फिल्म्समधून मंगलूर टाईल्स्—बुधवारातला वाहुलीचा हौद, चतरशिंगीचं नाकं व त्यावरची म्युनिसिपालिटिच्या जकातीच्या नाक्याची पाटी सरळ पाहून घ्यावी ! ऐतिहासिक फिल्म्स्मध्ये मी पासिंगशोच्या जाहिराती पाहिल्या आहेत, डोंगरे का बालामृत हळूच डोकं वर काढतं आहे ! वगैरे वगैरे ! ऐतिहासिक फिल्म्स मधली लढाई पाहिली की मला हुडहुडी भरते ! त्यांच्या हातात तरवारी नाहीत अशी कल्पना केली आणि नंतर त्यांच्या ॲक्टिंगकडे पाहिलं तर वाटतं त्यांच्या डोक्यात उवालिखाचं पीक भयंकर माजल्यामुळे ते सतावून जाऊन वेड्यासारखे नाचत आहेत, बागडत आहेत व अखेर शेवटी भोवळ येऊन पडत आहेत ! देशी लढाईत वार कुणालाच लागावा लागत नाही ! ज्यानी मरायचं किंवा पडायचं ठरवलं असतं ते ते बिचारे गुपचुप पडतात व मरतात ! बरं, गोष्ट सामाजिक आहे म्हणावं तर हत्याराचा कायदा डोक्यावर धडधडीत असतांनासुद्धा खंजीर, तोफा, पिस्तुल, बंदुका स्वैपाकघरापासून दिवाणखान्यापर्यंत धुडगुस घालताना दिसतात ! शिवाय भयंकर भुयारे वगैरे वगैरे भयंकर प्रकार दृष्टीस पडतात ! आणि वाटतं की हा सामाजिक चित्रपट म्हणजे समाजाला अजीर्ण झाल्यामुळे एका आमावास्येच्या रात्री बारा वाजता अक्राळ विक्राळ तऱ्हेची पडणारी ही भेसुर स्वप्ने आहेत बरं पौराणिक आहे म्हणावं—

वैकुंठ : बरं आपली गोष्ट आणली आहेत का बरोबर वाचायला ?

चातक : बरोबर आहे. म्हणजे आपलं म्हणणंही बरोबर आहे आणि मी गोष्टही बरोबर आणली आहे !

वैकुंठ : वाचा तर मग थोडीशी —

चातक : तत्पूर्वी एक पेलाभर पाणी आणि एक सिगारेटची पेटी घ्या ! (पेलाभर पाणी आणून देतात—कवि चातक पाणी पितात व कोट टोपी वगैरे काढून सदऱ्याच्या अस्तन्या मागे सारून एक सिगारेट पेटवितात. ) येस्. वन थिंग मोअर ! मी गोष्ट सार्किंटग म्हणजे अभिनयासुद्धा वाचून दाखवीत असतो. मला औरस चौरस दहाफूट जागा मोकळी लागते ( त्याप्रमाणे करतात ) हं, ऐका हं आता लक्ष देऊन ! एक गृहस्थ आपल्या नीच कारस्थानानं जगाला भारी होतो व नंतर स्वत: खुशीत येऊन हातवारे करीत म्हणतो. O, I am the monarch of all I servey ! ( पुन्हां म्हणतो )

विभीषण : अग आईग, मग पुढे काय झालं ?

सदानंद : आहे; गोष्ट दणदणीत दिसते आहे बरं का ?

वैकुंठ : पण काय हो याचा मराठीत अर्थ काय ?

चातक : आपल्याला इंग्लिश नाही समजत ?

वैकुंठ : म्हणण्यासारखं नाही—

चातक : मग माझी गोष्ट पास झालीच म्हणून समजा ! तुम्हाला इंग्लिश येत नाही अर्थात् आमच्या गोष्टीचं मूळ कुठे आहे हे आपल्याला समजायचे नाही. अर्थात् गोष्ट चांगली. आता अडचण एकच आहे—मला इंग्लिश समजतं पण ते मराठीत मला सांगता येत नाही—

वैकुंठ : मग असं करता का—काही वेळ आपण दोघेही थांबूया ! तोपर्यंत मी इंग्लिश शिकतो आणि आपण इंग्लिशचे मराठीत भाषांतर करायला शिका ! तूर्त आम्हाला आपली अत्यंत

जरूरी आहे ! आपण आमच्याकडे काय पगारावर नोकरीला रहाल ?

चातक : स्टोरीपाठीमागे काय द्याल ते बोला ! पगारी नको, मी कोणाचा ताबेदार व्हायला तयार नाही !

वैकुंठ : आपला थोडासा गैरसमज झालेला दिसतो आहे ! आम्हाला आपली जरूरी स्टोरी रायटर म्हणून नसून आपण आता जे हावभाव केलेत त्यावर आम्ही अत्यंत खूष आहोत ! नट म्हणून आपण आमच्याकडे काय पगारावर नोकरीला रहाल ?

चातक : अपमान, अपमान, हा माझा भयंकर अपमान आहे ! जातिवंत आचाऱ्याला तुम्ही वाढप्याचं काम सांगणार ! सिगारेट ओढण्याची मला श्रीमंती सवय असताना नादानपणानं खाकी विडी आपण माझ्यापुढे करणार ? नाही नाही, या आर्यावर्तात कलेला मानच नाही ! (रुबाबांत ॲक्टिंग करतो व सलाम करीत) अच्छा–!

वैकुंठ : असं करा, जरा बसा ! आपली गोष्ट आम्ही जरूर घेऊ ! कंपनीचा पहिला चित्रपट तयार झाला की दुसरा आपला.

चातक : मग हरकत नाही ! या ‘ प्रॉमिसवर ’ मी आपल्याकडे हमालीचे सुद्धा काम करायला तयार आहे ! फॉर आर्ट सेक ! केवळ कलेकरिता ! हो, पण माझ्या गोष्टीत एक दोन पावसाचे सीन्स आहेत, ते कसे काय ॲरेंज करणार आपण ?

वैकुंठ : अलीकडची गोष्ट सोडून द्या ! हल्ली सत्यसृष्टीत आणि सिनेमासृष्टीतही पावसाळा कमीच झाला आहे ! पण पूर्वी आपल्याकडील बहुतेक फिल्मा पावसांतच निघत होत्या कीं ! सीन्स पावसाचे नसताना जाच्या फिलमभर तिथे आम्ही पाऊस

पाडीत होतो. आता पाऊस पुष्कळच कमी झाला आहे; पण अगदीच नाही असं नाही.

चातक : पण कायहो–बरं पण काही नाही––

वैकुंठ : अरे, त्या नटी कां अजून आल्या नाहीत? बोलवा पाहू त्यांना? अरे वा, त्याही आल्याच वाटतं (चंद्रिका आणि रंभा प्रवेश करतात.)

वैकुंठ : काय, रहाणार ना आपण या कंपनीत?

चंद्रिका : हांऽजी! सदानंद महाराजांच्या बाहेर आम्ही थोड्याच आहोत.

रंभा : पण आम्हांला पगार काय मिळणार धनी?

वैकुंठ : काम पाहू आणि मग पगार ठरवू? चालेल ना?

चंद्रिका : पण सुरवातीला आम्हांला काही तरी खर्ची मिळायला हवी.

वैकुंठ : एक दोनचार दिवसात देऊ! पण बरं का, इमानानं राहिलं पाहिजे इथे; नाहीतर जरा नाव मिळवलं की जाल दुसऱ्या कंपनीत निघून!

रंभा : नाही जी! आपली कंपनी मोडल्याबिगर कशाला जातो आम्ही दुसऱ्या कंपनीत?

चंद्रिका : आणि कुठेंही काय पगार घ्यायचा धनी!

वैकुंठ : आणि बायका आहात म्हणून सांगतो! इकडे तिकडे कुठे पाहायचं नाही! आम्ही हे करणार नाही, ते करणार नाही म्हणून अडायचं नाही!

चंद्रिका : परीक्षा तर पहा आणि मग बोला धनी!

सदानंद : आणि अशा वागलात म्हणजे तुम्हालाही काही कमी पडायचं नाही! अमदी काही दिवसांनी लोकांना असा

...४

भ्रम पडेल की कंपनीचे मालक आम्ही की मालकिणी तुम्ही ! बरं वैकुंठराव मंडळींना सांगा कंपनीच्या नावाचा बोर्ड बाहेर लावला आहे त्याला हार वगैरे घालायला ! तशीच पानसुपारीची व्यवस्था करायला सांगा. निमंत्रित मंडळी आता यायला लागतील. ( सर्वजण जातात. ) काय बिभीषणपंत आपले पैसे अजून हाती आले नाहीत ?

बिभीषण : येतील आज उद्या इतक्यात ! तूर्त तुजजवळचे खर्च कर ! असतीलना काही तुझ्या खिशात ?

वैकुंठ : ( खिशातील पाकीट काढून पहात ) छे: बुवा ! अरे पण हो. फक्त एक रुपया बंदा शिल्लक आह माझ्याजवळ !

सदानंद : मोस्ट लकी ! भावी चरित्रलेखनाची सुंदर सामुग्री आहे ही ! अरे एक रुपयावर कंपनी चालू केली म्हणून लिहिता येईल आपल्याला आपल्या चरित्रांत.

वैकुंठ : बरायं कविराज ! तुमचं आमचं ठरलं तर मग ! आणि असं करा, आपली स्टोरी तर आम्ही घेऊंच ! पण असं करा, हे येवढे गठ्ठे इथे आले आहेत त्यांचा काही तरी उपयोग केलाच पाहिजे ! हे सर्व गठ्ठे आपण घेऊन चला घरी आणि त्याच्यांतले खडे पाकड सर्व काढून टाकून एक सुंदरशी गोष्ट तयार करा ! त्याच्याबद्दल शंभर रुपये आपणांस देऊं ?

चातक : शंभर रुपये मात्र मला रोख मिळाले पाहिजेत हं !

वैकुंठ : जरूर. मी सांगतो हे गठ्ठे आपल्या घरी पोहोचते करायला. चला; त्या माणसांची तयारी झाली का बघा आणि झाली असली तर यायला सांगा त्यांना इकडे (चातक जातो.)

सदानंद : कायरे, एवढ्याशा हमालीकरितां शंभर रुपये देणार त्याला ?

वैकुंठ : अरे देतां घेतां शिमगा दिवाळी पहातां येईल ! तूतं तर त्याला खुशीत गाजरं खाऊ द्या ! ते पैसे कसे चुकवायचे हे मला माहीत आहे ! अरे, वेळ पडल्यास त्याला एक पैही न देता त्याच्याकडनंच पैसे काढीन ! या वैकुंठाला तू पुरता ओळखला नाहीस अजून.

बिभीषण : म्हणजे आम्हीहि सावध राह्यला पाहिजे की काय ?

वैकुंठ : भलतंच, अरे आपण तिघे म्हणजे त्रैमूर्ति आहोत ! बरं बोलण्यांत फार वेळ चालला– ( सर्व मंडळी येतात. वैकुंठ तजबिरीची पूजा वगैरे करतो व नारळ फोडतो. ) जय बजरंग बली की !

अंक दुसरा समाप्त

---

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

(विठी–आतां नूरजहान हे नामाभिधान प्राप्त झालेली नर्तकी नाचत नाचत प्रवेश करते.)

विठी : य बया, वैकुंठरावांनी सांगितलं की काही दिवसांनी शेणीमा आणि नाटक म्हणजे नुसता नाच शिल्लक रहाणार ! राजाच्या दरबारांत नाच, भटाभिक्षुकांच्या घरीबी नाच, देवळात नाच, नाटकाच्या, शेणिमाच्या सुरवातीला, मधे, अलिकडे पलीकडे समदीकडे नाचच नाच ! कारन काय, तर आडियन्स का काय म्हनतात त्यांचा नाचाबिगर जीव लागत नाय नाटक आणि शेणिमा पाह्यला ! तवा ते म्हणले विठे, य बया कराल द्वाडावाणी नाव– आतांच माझं नाव नूरजहान ! तू नुसती नाचत रहा ! त्या दोड विश्वामित्रानीही आपला पुढे कोणी शेणिमा केला तर त्यांत कॉमिक व्होव म्हणून ढेरपोटचा अन अजागळ शिष्य पैदा करून ठिवला होता ! ( पुन्हा थोडी नाचते ) पहिल्यांदा म्हन नाटक शेणिमातन कॉमिक भटाभिक्षुकाच्या फार्साबिगर रंगत नव्हतं ! पुढं पुढं अनारशा चकल्याच्या फार्सावाणी बेवडा पिऊन झिंगलेल्या गड्या सावकाराशिवाय रंगेनासं झालं ! आणि आतां तर नाचाशिवाय कुटंच काय बी रंगत नाय ! परवा वैकुंठराव बोलतांना मी ऐकले की एक शेणिमा कंपनी रामवनवासाची फिल्म घेतीया तथ नाच टाकता येईना तवा त्या अकलेल्या कांद्यांनी रामापुढे सीतेलाच नाचवायचं ठरवलं ! म्हणे

घडीभर सीतामाय नाचेल, घडीभर रामबी नाचल अन खिनभर लक्षुमनाला नाचायला तरी काय धाड भरलीया व्हय ? तवा काय नुसत नाचत सुटायचं ! (पुन्हा थोडा वेळ नाचते) सुरवातीला मी शेणिमा कंपनीत राहिले तवा मला वाटलं पाच विसा तरी पगार मिळेल. पण बया, हत येऊन ४ महिने नाही झाले तर निरनिराळ्या शेणिमा कंपनीचे मॅनेजर लागले की माझ्या घरी हेलपाटे घालायला ! एक म्हणतो ५०० रुपये पगार देतो. दुसरा म्हनतो मी एक हचार रुपये पगार देतो, अन शिवाय राह्यला बंगलाबी देतो ! तोच तिसरा म्हनतो कानपिटीशनमधे–म्हणजे काय धावपळीमधे वाटत–मी नाय कोनाला हार जानार ! मी दोन हजार रुपये पगार देतो अन शिवाय मी तुझी वाटल तशी तैनात संभाळतो ! तुझचं नाव माझ्या कंपनीला देतो ! अन् बया ह्ये जवा आमच्या ह्या कंपनीच्या वैकुंठराव मॅनिजर मालकाला कळलं–तवा तोबी म्हनतो की विठे नव्ह नूरजहान - अशी हातोहात फरारी होऊं नकोस ! मी तुला चालू महिन्यापासून दोन हजार रुपये दरमहा देतो. अन ठिवला की त्यान योक हजाराचा चोक का काय म्हणतात तो माझ्या पुढे; तवा मी बी मनांत खजील झाले की या ४।६ महिन्यांत मला असा काय भाव आलाया आणि तो टिकणार हाय तरी किती दिवस ? मी समजुतीनं वैकुंठरावाला विचारलं की भल्या मानसा–तुझ्या कंपनीत बाप्याला जास्तीत जास्त पगार हाय तरी किती ? तवा तो म्हणतो सगळ्यांत मोठा हीरू आहे त्याला ३५ रुपये पगार आहे ! वरं नंतर म्हंतलं तुझ्या समद्या कंपनीचा पगार तरी हाये किती ? तो म्हनाला पांचशे ! तवा मी मनांत म्हनलं, अरे भल्या मानसा- माझ्या नावानं सगळी कंपनी का बळी दितोस ? पन तो काय उमगणार

हाय होय म्हणतां ? हे बाप्ये असंच पहिल्यांदा आमच्यासारख्या आचरटीना गोडी लावणार आणि काही दिवसांनी आपण स्वत: बसणार गुबुगुबु नंदी बैल होऊन ( पुन्हा थोडी नाचते. कवि चातक प्रवेश करतो. )

चातक : अग नूरजहान, अशी जिथं तिथं नाचू नकोस. असा तूं आपला नाच अगोदरच सगळ्यांना दाखवलास तर थिएटरांत गर्दी कशी जमणार ?

विठी : कवि, मला कनी अक्षी झिंगल्यावाणी झालय बघा ! अक्षी पोपटाला कंठ फुटल्यावाणी.

चातक : पण असं इतक्यातच भांबवल्यासारखं करू नकोस. अजून तुला फार चान्सेस आहेत.

विठी : पन द्येवा, माझ्या करता तुम्ही एक गोष्ट लिहिनार व्हता ना ?

चातक : अग चल हट ! माझ्याजवळ जी काय थोडीशी लेखन-कला आहे ती मी अशी कुणाच्या नांवाने बळी देणार नाही ! मी मला वाटेल तसं लिहिणार आन तुझ्या करता आज म्हणून गोष्ट लिहिली. उद्या कंपनीला एकादा चांगल्यापैकी कुत्रा लाभला आणि त्याच्यावर पैसे मिळतील असं वाटलं तर म्हणतील त्या कुत्र्याला हीरो करून गोष्ट लिहा ! आपल्या हातून नाही व्हायचं असं ! आणि सध्या माझी तब्बेतही ठीक नाही तेव्हा मी लिहिणं वगैरे सगळं बंद केलं आहे !

विठी : मग हल्ली काय करता द्येवा ?

चातक : डॉक्टरनी सांगितल की सध्या डोक्याचे काही काम करू नका. म्हणून मी त्याना विचारलं--कविता करायला काही हरकत आहे का ? तेव्हा डॉक्टरनी चक्क सांगितलं की कविता

करायला काही हरकत नाही ! कवितेचा आणि डोक्याचा काय संबंध ? म्हणून हल्ली कविता करण्यात वेळ घालवतो.

विठी : पन द्येवा. मला किनई हत अगदी कंटाळल्यावाणी झालाया बघा ! या दोन महिन्यातच माझ्याजवळ ४।५ हजार रुपये साचले आहेत. तवा हा धंदा द्यावा सोडून आणि बसावं आपलं स्वस्थ बसून आहे ते खात !

चातक : विठे, तुला महत्त्वाकांक्षा कशी नाही ! इतक्यात तू कंपनी कशी सोडणार ? अग कंपनीचं जेवढ भांडवल आणि भरतीला मालकाचं कर्ज येवढी जेव्हां तुझी स्वतःची इस्टेट होईल, तेव्हा फार झालं तर तू कंपनी सोड ! सगळे कलावान हल्ली कलेकरता जीव द्यायला आणि वेळी कलेचा प्राणसुद्धा घ्यायला तयार आहेत ! आणि तू अशी कलेला शरपंजरी सोडून कशी जाणार आणि कुठं जाणार ? हल्ली सर्वत्रांनी स्वार्थ आणि पोट बांधून ठेविलं आहे. जो तो कलेकरता मरतो आहे ! आणि सर्व कलावान् एकत्र जमल्यामुळे अखेर कलेचा जीव घ्यायचा कुणी त्याबाबत त्यांच्यात काही एकमत होत नाही आणि यात आपल्याकडे हीरोचं काम नाही असं वाटल्याबरोबर—कलेचे कसाई भराभर पांगून स्वतंत्र खाटीकखाने काढतात ! असं आहे तेव्हा विनंती एवढीच की मिस् नूरजहान, आपण इतक्यांत कंपनी सोडून कलेला अर्धवट जखमी करून सोडू नका.

विठी : द्येवा, तुम्ही काईच्या बाईच बोलता बघा ! अन् मला ते पुरतं समजत बी नाय ! पण तुम्ही बोलता तवा त्यांत काही तरी चांगलाच अर्थ असला पाहिजे असं आपलं माझं मन घेतं आणि मी मुकाट ऐकून घेते ! इतक्यात कंपनी सोडू नका म्हनता. बरं रहाते काही दिवस आणखी ! जवा तुम्ही

सांगाल तवा सोडीन. पण द्येवा एक सांगायचं राहिलं तुम्हाला; अगदी गुपीत गोष्ट हाये बघा !

चातक : काय आहे ही गुपीत भानगड !

विठी : आपण वैकुंठरावासनी त्ये गोष्टीचे पैसे मागता हाय ना जणू ? त्या पायी तुम्हाला पै ही न देता खड्डयात घालायचा चालला आहे त्यांचा काही तरी इचार ! तवा म्हनते जरा जपून असा.

चातक : मला खड्डयात घालणार ! मला खड्डयात घालणार ? एक सांगतो विठे, या कवीला सरळपणाने कुणीही खड्डयात घालू शकत नाही. एकादा वाममार्गच पत्करला तर काही तरी शक्य आहे ! पण काय ग विठे कशावरून म्हणतेस हे सर्व ?

विठी : त्यो वैकुंठराव, बिभीषणपंत आणि सदानन्दमहाराज यांच्याच तोंडून ऐकलं नव्ह का ? त्ये म्हनत होत्ये, लिहिण्या-बद्दल पैसे कसले मागतो तो हरामखोर ! आणि आम्ही तरी कुठं त्याला द्यायला बसलो आहोत ! त्ये म्हनले ल्येका तुझ्या खेळाचे पास सुद्धा तुला मिळणार नाहीत ! तिकीट काढूनच तुला पाहायला लावू ! अन् पैसे कसले घेऊन बसलास ! अन् लागतं काय असं भांडवल लिवायला ? चार दीडक्यांचे कागद, दमडीची शाई, अधेल्याचे बोरू आणि दमडीचा टिप्प्या कागद !

चातक : काय करू रे–अशी आग होते आहे हे ऐकून ! दऊत टाक सगळ्यांच्याच हाती सापडू लागल्यामुळे आणि पण–जाऊ दे तो विषय ! याद राख म्हणावं ! पण आपण तरी काय करणार ? परवा वघ विठे, एका कंपनीवाल्यानं माझं नाटक वजनावरच मागितलं ! करता काय ? ज्याच्या हातात नट तो पारधी ! प्रत्येक जण आपल्याच निशेंत दंग ! आणि मलाहि

आता कंटाळा आला आहे. हा लेखनव्यवसाय म्हणजे वेश्याव्यवसायासारखा होत चालला आहे. आमच्या विचाराकडे कोणी लक्षच देत नाही ! कंपनीचा मालक म्हणतो, तुमचं नाटक चांगलं आहे पण ऑडियन्सला काय पाहिजे ते बघा ! परवा पहा विठे– तुझ्याजवळच सांगायच्या आता या गोष्टी ! कारण ज्यांना या बाबतीत भाव आले ते एकदम कालिदास-भवभूति होऊन बसले! माय गॉड, देशी उपमा ! डॅम इट–शेक्सपिअर, शेरिडन, शॉ होऊन बसले. तेव्हा माझं बोलणं तुझ्याशिवाय कोण ऐकणार ?

विठी : द्येवा, मी मात्र अगदी मन लावून ऐकते आहे हं ! कारण काय मला त्यात काही समजत बी नाय अन् तुम्ही काय म्हनता त्यांत बर वाईट करन बी माझ्या हातात काय नाय ! त्येवा मन मोकळं करून बोला अगदी !

चातक : आता बोलायचं काही फारसं राहिलेलंच नाही ! एका कंपनीत मी एक अत्यंत सुंदर नाटक घेऊन गेलो. ते म्हणाले, नाटक सुंदर आहे पण विनोद नाही तेवढा घाला म्हणजे नाटक घेतो, मी म्हटलं आता या नाटकाला विनोद जोडायचा म्हणजे तो चार पायांच्या गाईला मुद्दाम पाचवा पाय जोडण्यासारखं होईल ! तेव्हा ते म्हणाले, 'तसंच तर व्हावयास पाहिजे !' कारण चार पायांच्या गाया रस्तोरस्ती हिंडतात; पण त्यांना कोण पैसा टाकतो ! पण तीच पांच पायांची गाय असली तर तिच्यावर एक पाच माणसांचं कुटुंब पोट भरू शकतं. तेव्हा विठे सांगायचं काय ? जगाची चव हल्ली ही अशी आहे. चल, बराच वेळ झाला —

विठी : द्येवा ही येवढी नवीन बसवलेली नाचाची गत पहाना.

...५

(विठी नाचू लागते. व नाचत नाचत आत जाते. तिच्या पाठोपाठ कवीही वाकडे तिकडे चेहरे करीत आत जातो.)

---

## प्रवेश दुसरा

(स्थळ-रस्ता. वैकुंठराव फुलसूटमध्ये प्रवेश करतो. हातात टेनिस रॅकेट.)

वैकुंठ : सावणाचे फुगे तयार करणं सोपं आहे.पण ते टिकवणं फार अवघड आहे ! कंपनीला सुरुवात झाल्याला पाचसात महिने झाले. पण इतक्यात फंदफितुरी पक्षोपपक्ष कंपनीत तयार झाले ! आणि लवकर जर त्यांच्यात लक्ष घातलं नाही तर कंपनीचे श्राद्ध करायचीही वेळ लवकरच येणार ! त्या दोन नटीही हातावर तुरी देणार असं दिसतं आहे ! तरी एक नटीला-आमच्या फेव्हरीट नूरजहानला ती फुटू नये म्हणून–२००० रुपये पगार चालू केला! फिल्मही सबंध तयार होत आली. आता शेवटचंच शूटिंग चालू आहे. त्याचे अॅडव्हरटायझिंगही लवकरच चालू केलं पाहिजे ! (सदानंद गात गात प्रवेश करतो.)

सदानंद : हॅलो मि. वैकुंठराव, टेनिस रॅकेट घेऊन कुठं चालला ? धंदेवाल्यांनी असं खेळता कामा नये ! फार झालं तर वुमन आणि वाईन यांच्या नादी लागावं ! पण दोन्हीही बाबतीत आपण बॅकवर्ड आहात ! बरं मी एक जाहिरात देणारा अॅडव्हरटायझिंग मॅनेजर आणला आहे–पहा तुला पसंत पडला तर.

वैकुंठ : अॅडव्हरटायझर कसा असावा असं तुला वाटतं ?

सदानंद : मला वाटतं आपला चांगला सज्जन माणूस असला म्हणजे झालं.

वैंकुंठ : इथंच चुकताहात ! तो जितका मनुष्य नसेल तितकं फार चांगलं. जाहिरात लिहिणारा मनुष्य म्हणजे अस्सल थापाड्या पाहिजे. कमीत कमी दहा गावे तरी त्याच्या थापेबाजीला वळी पडलेली असली पाहिजे ! दहा गावात त्याला केवळ थापेबाजी-मुळे तोंड दाखवायला जागा नसली पाहिजे ! आता असं असूनही तो धाडसाने त्या गावात जाण्याचा प्रयत्न करील तर तो त्याचा शूरपणा आहे ! असा मनुष्य असेल तरच तो जाहिराती काही बऱ्या लिहील ! अहो, एक वेळ फिल्म तयार नसली तर चालेल. पण जाहिरात चांगली पाहिजे. (बिभीषण प्रवेश करतो.)

विभीषण : वैंकुंठराव, मी सगळं बोलणं ऐकलं तुमचं. जाहिरा-तीच्या बाबतीत आपले विचार सत्य आहेत, खरे आहेत आणि बरेही आहेत. तेव्हा ते चांगले का असणार नाहीत ! श्री. सदानंद यांनी अॅडव्हरटायझिंगकरता जो मनुष्य आणला आहे त्याच्या-कडून नमुन्यादाखल ही जाहिरात लिहून आणली आहे बघ.

वैंकुंठ : साहेब श्रवण करताहेत. आपण वाचून दाखवा !

सदानंद : सिनेमा कंपनीचा १/२ मालक आहेस. जरा रुबावात वाचून दाखवा.

बिभीषण : " जगाला आग ! अजब क्रांति ! आम्ही काय केलं आहे ते पहा ! अभिनव फिल्म कंपनीचा जगभर लोकप्रिय झालेला-बोलबाला होत असलेला पण अद्यापीही तयार नसलेला सुरवा-तीचा पहिला चित्रपट ' धुडगूस ' तयार झाला ! येणार ! येणार! तयार होत आहे ! थोडा राहिला ! बुकिंग करिता लिहा ! कॉपी शिल्लक नाही तरी पण तुम्हाला देऊं ! कथा लेखक–डायरेक्टर-फोटोग्राफर–अॅक्टर व अॅक्ट्रेस एकटे–एकच ! श्रीयुत वैकुंठराव, गंमत ही की या एकाच पठ्ठ्याने सर्व कामे केली आहेत !

सीनमध्ये पन्नास माणसे दिसत असूनसुद्धा अजब गोष्ट ही की ती कामे एकटच्यानेच केली आहेत ! अजब फोटोग्राफी ! काही सीन्स स्वर्गांत जाऊन घेतले आहेत ! त्याकरता कंपनीने चार कोट खर्च केले असून या चित्रपटाला भरपूर पैसा मिळून आमच्या मेहनतीचे रसिकांनी चीज केल्यास श्रीयुत वैकुंठराव पुढच्या फिल्म्समधील सीन्स घेण्याकरिता पाताळात जाणार ! सध्या मृत्युलोकावरच आहेत ! हँडबिलातील मजकुराचा कॉपीराईट आमच्याकडे ! ह्या चित्रपटात इंडियन हा, इंडियन तो, इंडियन ती, वगैरेंनी कामं केली आहेत असं आहे ! " कशी काय आहे जाहिरात ! आणि तो म्हणतो ही फक्त सुरवातीची सलामी आहे ! मुख्य थापा, अॅट्रॅक्शन, रेकार्ड ब्रेकिंग तर—सगळंच पुढं आहे !

वैकुंठ—शंभर नंबरी माणूस ! त्याला दिडशे रुपये पगार देतो म्हणून सांगा ! अशा कलावानाचं पोषण आपण करायचं नाही तर कुणी करायचं ! मला वाटतं अरेबिअन, पर्शियन नाईट्स् लिहिणाऱ्या गब्रूनंच या जाहितदाराच्या रूपाने पुन्हा अवतार घेतला आहे. ठीक आहे. पण कायरे, चार कोट खर्च केलेत म्हणतोस ? अबबब चार कोट रुपये ! छे: छे:—भलतीच थापेबाजी ही ! मग मी म्हणतो एवी तेवी थापाच मारायच्या तर अॅलिट्रेशन अनुप्रास तरी जमवा की ! हिंदुस्थानची लोकसंख्या तेहतीस कोट, आपणही खर्च केले तेहतीस कोट ! आणि खाली काय राहिलं फक्त जंगल !

बिभीषण : छे छे वैकुंठराव, चार कोट या शब्दात अर्थाचा श्लेष आहे म्हणतो तो !

वैकुंठ : अस्सं ! तर मग तो मोठाच कसबी आहे म्हणायचा! मलाही न कळण्यासारखा असा काय श्लेष आहे चार कोटात ?

बिभीषण : तो म्हणतो त्याच्यात लाक्षणिक अर्थ आहे.

वैकुंठ : तो कसा काय ?

बिभीषण : मुलीचं लग्न ठरवतांना आपण काय म्हणतो की दोन जोडे फाडावे लागले ! तसं तो म्हणतो स्वर्गात जाण्याची धडपड करण्याकरिता वैकुंठरावांना चार कोट फाडावे लागले ! असा अर्थ ठेचून भरला आहे त्यात !

वैकुंठ : ठीक आहे, मनुष्य पसंत आपल्याला ! आपण ठेवला त्याला नोकरीला आजपासून. तो आपल्याकडून निघून जाईपर्यंत किंवा आपण त्याला हाकून देईपर्यंत, काय समजलांत ? आता एकदा त्या कवीची ब्याद हाकून द्यायला हवी. कारण काय तो असावा तसा संस्थानिष्ट दिसत नसून–अशा सार्वजनिक संस्थांत वावरायला अंगात जो बेछूटपणा असावा लागतो तो त्यांत नाही ! तेव्हा त्याची तळी लवकर उचलायलाच हवी ! त्याला कबूल केलेले शंभर रुपये तर त्याला द्यायचेच नाहीत, उलट त्यालाच हाकलून द्यायचा आपण परवा ठरविलेल्या प्लॅनप्रमाणे.

बिभीषण : ए पण हा अन्याय आहे–त्या गरीब कवीला—

वैकुंठ : अँहॅं ! काय व्यवहारज्ञान ! गरिबाला नाही लाथा मारायच्या मग कुणाला मारायच्या हो ? बळिवंतांना लाथ मारायची आहे का तुमची तरी धमक ?

सदानंद : नाही. वैकुंठरावांचं म्हणणं पूर्ण व्यवहाराला धरून आहे ! गरिबानांच लाथा द्यायच्या हे जितकं खरं आहे, तितकंच त्यांना आपण लाथा मारल्याशिवाय आपली किंमत, रुबाब, दरारा वाढणार नाही हेही ब्रीदवाक्य लक्षात ठेवा ! मोठमोठे श्रीमंत सिनेमा फिल्मकंपनीवाले जवळ असलेल्या पाण्यासारख्या

पैशाच्या जोरावर जशी कलेला लाथेने ढकलीत थिएटरमध्ये खेचतात, त्यांचंही ब्रीदवाक्य तेच !-अरे–कुठेही न्याय हाच ! अरे, आपल्या घरातली मनी मांजरी सुद्धा सर्वत्रांना हा धडा शिकवीत असते ! उंदरावर पंजा मारून तो गिळंकृत करीपर्यंतच काय ती तिची धडपड ! नंतर अहाहा–कोण मनी–मांजरीच्या चेहऱ्याकडे पाहूं शकेल ? नंतर दिसणारा तो तिचा साधुवृत्तीचा चेहेरा ! नखं आत घातलेल्या मऊशा पंजाने स्वतःच्या मिशा पुसणे ! ते अर्धवट मिटलेले डोळे ! जगांत चुकून जर कधी साधूंची परिषद् भरली तर त्या परिषदेला अध्यक्ष करण्यालायक मनी मांजरी दिसते त्या वेळेला ! तसंच कोणत्याही मूर्खाचं असतं ! एखाद्या अजागळ लेखाच्यावर पदवीधराचं नाव असलं–म्हणजे जसं लेखाला कचऱ्याच्या टोपलीत टाकण्याचं धाडस आपल्याला आणि कोणा संपादकाला होत नाही तसंच सगळीकडे !

वैकुंठ : अरे चालायचंच ! पण अशा परिस्थितीचा उपयोग करून घ्यायला अंगांत तसंच शहाणपण असावं लागतं ! नुसतं टीकात्मक बोलायला काय होतं ! चला, आपल्याला या धंद्यात क्रांति करून दाखविलीच पहिजे !

विभीषण : हल्लीचा युगधर्मच असा आहे ! कोणताही मनुष्य नवीन धंद्यात पडला की त्या धंद्यातील आधीच्या सर्व लोकांना अक्कल नाही ही घोषणा पहिल्यांदाच करायची असते ! नंतर आपण या धंद्यात क्रांति करणार आहोत ही दुसरी घोषणा ! नंतर एक अगडबंब ध्येय जाहीर करायचं ! आहे या परिस्थितीत कुणाचंच समाधान नसतं ! नवीन मनुष्य नवीन धंद्यात आला की त्याला जिकडे तिकडे उलथापालथ करावीशी वाटते. कशा-तच वेटचाचं समाधान नसतं !

सदानन्द : याविषयी तुला एक मजेदार गोष्ट माहीत आहे का ?

बिभीषण : सांगायची तयारी असल्यास ऐकण्याची सदिच्छा आहे.

सदानंद : तर मग श्रवण करा. खुद्द माझ्याच स्नेह्याची गोष्ट ! त्याचा माझा जन्मापासून ऋणानुबंध ! बाळ्या मॅट्रिक पास झाला. मी विचारलं कसं काय ठीक आहे कारे ? तो म्हणाला मॅट्रिकमध्ये पहिला नंबर आला; पण अजून बस्तान ठीक बसले नाही ! पुढे एल्एल् बी. झाला तरी बस्तान ठीक नाही, हेच उत्तर ! पुढे नामांकित वकील झाला, तरी त्याचे उत्तर तेच ! बस्तान ठीक बसत नाही अजून ! पुढे डिस्ट्रिक्ट जज्ज झाला तरी त्याची रड ! म्हणे अझून बस्तान ठीक बसत नाही ! अखेर शेवटी परवा मला तो अखेरचा भेटला; त्याचा बाजार आटोपला–तिरडीवर करकचून बांधला होता त्याला ! त्यावेळी त्याला विचारायची सोयच नव्हती ! पण मी तिथं मोठ्यादा ओरडलो–आता बेट्याचं बस्तान ठीक बसलं आहे ! पहा काही हालचाल नाही, काही नाही ! तशी गम्मत असते काहीजणाची. त्याची आपली प्रत्येक बाबतीत कुरकुर ! रडारड ! बोंबाबोंब ! बस्तान ठीक बसले नाही. आता अशांचं बस्तान ठीक केव्हां बसणार हे सांगायला का हवं !

वैकुंठ : आणखी एक गोष्ट सांगून ठेवतो ! हल्ली सगळेच मार्मिक आहेत. अजागळ असा जिवंत माणूस सबंध हिंदुस्थानात शिल्लक नाही हल्ली !

बिभीषण : पुरे ! शेवटचा शूटिंगचा सीन राहिला आहे अजून,

तो पुरा कर आणि मग कर लेक्चरची बाजू सुरू ! तोपर्यंत तुझ्या डोक्यात मतंही रुजतील ! सध्या राजकारण स्लॅक आहे. वर्तमानपत्राचे रकाने रिकामे आहेत. तूही जिवंत आहेस मग काय उडव धूमधडका–( जातात )

---

## प्रवेश तिसरा

( अभिनव फिल्म कंपनीचा स्टुडिओ–सर्व पात्रे रंगविलेली पात्रे इकडून तिकडे फिरत आहेत इतक्यांत सदानंद प्रवेश करतो)

नट नं. ४ : साहेब, हा माझा राजीनामा घ्या !

सदानंद : वंडरफुल मॅन ! आता राजीनामा घेता येत नाही. फिल्म अर्धी तयार झालेली, आता तुम्हाला नोकरी सोडून जाता येत नाही ! आणि आदावतीने जर आपण नोकरी सोडून जाल, तर नुकसानभरपाइची फिर्याद करूं तुमच्यावर समजलांत ?

नट नं. ४ : करा करा नुकसानभरपाईची फिर्याद ! मी सुरवातीपासूनच सांगितलं होतं की, मी श्रीमती रंभाबाईना दुसऱ्या कोणाबरोबर काम करूं देणार नाही म्हणून ! आणि असली कसली ही स्टोरी ! चुंबनाचे सीन्स नसते तर चाललं नसतं का ? जमलं तर मी रंभेबरोबर लग्न करणार आहे म्हणून अगोदरच कंपनीला नोटिस दिली होती !

सदानंद : अहो त्यात काय आहे ? अजून तुमचं लग्न झालेलं नाहीना ;

नट नं ४ : नसलं म्हणून ? मला नाही हे सहन होणार ! हो अगोदर सांगतो. हे शूटिंग जर तुम्ही असंच चालू ठेवले तर

तुमच्या हीरोचा मी खून करीन ! पाहूं माझ्या तावडीतून कसा सुटतो ते ?

नट नं. ३ : काय करणार रे तू माझं ! आहे का अंगात दम?

नट नं. ४ : हीरोसारखा बेछूट बोलूं नकोस ! आता इथं काही नाटक सिनेमा चालू नाही, अखेर हीरोच विजयी व्हायला ! इथं या मनगटाशी गाठ आहे.

नट नं. ३ : तर मग होऊनच जाऊं दे !

नट नं. ४ : जय बजरंग ! (दोघांची मारामारी होते. चंद्रिका, रंभा भीतीने बाजूला उभ्या राहतात. सदानंद नंसताच 'आ' करून उभा राहतो. एक दोघे, दोघांची कुस्ती सोडवायला जातात.)

नट नं. ४ : आमच्यामध्ये याल तर तुम्हाला खंडोबाची शपथ आहे.

नट नं. ३ : अरे भागुबाईंनो त्याच्या धमकीला भ्यालात ?

नंट नं. ५ धमकीला नाही शपथेला भ्यालो ! देवाधर्मालाही न भ्यायला व इतर सगळीकडेच भ्यायला आम्ही काय सुशिक्षित आहो ? (नं. ३ व २ ची मारामारी होते. नं. ३ खाली पडतो. त्याच्या छातीवर नं. २ बसतो. नंतर सदानंदाच्या सांगण्यावरून ती कुस्ती सुटते. नं. ३ सुतक्यासारखा चेहरा करून एका कोपऱ्यांत बसतो ! )

नट नं. ४ : अँहँ हीरो झाल्याबरोबरच शेफारला ! हीरोचा विजय नाटक सिनेमात ! लेका, विड्या ओढून ओढून छातीचं खोक झालं आहे, आणि तूं कसलारे हीरो ! बघ लेका तुझ्या देखत मी आता रंभाहरण करतो. (इतक्यात वैकुंठराव चाबुक वाजवीत प्र. क.)

वैकुंठ : हॅलो सदानंदराव–शूटिंग बंद का आहे ?

...६

सदानंद : काय सांगू ? कथानकात नसतांना हीरो-व्हिलनची मारामारी होऊन–हीरोच मार खाऊन माकडासारखा चेहरा करून बसला आहे ! तेव्हा शूटिंग काय करूं कपाळ ?

वैकुंठ : हेच ते; तुम्हा लोकांना व्यवहारज्ञान आणि प्रसंगावधान नाही. अरे करायला सांगून माकडासारखा चेहरा व्हायचा नाही. तो अनायासा झाला आहे. पौराणिक फिलमचे चार पॅचेस घ्यायचे !

सदानंद : आणि ते सामाजिक फिलममध्ये दडपायचे ?

वैकुंठ : जमलं तर ठीकच ! नाही तर पौराणिक कॉमिकचे चार रीळ जोडू सामाजिक चित्रपटाला, आणि मूळ चित्रपट जरा आखडता घेऊ ! आफ्टर ऑल ईटस् बिझिनेस–कला गेली चुलीत-कथानक गेलं वैलात–कथानक धेडगुजरी आहे असे टीकाकार म्हणायला लागले तर त्यांचे टीकालेख टाकू शेगडीत; आणि जे अशाही स्थितीत आपले स्तुतिपाठक बनतील त्यांना स्टोव्हवर स्वहस्ते सुंदरसा चहा करून पाजू ! अरे पैसेवाल्या काही काही गुजराथी कंपन्या काय करताहेत ? दांत ओठ खाऊन कलेला ठार करण्याकरता तिला सगळीकडून गुद्दे मारताहेत; पण यांचे हात कलावान आणि नाजुक लुसलुसीत असल्यामुळे कलेला तोच खुराक ठरून ती ठार होण्याऐवजी अस्ताव्यस्त वाढते आहे ! अरे एकेक कंपनी एका आठवड्यात चार चार चित्रपट काढते आहे याचा अर्थ काय ? की त्याचं जीवनच अत्यल्प ! पहिली फिलम सिनेमात लागते आहे तो दुसरी तयार होते आहे आणि दुसरी तयार होते आहे तो पहिली साफ होते आहे ! जननमरणाचे आकडे सारखेच ! बेदरकार !

सदानंद : आणि आपलं तरी काय होणार आहे ?

वैकुंठ : त्यांच्या सारखंच ! अरे खर सांगू का तुला; गुरुवर्य फाळके यांनी सिनेमा हिंदुस्थानातही चांगल्या तऱ्हेनं होऊं शकतो हे स्वतःच्या हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनीवरून सिद्ध करून दाखवलं, पुढे-कलानिष्णात बाबूराव पेंटर यांच्या कर्तबगारीने महाराष्ट्र गाजला आणि त्यातूनच सध्या सिनेमाची प्रभात चालू आहे आणि यातूनही आता एकादा छत्रपति अवतरेल ! आणि आपण आणि आपल्यासारखे लोक जे करतात तो सगळा मधल्या रात्रीचा गोंधळ आहे !

सदानंद : मग यात विशेष काय सांगितलेस ? कुठंही काय रामपंचायतना इतकी चांगली माणसं असायची ! बाकी सगळी वानरसेना ! नुसता भुभुःकार !

वैकुंठ : आणि खरं आहेही ! तसेच हे जे चार दोन मोर पिसारा पसरून डौलाने नाचताहेत त्यांच्या आडोशाला-बाकी सगळ्या आपणासारख्या लांडोरी नाचताहेत ! आम्ही कला एवढीच जाणू चाहतो की या मोरांजवळ त्यांची इमिटेशन करीत आम्ही असं जवळ बागडायचे की साध्या भोळ्यांना त्या मोराचा पिसारा आमचाच आहे असा भास झाला पाहिजे. एवढी कला हस्तगत झाली की आमच्यासारख्या डोमकावळ्याचं काम झालेच ! ( इतक्यात बिभीषण प्र. क. )

विभीषण : अरे तो कवि आता दोन चार मिनिटांत येईल बघ इथे. आपल्या परवाच्या ठरलेल्या प्लॅनप्रमाणे त्याचा निकाल आजच्या आज लावायचा हं !

वैकुंठ : ठीक आहे येऊ द्या त्याला ! आपल्या परवाच्या प्लॅन-प्रमाणे बरोबर सिच्यएशन निर्माण कर हं !

सदानंद : ओ येस, तू पहातच रहा ! सगळा बार अगदी जय्यत भरून ठेवला आहे ( कवि चातक प्रवेश करतो. )

वैकुंठ : हॅलो, या आपलीच वाट पहात होतो ! खरोखर कवि आहे तर सर्व काही आहे. बाकी मि. चातक, तुमचे विचार आणि लेखनपद्धति भलतीच ओरिजिनल आहे बुवा !

चातक : वैकुंठराव हा स्तुति यज्ञ बंद करा ! स्तुतीची भांग पाजून बोकडासारखा स्तुतियज्ञात मला बळी द्यायचा तर आपला विचार नाही ना ?

वैकुंठ : अहो उगीच गैरसमज करून का घेता ? आपण आहात तर आम्ही आहोत ! कवि आहेत तर काव्य आहे ! कवि आहेत तर राष्ट्रोद्धार आहे ! कवि आहेत तर उन्नतीची आशा आहे. कवि आहेत तर राष्ट्राचं यश आहे. कवि आहेत तर--

चातक : ते सगळं ठीक आहे. पण पैसे देणार आहांत का आज मला ! मला आज पैशाची अत्यंत जरूर आहे. तेव्हा काय वाटेल ते करा आणि मला आजचे आज पैसे द्या !

वैकुंठ : अहो, पण आम्ही नाही का म्हणतो ? पण दोन चार दिवस थांबलात तर नाही का चालायचं ? चार पाच दिवसात आपणाला पैसे मिळतील.

चातक : वैकुंठराव ही काय व्यवहाराची रीत झाली ! नटींना दोन हजार रुपये पगार द्यायला तुमच्या जवळ पैसे आहेत, स्वतः रस्तोरस्ती हिंडायला, बेबी ऑस्टीन नामक मोटार घ्यायला आपल्याजवळ पैसे आहेत; आणि इतर खर्चही बेसुमार उधळेपणाने करायला तुमच्या जवळ पैसे आहेत आणि बिचाऱ्या कवीला द्यायला तुमच्याजवळ शंभर रुपये नाहीत ?

वैकुंठ : अगदी फारच अडचण आहे का तुम्हाला ?

चातक . कवि आणि अडचण हे दोन्ही शब्द समानार्थीच आहेत.

वैकुंठ : बरं आहे बुवा ! तुमची अडचण आहे तर तुम्हाला मदत म्हणून !–

चातक : वैकुंठराव काय संभावित सौदेगिरी ही ! माझी अडचण म्हणून तुमची मदत ? माझ्या लाख अडचणी असतील पण तुम्ही कांही माझ्यावर उपकार करीत नाही ! सर्वांच्या अगोदर आमची मेहनत आणि सर्वांच्या नंतर–पोस्त द्यावा–त्या हलाखीने आम्हाला पैसे ! म्हणूनच चांगले कवि निर्माण होत नाहीत आणि आहेत ते जगासमोर येऊं शकत नाहीत !

वैकुंठ : बरं करा पावती आणि घेऊन चला आपले पैसे–पण-पावती साडेसातशे रुपयांची करा. गोष्टीला शंभर रुपये देणं म्हणजे अगदीच हे दिसतं !

चातक : खासा न्याय आहे बुवा ! अगदीच हे दिसतं म्हणून पावती साडेसातशेची पाहिजे ? मग पैसे का तसे द्यायला नकोत ?

वैकुंठ : तो प्रश्न तुमचा नाही–पाहिजे असले रोख शंभर आजचे आज, तर साडेसातशे रुपयांची पावती करा.

चातक : ठीक आहे अडला नारायण–वाटेल त्याचे पाय धरी! हं ही घ्या पावती ! (पावती लिहून देतो, सदानंद येतो. पावती घेऊन जातो)

बिभीषण : चैन आहे बुवा कविराज ! सदानंद, तो चेक मोडून आणताना ? आणा लवकर म्हणजे यांना पैसे देऊन टाकू !

सदानंद : अरे आज कसे पैसे मिळणार? आज बैलपोळा आहेना? आपल्या बँकेला सुट्टी आज.

विभीषण : बरं आहे कविराज! जरा थांबा मी आणून देतो पैसे तुम्हांला कुठून तरी (जातो).

वैकुंठ : जरा थांबा इथेच–आम्ही जरा फिल्मकडे बघतो. चलरे सदानंद (दोघे जातात; इतक्यात विठी प्रवेश करते.)

विठी : द्येवा, एवढं ॲक्टिंग समजावून सांगाना मला–हे पहा–ती म्हणते, "प्राणनाथ, मला सोडून जाऊं नका हो कुठं. मी आपल्या पंचप्राणाची पंचारती तुमच्यावरून ओवाळून टाकायला तयार आहे!" असं कसं म्हनायचे हे? वैकुंठरावांनी आपल्याला विचारायला सांगितलंय बघा!

चातक : आता म्हटलंस हे काही वाईट नाही.

विठी : पन द्येवा, या वेळेला पोझिशन कशी घ्यायची?

चातक : 'प्राणनाथ' म्हणायचं आणि खांद्यावर हात टाकायचा! 'मला सोडून जाऊं नका हो कुठे' असं म्हणायचं आणि त्याच्या वक्षःस्थलावर मान टाकायची–

विठी : द्येवा, मी करून पहाते हं (चातक याने सांगितल्याप्रमाणे विठी ॲक्टिंग करीत त्याच्याच खांद्यावर हात टाकते)

चातक : विठे, विठे, बाजूला हो!

विठी : द्येवा, पाहू द्याना मला एवढं ॲक्टिंग करून (ती पुन्हा पूर्वीची वाक्ये म्हणते व कवि चातकाच्या खांद्यावर मान टाकते. इतक्यात वैकुंठराव मागून येतो व हळूच दोघांच्या माना धरतो)

वैकुंठ : चोर हो असले धंदे करता काय? पाजी, हरामखोर, हलकट! (विठीची मान सोडतो) असले कवि लाथेच्या ठोकरीने

हाकलले पाहिजेत. ( कवीला लाथ मारतो व त्याची मान सोडतो ) चल, पसे नाहीत आणि काही नाही. चालता हो आमच्या कंपाउंडच्या बाहेर ! आणि याद राख पुन्हा या बाजूला फिरकलास तर; सहा वर्षे खडी फोडायला पाठवीन ! माहीत आहे–अरे, अजून इथे उभा तू ?

विठी : वैकुंठराव, मला नाही हं ह्ये खपायचं ! माझा आजपासून राजीनामा ! मला जरूरी नाही तुमच्या नोकरीची ! ह्या असल्या देवमाणसावर असला आळ आणता ? तुम्ही सांगितलं म्हणून मी यांना विचारायला आले आणि मेल्या लाज नाही वाटली तुला माझ्याबद्दलही असला संशय घ्यायला ? घाल चुलीत तुझी कंपनी; ही चालले मी (रागारागाने जाऊ लागते.)

वैकुंठ : विठाबाई, जरा थांबा. मग मी सांगतो तुम्हाला या कवीचा सर्व हलकटपणा समजावून ! अगदी एक मिनिट थांबू नका इथे–असले हे समाजांतले गणंग–

विठी : तुम्हीच आहात समाजातले गणंग ( जाते )

वैकुंठ : काय कविराज ? काय विचार आहे ? इथून जाणार आहात का नाही निघून ?

चातक : वैकुंठराव, बेरडा पैसे द्यायचे नव्हते तर साफ सांगायचं होतंस, पण असला हलकट आळ घेतलास माझ्यावर ? बदमाष माणसा तुझ्यासारखे लोक गोळ्या घालून भर दुपारी बारा वाजता ठार मारायला पाहिजेत.

वैकुंठ : तशी जगात अजून पुष्कळ सुधारणा व्हायला पाहिजे हो ! असली छाती तर मार गोळी–पहा मी छातीठोक आपल्यापुढे उभा आहे ! ते वीराचे मरण मी आनंदाने पत्करायला तयार आहे.

चातक : पुरतं ऐकून घेतलं नाहीस ! म्हणे वीराचे मरण ! अरे तुमच्यासारख्यांना बंदुकीच्या गोळ्या करायच्या आहेत काय? उंदराला घालतात त्या गोळ्या घालून तुम्हाला ठार मारलं पाहिजे. अरे जा ! बुडव, १०० रुपये बुडवलेस तर-फेडशील केव्हा तरी असल्या पापाचे देणे घेणे ! ( जातो. )

वैकुंठ : मत्प्रिय मित्रांनो ! या. या. कवीचा काटा काढून टाकला ! ( सदानंद व बिभीषण प्रवेश करतात. )

सदानंद : कायदेशीर इलाज वगैरे काही धमकीची भाषा नाही का बोलला तो ?

बिभीषण : अरे कवीला कोर्टात तरी कोण विचारतो ? ही नुसती फुलझाडं, यांनी फक्त जगायचं ! आपण त्यांच्यावरची फुले काढून घ्यायची आणि नंतर झाड उपटून टाकायचं ! हे नाही ते ! हवी तितकी झाडं आहेत असली हल्ली हिंदुस्थानात-

सदानंद : पण वैकुंठा, ती विठी एकदम बिथरलेली दिसते आहे ! ती बिचारी त्या कवीला अगदी देवासारखी मानते बघ. ती एक मिनिट आता कंपनीत रहायला तयार नाही. ती म्हणते कोर्टदरबार काय वाटेल ते करा-मी आता या कंपनीचा उंबरठासुद्धा चढायला तयार नाही,

वैकुंठ : अग जा जा म्हणावं ! मानली तर बागशाही नाही-तर कोण्या झाडाचा पाला ! तिला वाटत असेल आपण काम अर्धवट टाकून गेलो तर आमचं काही अडेल म्हणून ! आमचं कथानक-कौशल्य तिला कुठं अजून पुरतं माहीत आहे ? आम्ही चालू चित्रपटात नायिका पळून गेली आहे असं एका पात्राकडून बोलवून तिच्या शोधार्थ थोडीशी धावपळ करवू आणि अखेर तिच्या विरहाने नायक क्षयी होतो व तो जरी एकनिष्ठ प्रेमाचा

पुतळा असतो तरी जगायला पाहिजेच म्हणून क्षयी माणूस जसं शक्तीकरिता स्कॉट्स् इमल्शन् किंवा कॉडलिव्हर ऑईल घेतो त्याप्रमाणे केवळ आपद्धर्म म्हणून तो दुसऱ्या नायिकेवर प्रेम करायला सुरुवात करतो. झट्दिशी त्याचे प्रेम जमते आणि पट्दिशी फिल्म संपते.

बिभीषण : बाकी मला वाटतं आहे वैकुंठा—सगळी माणसं निघून गेली आणि तू एकटा जरी शिल्लक राहिलास तरी आपली फिल्म कंपनी चालेल !

वैकुंठ : नाही, पण आता मी ठाम निश्चयच ठरविला आहे ! आपली एवढी फिल्म तयार झाली की कंपनीचे फक्त बिझिनेस-ऑफिस इथं ठेवायचे आणि स्टुडिओ कुठं ?

सदानंद : कुठे ?

वैकुंठ : अंदमानात ! म्हणजे फाटाफुटीची धास्तीच नको ! तिथं सर्वच जन्मठेपेचे कैदी असतात ! निदान एक जन्म तरी धास्ती नको !

बिभीषण : वैकुंठा, बाकी तू खरा दूरदर्शी हं ! परवा बघ काय झाली गंमत ? त्या सिनेमा कंपनीच्या नवीन चित्रपटाची जाहिरात लागली होती भिंताडावर ! जाहिरात होती चांगली पंचरंगी ! दोघे स्नेही चालले होते रस्त्याने ! त्यातील एकाने ती जाहिरात पाहिली आणि तो दुसऱ्याला म्हणाला, 'येणार कारे आज सिनेमाला ?' मित्राने विचारले 'कोणच्या ?' तो म्हणाला, 'देशी फिल्म आहे' ! फिल्म देशी आहे आणि त्या फिल्मला आपला स्नेही आपल्याला नेणार आहे ही कल्पना मनात येताच तो तगडा जवान असतानासुद्धा—देशी फिल्म आणि

आपल्याला जायचं आहे हे त्याच्या लक्षात येताच तो जागच्या जागी–हिवाने–थंडीतापाने कुडकुडायला लागला.

सदानंद : ती गंमत पहायला तू हजर होतासच म्हणायचा तर–पण पुढची गंमत तू कुठं पाहिली ? त्या जवान गड्याला हिव भरलेलं पहाताच ही काय भानगड आहे म्हणून पहायला दुसरा एक तरुण आला. त्याला कळलं की गावात देशी फिल्म आली आहे आणि त्याला जायचंय ! अरे कसलं काय आणि कसलं काय-जो त्यालाही वाताचा झटका आला. तिसरा आला ही हकीगत पहाताच त्याने पळ काढला. चवथा आला–त्याची तीच गत. पाचवा आला–तरी तसेच ! पहिल्यांदा हिव भरलेला माणूस रस्त्यातच उभा होता. आणि सारखी अशी आल्या गेल्यांची लागण चालली होती. इलेक्ट्रिक प्लगला एकदा माणूस चिकटला म्हणजे त्याला कोणी सोडायला गेला की त्याची जशी स्थिति होते, त्याप्रमाणे चालले होते रस्त्यात ! अखेर मीच एक टांगा ठरवला आणि पहिल्यांदा हिव भरलेला माणूस आणि त्याचा मित्र त्या टांग्यात घालून पाठवून दिला. मग काय क्षणात रस्ता रिकामा झाला !

वैकुंठ : हा मूर्खा ! मला अगोदर नाही सांगितलंस तू ? अरे, मी लगेच धावत धावत तिथं जाऊन फोटोग्राफी चालू केली असती !

बिभीषण : तू काय करशील याचं काहीच सांगता येत नाही. उद्या सदाफुली वहिनीकडे जाणार आहेस ना वाटतं ?

वैकुंठ : होय बाबा जाणारच ! न जाऊन तरी काय करणार? उद्या एकदा तिच्या माहेरी जाऊन आलो की परवा कंपनीतील सर्व नटांना आपल्या कलेची गुरुकिल्ली सांगून टाकणार आहे.

म्हणजे ते कुठही गेले तरी त्यांची पोटापाण्याची सोय सहज लागेल ! तुम्हीही हजर रहाच त्या वेळेला म्हणजे उद्या तुमचं आमचं जरी भांडण झालं तरी प्रत्येकाला स्वतंत्ररित्या पोट भरता येईल.

बिभीषण : पण अशी किमया तरी काय सांगणार आहेस ?

वैकुंठ : सध्या तुमच्या उत्कंठेला चिमटा घेऊन ठेवला आहे तेवढा पुरे. समक्षच पहा–धीर धरा ! धीर धरा ! हॅव पेशन्स ! हॅव पेशन्स ! हॅव पेशन्स !

---

## प्रवेश चवथा

( कवि चातक आणि विठी प्रवेश करतात.)

चातक : विठे, कंपनी सोडलीस म्हणतेस एकंदरीत तू ! म्हणजे तू कंपनीत माझ्यामुळेच गेलीस, आणि माझ्यामुळेच तुला कंपनी सोडावी लागली.

विठी : पण द्येवा, कसला घाणेरडा आरोप घेतला तुमच्यावर त्यांनी, तुमच्या सारख्या देवमाणसावर ?

चातक : विठे, हा कसला तुझा भोळेपणा ! अगोदर आपण मनुष्य आहोत हेच सिद्ध करणं कठीण असतं; मग देवमाणूस बनायला–

विठी : नाही. तुम्ही खास देवमाणूस आहात ! एरवी का देव–तुमच्याशी बोलतो !

चातक : कोणी सांगितलं तुला माझ्याशी देव बोलतो म्हणून–

विठी : अशा गोष्टी कोणी कबूल करतं वाटतं ? पण मी जाणलं की देव तुमच्याशी बोलतो आणि देव तुमच्याशी बोलताना मी पाहिलं सुद्धा आहे.

चातक : विठे, मेंदू ताळ्यावर आहे ना ? केव्हा बोलला देव माझ्याशी !

विठी . केव्हा काय ? नेहमीच बोलतो. मी पहाते नव्ह का ? समोर कोरा कागद घेऊन जवा तुम्ही फराफरा लिहिता ते काय तुमच्या कानांत कुणी काही सांगितल्यावाचून वाटते ? देव गुपितपणाने येऊन तुमच्या कानांत बोलतो आणि तुम्ही ते लिहून काढता ! तसं नसतं तर हरएक माणूस नसता का लिहीत बसला ?

चातक : मग, जेवढे जेवढे लिहिण्याचा धंदा करतात, ती ती सगळी देवमाणसे वाटतं ?

विठी : अहो, कोणत्याही धंद्यात काय खोटेपणा असतोच ! खरे ‘ अंगात ’ येणारे फार थोडे–अंगात येण्याचा आव आणणारेच फार !

चातक : मग मी खरा कशावरून ?

विठी : तुमच्या वागण्याबोलण्याला मर्यादा आहे म्हणून ! अव, असा तसाच एकदा कवि असता तर तो मला देखील सुंदरी म्हणून लागला असताना प्रेमाची भाषा बोलायला ! अहो तुकारामाचे अभंग म्हणणारे टाळकुटे सगळेच असतात पण त्यात तुकाराम असतो का ? तसं हे नुसते टाळ झांजा वाजवणारे !

चातक : विठे विठे, तू कल्पना बोलायला लागलीस–

विठी : पन द्येवा, त्या वैकुंठरावाचा सूड उगवा तुम्ही–

चातक : ते काय करायचे मी ठरवले आहे ते सांगतो तुला. पण आता ' द्येवा, द्येवा ' सोड की !

विठी : खरं सांगू का कवि—आपल्या सहवासानं आणि कंपनीत राहिल्यापासून माझी बोली खूप सुधारली पण पहिल्या रांगड्या बोलीतच मला जे प्रेम वाटतं ते काही निराळेच पहा. बरं सांगा तर खरं, पण वैकुंठरावाचा कसा सूड उगवणार तो ?

चातक : पहिल्याने हे लक्षात ठेव की कवि हा प्राणी अनत्याचारी आहे ! कल्पनासृष्टीत आपल्या पात्राचे तो काय खून करील तेवढेच ! पण साध्या व्यवहारात मात्र त्याला कुणी जरी तिबून काढला तरी तो आपल्या बोचक शब्दाची काय गोफणफेक करील तेवढीच ! तेव्हा मी वैकुंठरावाच्या चरित्रावर एक नाटक लिहिणार आहे !

विठी : अन उपयोग काय त्याचा ?

चातक : चूक आहे तुझी विठे ! काठी लाठीचा मार अंगावर दिसतो तरी पण शब्दांचा मार हा इतका असह्य आहे–बरं मी म्हणतो त्याचा नाही काही उपयोग झाला–तरी कोणच्या नाटकाचा सुधारणेच्या दृष्टीने उपयोग होतो ? एकच प्याला वाङ्मयवीर गडकऱ्यांनी लिहिला आणि नटसम्राट गंधर्वानें केला म्हणून काय दारुबाजी बंद झाली आहे का ? माधवराव जोशांनी म्युनिसिपालिटी नाटक लिहिलं आणि ते चिकार लोकप्रिय झालं म्हणून म्युनिसीपालिटीच्या कचऱ्याच्या पेटीजवळ आरसेमहाल सजले का ? अग, टीकास्पद नाटकाची रंगभूमी म्हणजे एक जगजाहीर हजामखाना आहे. वाटेल तो येतो घोटून घेतो; पुन्हा केस वाढायचे ते वाढतातच ! गावात चोऱ्या फार व्हायला लागल्या किंवा साथीच्या रोगात रात्री अपरात्री जसे काही शहरातून पोलीस

गस्त घालीत असतात त्याप्रमाणे आहे हे ! जाऊं दे, तूं, पुढं काय ठरवलं आहेस ?

विठी : मी गरिबीनं राहिले तरी जन्मभर पुरेल एवढा पैका झाला आहे माझ्याजवळ ! तेव्हा मी आता नोकरी धंद्यात न पडता–

चातक : आलं लक्षात ! अनुरूप वर पाहून लग्न करून संसार करणार ना ? चल मीही पाठच्या भावाप्रमाणे तुला मदत करीन ! चल तूं हो पुढे (विठी जाते.) आता येथे जर एकादा ॲक्सिडेंटल कवि असता तर हिलाच पावन करता ! पण मी पडलो मागसलेला कवि ! अहो, पण आमच्याच समाजात इतक्या मुली लग्नाच्या पडल्या आहेत–त्यांची काय वाट ? मग हा पतितपावन समारंभ कशाकरता ? आहेत ती गाडगी मडकी कायम ठेवून सुधारणा केली तर नाही का चालणार ? शेजाऱ्याला हीव भरलयं म्हणून त्याला पांघरूण घालण्याकरिता विषमाने आजारी पडलेल्या बापाच्या अंगावरचे पाघरुण काढून शेजाऱ्याला घालण्यात काय पुण्याई असेल ती परमेश्वराला माहीत ! (जातो.)

---

## प्रवेश ५ वा

(सदाफुलीच्या माहेरचा रस्ता. हातावर हार टाकलेला वैकुंठराव गात गात प्र. क.)

वैकुंठ : आनंदी आनंद गडे । इकडे तिकडे चोहीकडे ॥ १ ॥ धंद्याच्या आदळआपटीला सुरवात केल्यासासारखं हाताला यश आलं. फिल्मचीही पोस्टर्स लागली. तेच वाईफला कळावं म्हणून

तिच्या माहेरच्या घरावर एक जाहिरात लावायाला सांगितली. आता इतकं यश आल्यासारखं तिचा आमचा सलोखा झाला म्हणजे मराठी म्हणीप्रमाणे ‘ ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड ’ असं होऊन जाईल. आमचं नाटक संपत आलं आहे हे जाणून तरी निदान आमच्या नायिकेने तडजोडीला सुरवात करायला पाहिजे ! पण–(इतक्यात माडीवर सदाफुली दिसते.)

सदाफुली : कोण कोण ते ? आपणच का ? आलात इकडे ? का ‘ पुढे ’ येता येता अखेर इथेच आलात ?

वैकुंठ : देवी, आणखी पुढे कुठं जायचे ? नाटक कादंबरीतल्या नायकाचं जीवन लग्नापर्यंत असते. नायकनायिकेचीं गाठ पडून नंतर–एकमेकांनी एकमेकांना आपलं म्हटल्यानंतर सगळं जग वितळून जात असतं आणि त्यांतच नायकनायिकाही वितळून जातात. पुढं यायचं म्हणजे नायिकेपर्यंत ! ध्येयप्राप्ति म्हणजे नायिकाप्राप्ति–उच्च विचार म्हणजे नायिकेला उपमा देण्याची शर्यत ! गालाला गुलाब म्हणायचं का झेंडू म्हणायचं ? सदाफुली म्हणायचं का शेवंती म्हणायचं ?

सदाफुली : बायकांची वर्णनं करण्यात काही काही लेखक हल्ली इतकी आतषबाजी करीत आहेत की त्यापुढे स्त्रियांची नग्न चित्रेही छापण्यात अश्लीलता उरलेली नाही ! इतकी बायकांची किळसवाणी विटंबना चालली आहे.

वैकुंठ : नाही लाडके, हे बायकांना पुढं आणणं चाललं आहे ! पूर्वी बायका पडद्याआड असत, हल्ली आम्ही बायकांना मार्केटाच्या दारावर सुस्वागतम् ही पाटी हाती देऊन त्यांना स्वागताध्यक्ष करून टाकलं आहे ! बायकांच्या सांगण्याच्या बाहेर आम्ही हल्ली एक अक्षर वागत नाही. कॅलेंडरवर बाई, भगवद्गीतेच्या जाहिरातीवर

बाई, औषधाच्या जाहिरातीवर बाई, एक जात बायाच बाया—बायकांनी जाहिरातीतल्या चित्रात सांगायचे, 'अगबाई, किनई, त्या दुकानाच्या चपला किती चांगल्या आहेत हो?' लगेच आमची खेटरं खायची तयारी! सांगतो काय चारुगात्री तुला, बायांना पुढं आणण्याच्या बाबतीत आम्ही हल्ली इतके कायावाचामने झटतो आहोत की आम्हीच बायका व्हायला लागलो आहोत!

सदाफुली : फार चांगलं व्हायला लागलं आहे! पण आपण का इकडे येण्याची तसदी घेतलीत!

वैकुंठ : हे चारुगात्री, हे नयनमनोहारिणी, हे कृतांतव्याघ्री, हे मनमोहनचित्रचकोरचंद्रिके, हे प्रिये!

सदाफुली : संपली का मालगाडी? नाहीतर या तुमच्या मालगाडीच्या धडधडाटाने मला फीट यायला झाली होती!

वैकुंठ : हे आताच दिलेल्या संबोधनालाही वश न होणाऱ्या स्त्रिये, तूं आहेस तरी कोण? हा वैकुंठ, हा तुझा प्राणनाथ, हा तुझा मनश्चंद्र, हा तुझा चारुदत्त, हा तुझा प्रेमाचा बंदा येवढ्या यशाची विजयपताका घेऊन आलेला असतांना त्याचं स्वागत करायचं सोडून अशी वादविवाद काय करते आहेस!

सदाफुली : थांबा हं, मी करते तुमचं योग्य स्वागत. थांबा जरा. (आत जाते)

वैकुंठ : आहाहा! मला आनंदाने अस्मान ठेंगणे वाटूं लागले आहे. हे सूर्याचे किरण लिंबाच्या सुधारसासारखे मला शीतल वाटूं लागले आहेत. काय काय वाटूं लागले आहे ते मी एकटा कसा कथन करूं? तेव्हा एकाद्या रिकामटेकड्या कादंबरीकारा, ये बाबा माझ्या साह्यार्थ धावून, तरच मी आता उपभोगीत असलेल्या वैभवाचे वर्णन करूं शकेन. (इतक्यात सदाफुली वरून

फुलांचे हार टाकते) अग, हे तर तसबिरीवरचे फुलांचे निर्माल्य दिसते आहे !

सदाफुली : मग योग्य ठिकाणीच नाही का योग्य जिन्नस पडला ? आपण तरी काय केलं आहेत ? सगळं निर्माल्यच गोळा केलं आहेत की ! चला जा इथून---

वैकुंठ : सुंदरि, असा माझ्यावर कोप करूं नकोस ! संगीताचा मला गळा नाही तरीही प्रोज संगीतात तुझी मनधरणी करतो. नच सुंदरि करि कोपा। मजवरि धरि अनुकंपा। नारी मज–सबंध पदच्या पद नाही उपयोगात येत ह्या प्रसंगाला. कारण त्या पदात नारी बहु आहेत आणि मला तर एकच आहे म्हणून तर ही पायपीट ! मला जर नारी बहु असत्या तर विचारीत होतं कोण तुला ? म्हणून म्हणतो लाडके, नच सुंदरि करि कोपा। मजवरी धरि अनुकंपा।

सदाफुली : तुमच्या कंपनीचं वाटोळं झाल्याशिवाय तुमचं माझं जमायचं नाही. (जाते.)

वैकुंठ : उद्या करतो कंपनीचं वाटोळं ! स्त्रीपुढे धंद्याची काय पर्वा ? (जातात.)

---

## प्रवेश ६ वा

(सर्व नट व एक नटी.)

नट १ ला : कायरे, आज वैकुंठराव म्हणे आपल्याला गुप्त विद्यादान करणार आहेत ? काय करणार आहेत गुप्तदान ?

नट २ रा : कदाचित् काही तरी सांगून त्याच्याबद्दल फी उपटायची असेल आपणाकडून ? थकलेले पगार आहेतच त्यांच्याकडे ! करतील काही तरी वळतावळत !

नट ३ रा : नाही तर परवा आपण ऐकलेल्या फार्सासारखा पोरखेळ तर नाहीना काही ?

नट ४ था : कसलारे बुवा पोरखेळ ?

नट २ रा : अरे, परवा एक असा तसाच कलावान् आला होता गावात. त्याने चार ठिकाणी रस्त्यावर खेळ करून पाहिले पण काही जमेना त्याचे ! अखेर शेवटी त्याने केलंन काय ? एक सुंदर सूट तयार केला. एक तबेला भाड्याने घेतला. पेंटरला भागीत घेऊन पाच पन्नास बोर्ड लिहवून घेऊन मजकुराची आग लावली गावात ! तिकीटं छापून घेतलीन आणि—

नट ४ था : काय लॉटरी काढली काय त्याने ?

नट २ रा : नाही, एक अलौकिक जादू करून दाखविली त्याने -

नट २ रा : काय केलंनं ? पाण्यावर कापूर जाळून दाखवला ?

नट ३ रा : नाही. त्याने एक अजब घोडा निर्माण करून दाखविला ! त्याने बाहेर पाटी लावली 'अजब घोडा,' या घोड्याची गंमत अशी आहे की या घोड्याला डोक्याच्या ठिकाणी शेपूट आहे. आणि शेपटीच्या ठिकाणी डोकं आहे ! जाहिरात वाचून प्रत्येकाची उत्कंठा जागृत होई. आणा, अर्धा आणा करता करता चारपाच दिवसात दोन हजार रुपये जमा केले त्याने ! प्रत्येक जण पाहून येई–आणि त्याला जर एखाद्याने विचारले की कायरे आहे का काही पहाण्यासारखे ? तो उत्तर देई 'हो आहे बुवा एक वेळ पहाण्यासारखे !'

नट ४ था : पण खरी गंमत काय होती त्यांत ? असला 'अजब घोडा' कुठला पैदा केला होता त्याने ?

नट २ रा : त्याने तो अजब घोडा गावातल्या गावात पैदा केला होता ! त्या घोड्याला त्याने चमत्कारिक बनविले ! नाही तर एका टांगेवाल्याचं पोट खपाटीला गेलेलं रोडकं मोडकं घोडं ते ! पण त्याने दोन हजार रुपये मिळवून दिले.

नट ४ था : मग घोड्याला त्यानं असं विचित्र कसं बनवलं ? तो काय काही बंगाली विद्या जाणत होता ?

नट २ रा : नाही. तो फक्त कलेची वरवरची सफाई जाणत होता ! त्याने घोड्याचा तबेला घेतला—घोडं घेतलं आणि घोडं फक्त उलट बांधून ठेवले ! म्हणजे कसं ? ज्या बाजूला दावण होती त्या बाजूला घोड्याचं शेपूट केलं आणि दुसरीकडे तोंड आणि मग तो प्रत्येला समजावून सांगे की हे पहा वास्तविक सर्व तबेल्यांत घोड्याचं डोकं या बाजूला असतं; पण या घोड्याचं तोंड तिकडे आहे आणि घोड्याचे तोंड तिकडे केल्यामुळं अर्थात् त्याचे शेपूट इकडे आहे ! प्रत्येकजण तो चमत्कार समजावून घेई, मन लावून पाही आणि शांत होत्साता बाहेर जाई ! असं होते ! म्हणून म्हणतो वैकुंठराव आपल्याला असलाच काही चमत्कार करून दाखविणार आहेत की काय !

नट ४ था : ते दिसेलच आता. ( पडद्यात घंटा वाजते व पडद्यात "सर्व नटनटींनो तयार रहा. आज रोजी श्रीयुत वैकुंठराव हे आपल्या कलेचे फुकट दान करून टाकणार आहेत. तरी लवकर चला—लवकर चला—लवकर चला !" पुन्हा घंटा वाजते व पडदा उघडतो. वैकुंठराव प्र. क. )

वैकुंठ : नोकरांनो, मित्रांनो, कर्मधर्मसंयोगाने आज आपण

एका ठिकाणी जमलो–आणि 'फुटणं' हा जो माणसाचा नैसर्गिक धर्म आहे त्याप्रमाणे आपल्या कंपनीत आता फाटाफुटीला सुरवात झाली आहे. पण मी जात्याच दयाळू आणि धर्मार्थ बुद्धीचा असल्यामुळे तुम्ही माझी कंपनी सोडून मोडून तोडून जरी कुठंही गेलांत तरी तुमची पोटापाण्याची भरपूर सोय व्हावी म्हणून मी आपल्या अंगांत असलेलं कलाकौशल्य तुम्हां सर्वत्रांना आज वाटून देणार आहे ! तेव्हा लक्ष देऊन पहा. काही शंका कुशंका असल्यास विचारा ताबडतोब उलगडा करून टाकू !

नट ४ था : ( रंभेला पुढे आणीत ) साहेब, हिला अजून पुरतं लाजता येत नाही. विठी नाही—नूरजहानला जसं तुम्ही काही आडाख्याने लाजायला शिकवलंत त्याच आडाख्याने हिला आमच्या देखत लाजायला शिकवा म्हणजे पुढं कधी अडचण आल्यास आमची सोय होईल.

वैकुंठ : ठीक आहे, त्याचं असं आहे ( चुटक्या वाजवीत ) एक दोन तीन चार ! हं रंभे, एक म्हटलं की मान ताठ करायची दोन म्हटलं की वीस अंश मान वाकवायची, तीन म्हटलं की ६० अंश मान वाकवायची आणि चार म्हटलं की पुरतं लाजून मुरका मारायचा ! हं एक–दोन–तीन–चार ! ( नंतर वैकुंठ भराभर चुटक्या वाजवतो, रंभाही भराभर लाजते ! ) काय रंभे, जमेल ना आता—

रंभा : हा धनी—

वैकुंठ : जा तर मग. जा तिकडे जाऊन उभी रहा. ( रंभा जाते ) हं आता हीरोचं काम काय असते ते पहा ! ( आत जातो व पोषाख बदलून येतो ) हीरोनं ऐसं रुवाबात आलं

पाहिजे ( इकडून तिकडे जातो. ) असं रुबाबात काही काळ फिरल्यानंतर त्याच्या दृष्टीला नायिका पडते. मग त्याने छातीला हात लावून म्हणायचे ‘ हे सुंदरि माझा जीव तुझ्यामुळे व्याकुळ झाला आहे ! ’ नंतर गुडघे टेकून ‘ देवी मी मरायला कारणच शोधीत होतो, ते अनायासं तुझ्या रूपाने सापडलं मला ! चारुगात्रि माझ्याशी लग्न लावायला कबूल हो; नाहीतर देवीसमोर जसा बोकड बळी देतात त्याप्रमाणे हा पहा माझा कंठनाळ चिरून तुझ्यापुढे ठेवतो ! ’ एवढं हीरोनं म्हटल्यानंतर नायिकेनं काय करायचं तेही करून दाखवितो. “ प्राणनाथ माझं आपल्यावर स्वर्गीय प्रेम आहे ! मी आपल्याबरोबर आताच्या आता पळून आले असते पण माझे चुलते व वडील दुष्ट असून त्यांनी माझं लग्न करायचं ठरवलं आहे ! ” की नंतर लगेच हीरोनं अंगात भूत संचारल्यासारखं चेकाळन ओरडायच, ‘ काय लग्न ? कुठं आहे तो हरामखोर, पाजी, चांडाळ ! नवप्रफुल्ल कुसुमाला वाटेल त्याचा हात धरून प्रेमाच्या नांवाखाली पळून जाऊ न देणारा कुठं आहे तो चांडाळ ? सूड, आसूड, चाबूक, गोफण, तोफ, पिस्तूल, बंदूक ! ! ! अरेरे माझं रक्त नसानसातून सळसळते आहे; तेव्हा देवि–’ मग लगेच नायिकेनं म्हणायचं ‘ असं संतापाने वेडं होऊ नये गडे ! मी कनई या जन्मी येईन तर आपल्याबरोबरच ! पण गडे थोडा धीर धरायचा, चुलत्याच्या किंवा वडिलांच्या संमतीने माझं एकदा लग्न ठरू द्या–मग माझं ज्याच्याशी लग्न ठरेल–त्याला काय वाटेल ते करून आपण दुर्गुणी ठरवू, अजागळ ठरवू आणि माझ्या या हृदयाचे स्वामी आपण–त्या माझ्या लग्न ठरलेल्या माणसाला ठार मारून माझं हरण करा ! ’ एवढं म्हटल्या नंतर त्या नायिकेच्या वडिलांनी

अगर चुलत्यांनी पैशाच्या संकटात पडायचं असतं आणि मग एक नराधम त्या पैशाच्या जोरावर नायिकेला मागणी घालतो! एवढं झाल्यानंतर–हीरोनं वाटेल तसं चेकाळून बडबडायचं असतं, धावपळ करायची असते, तुरुंगात जायचं असतं, पकडलं जायचं असतं, थोडक्यात सांगायचं म्हणजे जिवंत राहून काय वाटेल ते करायचं असतं. नायिकेचं लग्न करणं ज्याच्या हाती असतं त्यांनी नाटक सिनेमात दुष्ट असावेच लागतं! आणि मग सरासरी नाटक किंवा फिल्म पुरेशी होत आली की व्हिलनने आपण होऊन उंदीर जशी मांजराच्या तोंडात आपली मान देतो त्याप्रमाणे हीरोच्या तावडीत सापडायचं; हीरोनं त्या मेल्या मढ्याला मारायचं आणि नंतर नायकनायिकेने एकमेकांना अलिंगन द्यायचं आणि आल्या गेल्यानं म्हणायचं की 'नांदा सौख्यभरे!' व्हिलनने काय वाटेल ते करायचं–ओक्साबोक्सी ओरडायचं! हात आवळायचे, मुठी आपटायच्या, पाय ठणकावायचे, धावपळ करायची आणि शेवटी मरायचं! कॉमिक, तो आचरटपणा तर सर्वांनाच माहीत आहे! असं आहे, एवढ्या भूमिका पाठ झाल्या की कुठल्याही सिनेमा नाटकात हीरो व्हा, व्हिलन व्हा, नायिका काय वाटेल ते व्हा, फक्त मालक होऊ नका! आणि हो, नायिकेच्या लाजण्याची कमाल मर्यादा सांगायची राहिली! ही अशी हाताची आढी करून थोडी वेडी वाकडी मान करून हसायचं आणि दाताडं विचकायचं की ओव्हर बाउंड्री. खेळ खलास! आणखी आहेत काही कुणाच्या शंका कुशंका?

सर्वजण : नाही! नाही! (बिभीषण व सदानंद हार आणून वैकुंठाला घालतात व एक पदक अडकवतात.)

वैकुंठ : काय सोन्याचे पदक मला अर्पण करणार?

बिभीषण : हो तूच नाही का काल मजजवळ देऊन ठेवलं होतंस तुला समारंभाने द्यायला !

वैकुंठ : स्वयंपाक घरातल्या गोष्टी दिवाणखान्यात बोलतो आहेस ?

सदानंद : बरं वैकुंठराव, झाला हा पोरखेळ आता पुरे ! का आणखी काही ट्रिक्स आहेत ?

वैकुंठ : नाही. बहुतेक संपल्या ! केवळ अश्लीलपणा टाळण्याकरता या धंद्यात चालणारे रंगमहालरहस्य मी गुलदस्तांत ठेवले आहे आणि तेवढं वजा केलं तर बाकी सर्व पोरखेळच आहे.

सदानंद : पण हे सर्व लोक आपणाला पोरकट म्हणतील आणि खरे पोरकट 'धंदेवाले' म्हणून मिशा वर करून चालतील !

वैकुंठ : त्याला एक सोपा उपाय आहे. आपण तिकडे लक्षच द्यावयाचे नाही ! तरुण मनुष्य भर ज्वानीत बेफामपणाने वागून म्हातारपणात जे करतो तेच आपण सर्वजण मिळून करू या—

बिभीषण : म्हणजे काय करायचे ?

वैकुंठ : असं ओळीनं उभं राहायचं ! अहो कवि, असे आडून काय पाहता ? या—हं यू ऑल, अटेन्शन—आइज स्ट्रेट—

जय जय विठोबा रखमाई। सावळ्या विठोबा रखमाई।
जय जय विठोबा रखमाई। सावळ्या विठोबा रखमाई ॥

बोलका सिनेमा समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय
दा. क्र. ७५८३४ दि. १/२०
IRBK-0115835